CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

**!! जाहीर सूचना !!**
सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.
सहकार्याबद्दल धन्यवाद.

सोलापूर | बुधवार, ३१ जुलै २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३८ वे अंक २७१ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### महिलांना मिळणार वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत

**मुंबई :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या राज्यातील सुमारे ५२.१६ लाख तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाना वर्षाला तीन गॅस सिलेंडरचे पुनर्भरण मोफत उपलब्ध करून देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.



पात्रता निकषांप्रमाणे योजनेचा लाभ मिळण्यासाठी गॅस जोडणी महिलेच्या नावाने आवश्यक आहे. राज्यातील प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत पात्र लाभार्थी या योजनेसाठी पात्र असणार आहेत. लाडकी बहीण योजनेस पात्र ठरलेले लाभार्थ्यांचे कुटुंब या योजनेसाठी पात्र असणार आहे. एका कुटुंबात शिधापत्रिकेनुसार केवळ एक लाभार्थी या योजनेस पात्र असेल तसेच केवळ १४.२ किलो वजनाच्या सिलेंडरची जोडणी असलेल्या ग्राहकांना ही योजना लागू असेल. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या ३ मोफत गॅस सिलेंडलचे वितरण तेल कंपन्यामार्फत करण्यात येईल. केंद्र सरकारच्या ३०० रुपये अनुदानाव्यतिरिक्त राज्य शासन ५३० रुपये प्रती सिलेंडर इतकी रक्कम लाभार्थ्यांचा खात्यात जमा करेल. ■

### नवाब मलिक यांच्या जामिनामध्ये वाढ

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे माजी मंत्री नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी वैद्यकीय आधारावर जामीन मंजूर केला. मलिक यांना विविध आजार झाल्याच्या त्यांच्या वकिलाने केलेल्या युक्तिवादाची नोंद न्या. बेला एम. त्रिवेदी आणि न्या. सतीश चंद्र शर्मा यांनी घेतली. मुंबई उच्च न्यायालयातील नियमित जामिनाची याचिका निकाली निघेपर्यंत वैद्यकीय जामीन कायम राहील, असे न्यायालयाने स्पष्ट केले. ईडीच्या वतीने युक्तिवाद करणारे अतिरिक्त महान्यायाभिकर्ता एस. व्ही. राजू यांनी जामिनाला विरोध केला नाही. मलिक यांना कायम वैद्यकीय जामीन दिला जाऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. पळपुटा गुंड दाऊद इब्राहिम आणि त्याच्या साथीदारांच्या कृत्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली ईडीने त्यांना फेब्रुवारी २०२२ मध्ये अटक केली. इतर आजारांसोबतच मूत्रपिंडाचा विकार असल्याने जामीन देण्यात यावा, अशी मागणी करीत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

### पूजा खेडकरच्या अटकपूर्व जामिनावर आज सुनावणी

**नवी दिल्ली :** फसवणूक आणि बनावट दस्तावेज सादर केल्याच्या प्रकरणात वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरने अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेल्या याचिकेवर दिल्ली न्यायालय बुधवारी सुनावणी करणार आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश देवेंद्रकुमार जांगला या याचिकेवर मंगळवारी सुनावणी करणार होते. मात्र, सरकारी वकिलांनी वेळ मागितल्याने त्यांनी या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली. या प्रकरणासाठी नवीन सरकारी वकिलाची नियुक्ती करण्यात आली आहे. ■

## मनू भाकरची ऐतिहासिक कामगिरी
# एकाच स्पर्धेत जिंकली दोन पदके

◆ **चॅटॉक्स, ३० जुलै**

भारताच्या मनू भाकर आणि सरबज्योत या जोडीने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मंगळवारी इतिहास घडविला. १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघ स्पर्धेत ओह ये जिन आणि ली वोन्होच्या कोरियन जोडीला पराभूत करून त्यांनी कांस्य पदक जिंकले. या जोडीवर देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मनू भाकरने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सरबज्योत सिंगसोबत १० मीटर एअर पिस्तूल मिश्रित संघात कोरियाला पराभूत करून स्वातंत्र्यानंतर एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी पहिली भारतीय ठरली. भारतीय जोडीने कोरियाचा १६-१० असा पराभव केला आणि या ऑलिम्पिकमध्ये देशाला दुसरे पदक मिळवून दिले. यापूर्वी, मनूने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत कांस्यपदक जिंकले.

१९०० च्या ऑलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडू नॉर्मन प्रियदने २०० मीटर स्प्रिंटमध्ये रौप्य पदके आणि २०० मीटर अडथळ्यांमध्ये रौप्य पदके जिंकली. पण, ती कामगिरी स्वातंत्र्यापूर्वीची होती. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या चौथ्या दिवशी भारतीय चाहत्यांचे लक्ष पुन्हा एकदा मनू भाकरवर होते. १० मीटर एअर पिस्तूल मिश्रित संघ कांस्यपदकाच्या सामन्यात ती सरबज्योत सिंगबरोबर खेळायला आली.

आज मनूने आणखी एक पदक आपल्या नावावर करताना वैयक्तिक दुसरे पदक जिंकले. यापूर्वी कोणत्याही भारतीय खेळाडूने ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकली नाहीत. सुशील कुमार आणि पी. व्ही. सिंधू यांनी प्रत्येकी दोन पदके जिंकली आहेत, परंतु ही पदके वेगवेगळ्या ऑलिम्पिक स्पर्धेत मिळवली आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### पंतप्रधानांकडून अभिनंदन

पंतप्रधान नरेंदी मोदी यांनी मनू भाकर आणि सरबज्योतचे अभिनंदन केले. आमचे नेमबाज आम्हाला सतत गौरव प्राप्त करून देत आहेत. ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल मिश्र संघ स्पर्धेत कांस्यपदक जिंकल्याबद्दल मनू भाकर आणि सरबज्योत सिंग यांचे अभिनंदन. ■




# अर्थसंकल्प विकसित भारताचा : सीतारामन्

◆ **नवी दिल्ली, ३० जुलै**

संसदेत सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताचा आहे. विकसित भारताच्या सरकारचा अर्थसंकल्प आहे. २०४७ पर्यंत भारत विकसित करण्याच्या महत्त्वपूर्ण आराखड्याचा भाग आहे, असे प्रतिपादन अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी आज केले.

केंद्रीय अर्थसंकल्पावर लोकसभेत चार दिवस चाललेल्या चर्चेला उत्तर देताना आपल्या घणाघाती भाषणात सीतारामन् यांनी विरोधकांनी घेतलेल्या सर्व आक्षेपांचे आणि आरोपांचे मुद्देसूद खंडन केले. भौगोलिक आधारावर देशाच्या विकासासाठी तयार केलेला हा अर्थसंकल्प आहे. देशाच्या स्थैर्यांचा हा अर्थसंकल्प आहे, असे त्या म्हणाल्या.

अर्थसंकल्पीय भाषणात काही राज्यांचे नाव मी घेतले नाही, याचा अर्थ त्या राज्यांसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली नाही, त्यांच्यावर अन्याय करण्यात आला, असा होत नाही, असे स्पष्ट करीत सीतारामन् यांनी संपुआ शासनकाळात अर्थसंकल्पीय भाषण करताना तत्कालीन अर्थमंत्र्यांनी किती राज्यांचे नाव घेतले होते, याचा आराखडा सादर केला. २००४-०५ चा अर्थसंकल्प सादर करताना १७ राज्यांचे नाव घेतल्या गेले नव्हते. २००५-०६ चा अर्थसंकल्प सादर करताना १८ राज्यांचा उल्लेख झाला नव्हता. २००९-१० चा अर्थसंकल्प सादर करताना बिहार आणि उत्तरप्रदेशचे नाव घेण्यात आले नव्हते. याचा अर्थ त्या राज्यांसाठी आर्थिक तरतूद केली नाही, असा होत नाही. भाषणात भाषणात नाव न घेतलेल्या राज्यांसाठी अर्थसंकल्पात किती तरतूद करण्यात आली, याचा आराखडा त्यांनी यावेळी सादर केला. ◂(तभा वृत्तसेवा)

### बीएसईचे भांडवल प्रथमच ५.५ ट्रिलियन डॉलर्सवर



◆ **मुंबई, ३० जुलै**

भारतीय शेअर बाजाराने मंगळवारी एक नवा टप्पा गाठला. मुंबई शेअर बाजार अर्थात् बीएसईवरील सर्व सूचीबद्ध कंपन्यांच्या बाजार भांडवलाने आज विक्रमी उच्चांक नोंदवला. बीएसईत सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल पहिल्यांदाच ५.५ ट्रिलियन डॉलर्सवर गेले.

या वर्षाच्या सुरुवातीला बीएसईचे भांडवल ४.२ ट्रिलियन डॉलर्सवर होते. पण, बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांसह सेन्सेक्स आणि व्यापक बाजारांतील तेजीमुळे बाजार भांडवलात यंदा आतापर्यंत २२.६ टक्के वाढ झाली आहे.

दरम्यान, सेन्सेक्स ९९ अंकांच्या वाढीसह ८१,४५५ वर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २१ अंकांच्या किरकोळ वाढीसह २४,८५७ वर स्थिरावला. ◂(वृत्तसंस्था)

# ८१ हजार कोटींच्या सात गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी

● विदर्भ, मराठवाडा, कोकणात २० हजार रोजगार निर्मिती ● इलेक्ट्रिक वाहने, लिथियम बॅटरी, सेमीकंडक्टर प्रकल्पांचा समावेश

◆ **मुंबई, ३० जुलै**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ बैठकीत ८१,१३७ कोटी रुपयांच्या विशाल सात प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यात उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रिल व्हेईकल, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मिती प्रकल्पांचा समावेश असून, विदर्भासह मराठवाडा, कोकणात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे राज्यात सुमारे २० हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत आदी उपस्थित होते. राज्यात उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत विविध प्रोत्साहने जाहीर करण्यात आलेली आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

### प्रकल्पांची माहिती अशी

- २५,००० कोटींच्या गुंतवणुकीतून नागपुरात होणार जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेव्हन लि.चा लिथियम बॅटरी निर्मिती प्रकल्प. पाच हजारांपेक्षा जास्त रोजगारनिर्मिती.
- १३,६४७ कोटींच्या गुंतवणुकीतून नागपूर, रायगडात आवाडा इलेक्ट्रो कंपनीचा सोलर पीव्ही मॉड्युल्स, इलेक्ट्रोलायझरचा प्रकल्प. आठ हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती.
- २७,२०० कोटींच्या गुंतवणुकीतून छ. संभाजीनगर येथे जेएसडब्ल्यू लि.चा इलेक्ट्रिक आणि हायब्रीड वाहन निर्मितीचा प्रकल्प.



५२०० पेक्षा अधिक रोजगार निर्मिती. दरवर्षी पाच लाख इलेक्ट्रिक कार, एक लाख व्यावसायिक कारची निर्मिती.

- १५०० कोटींच्या गुंतवणुकीतून रत्नागिरीत हिंदुस्थान कोका कोला बेव्हरेजचा फळांचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन प्रकल्प.
- पुण्यातील तळोजा, रायगडातील पनवेल व इतर ठिकाणी आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचा सेमीकंडक्टर चिप्स निर्मितीचा प्रकल्प.



- १२,००० कोटींच्या गुंतवणुकीतून नवी मुंबईत सेमीकंडक्टर प्रकल्प. चार हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती.
- १,७५८ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून परनॉर्ड रिकार्ड इंडियाचा मद्यार्क निर्मितीचा प्रकल्प. ■



वायनाड येथे मंगळवारी पहाटे महाविनाशी भूस्खलन झाले. चार गावे यात उद्ध्वस्त झाली. यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी लष्कर आणि एनडीआरएफचे जवान युद्धपातळीवर प्रयत्न करीत आहेत

# वायनाडमध्ये भूस्खलन; १०८ जणांचा मृत्यू

### एका रात्रीत झाले होत्याचे नव्हते
### लष्कर, एनडीआरएफला पाचारण

◆ **वायनाड, ३० जुलै**

केरळातील वायनाड जिल्ह्यातल्या डोंगराळ परिसरात घडलेल्या भूस्खलनाच्या मालिकेत एका रात्रीत होत्याचे नव्हते झाले. येथे किमान १०८ जणांचा मृत्यू आणि ११८ जण जखमी झाले. मलब्याखाली अनेक लोक दबले असल्याने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या वाढू शकते, अशी भीती वर्तवण्यात आली.

मंगळवारी पहाटेच्या सुमारास चोरपावलांनी आलेल्या काळाने झोपेत असलेल्या लोकांना कवेत घेतले. मदतीसाठी आर्तपणे विनवण्या केल्या जात होत्या, तर बचाव पथकातील सदस्य लोकांना वाचवण्यासाठी वेळेच्या विरुद्ध जीवाच्या आकांताने प्रयत्न करीत असल्याचे दृश्य येथे होते.

जिल्हाधिकारी मेघश्री डी. आर. यांनी दिलेल्या माहितीनुसार, या भूस्खलनाच्या मालिकेत मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १०८ झाली. चुरलमला येथे किमान ३६ जणांचा मृत्यू भूस्खलनात झाला. या व्यतिरिक्त मल्लपुरम् येथून वाहणाऱ्या चालियार नदीतून वाहून जात असलेले नऊ मृतदेह बाहेर काढण्यात आले. .

**एनडीआरएफ, लष्कराचे हेलिकॉप्टर दाखल**

बचावमोहीम राबविण्यासाठी एनडीआरएफसोबत लष्करालाही पाचारण करण्यात आले. एनडीआरएफ तसेच लष्कराच्या दोन हेलिकॉप्टर्स मुंडक्काई येथे पाठवण्यात आली. भूस्खलनामुळे या परिसराचा संपर्क पूर्णतः तुटला आहे. एनडीआरएफचे एक पथक मलबा हटवण्याच्या कार्यात आणि मुडक्काईचा मार्ग खुला करण्यात गुंतले आहे, अशी माहिती केरळचे महसूल मंत्री के. राजन यांनी दिली.

**पूल कोसळल्याने संपर्क तुटला**

मुडक्काल हे डोंगराच्या पायथ्याशी असलेले गाव आहे. येथे जाण्यासाठी असलेला पूल कोसळल्याने या गावाचा संपर्क पूर्णतः तुटलेला आहे. आता अस्थायी स्वरूपाचा पूल तातडीने उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

### मनसे सैनिकांनी फोडली आमदार मिटकरींची गाडी

◆ **अकोला, ३० जुलै**

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांच्यावर केलेल्या टीकेला आमदार अमोल मिटकरी यांनी प्रत्युत्तर दिले होते. त्यावरून मनसे व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद झाला. मंगळवारी मनसे सैनिक आक्रमक होऊन त्यांनी घोषणाबाजी करीत आमदार मिटकरी यांची कार फोडली. मिटकरींनी सिव्हिल लाईन्स पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर मनसेच्या १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे येथे राज ठाकरे यांनी 'उपमुख्यमंत्री नसतानाही धरणं भरली,' अशी टीका अजित पवारांवर केली होती. त्यावर आमदार मिटकरी यांनी राज ठाकरेंना सुपारीबाज, विश्वासार्हता संपलेले नेते, असे म्हटले. त्यामुळे मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद झाला. यात मनसे सैनिकांनी आज, मंगळवारी विश्रामगृह परिसरात घोषणाबाजी करीत अमोल मिटकरी यांची गाडी फोडली. दरम्यान, मनसेचे कार्यकर्ते शासकीय विश्रामगृहाबाहेर उभे होते. त्यांनी माझ्यावर अचानक हल्ला केला. असे मागून हल्ले करून काही होणार नाही. अशी गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. याची पोलिस अधीक्षकांकडे तक्रार केल्याचे सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

### देशात केवळ तीनच टक्के जास्त पाऊस

◆ **नवी दिल्ली, ३० जुलै**

देशातील विविध भागांत सध्या पावसाचा जोर दिसत आहे. कुठे मुसळधार पावसामुळे पूरस्थितीही निर्माण झाली. मान्सूनचे दोन महिने आटोपले असून, आतापर्यंत केवळ सरासरीपेक्षा तीन टक्के जास्त पाऊस नोंदविण्यात आला.

मान्सून आतापर्यंत फक्त दक्षिण भारतावरच जास्त मेहेरबान झाला आहे. याच ठिकाणी सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. उत्तर आणि पूर्व भारतात १ जूनपासून सुरू झालेल्या मान्सूनने लोकांना निराश केले. येथे सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. मध्य भारतातही सामान्य पाऊस झाला. यावेळी सर्वाधिक पाऊस तामिळनाडूत नोंदविण्यात आला. ◂(वृत्तसंस्था)

### विदर्भात तीन दिवस पावसाचे

**मुंबई :** विदर्भात पुढील तीन दिवस पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागाने मंगळवारी वर्तवला. बुधवारी विदर्भातील सर्वच जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो वॉर्निंग दिली आहे. गुरुवारीही संपूर्ण विदर्भासाठी यलो वॉर्निंग दिली असून, विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी पाऊस होईल, असे हवामान विभागाने म्हटले आहे. चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोलीत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना शुक्रवारसाठी ऑरेंज वॉर्निंग, तर विदर्भातील उर्वरित जिल्ह्यांसाठी यलो वॉर्निंग आहे. ■

# चित्रा वाघ, विद्या चव्हाण यांच्यात रंगले 'ऑडिओ युद्ध'

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, ३० जुलै**

मूठ उघडायला लावू नका, नाही तर शरद पवार यांना त्रास होईल, असा सणसणीत इशारा विद्या चव्हाणांच्या आरोपांनंतर भाजपा नेत्या चित्रा वाघ यांनी दिला.

चित्रा वाघ यांनी माझ्या सुनेला भडकावले, आपल्यावर आरोप करायला लावले, असा आरोप विद्या चव्हाण यांनी पत्रपरिषदेत केला. त्यावेळी त्यांनी एक कथित ऑडिओ क्लिप ऐकवली. त्यामुळे पवार गटाच्या नेत्या विद्या चव्हाण आणि भाजपा नेत्या चित्रा वाघ यांच्यातील संघर्ष चव्हाट्यावर आला. विद्या चव्हाण यांच्या पत्रपरिषदेला चित्रा वाघ यांनी देखील पत्रपरिषद घेऊनच उत्तर दिले. विद्या चव्हाण माझ्याबद्दल चांगले बोलतील, ही अपेक्षा नाही. यापूर्वी वेगवेगळ्या बायकांना बसवून चित्रा वाघ कशी वाईट आहे, हे सांगण्याचा प्रयत्न त्यांच्या पक्षाने केला आहे. बऱ्याच मोठ्या गॅपनंतर माझ्यामुळे का होईना, विद्या चव्हाण यांचे दर्शन टीव्ही चॅनलला झाले, त्यांनी माझे आभार मानले पाहिजे, असा खोचक टोलाही चित्रा वाघ यांनी लगावला.

### आईसमान वहिनीचा विनयभंग केला

विद्या चव्हाण यांच्या लहान मुलाने आईसमान वहिनीचा विनयभंग केला. गौरी चव्हाण आणि वडिलांना मारहाण केली. त्यांनी पोलिसांत तक्रार केली. पण, विद्या चव्हाण यांच्या दबावामुळे पोलिसांनी हाकलून दिले. गौरी चव्हाण सर्व प्रश्नांचे जाणते राजे शरद पवारांकडे गेल्या. पण, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. असेही चित्रा वाघ यांनी सांगितले. आज एक लेकरू आईच्या कुशीत आहे, त्यात खारीचा वाटा चित्रा वाघचा आहे, असा छाती ठोक दावाही वाघ यांनी केला.



### विद्या चव्हाणांनी ऐकवली क्लिप

त्यापूर्वी विद्या चव्हाण यांनी पत्रपरिषद घेऊन चित्रा वाघ यांच्यावर आरोप केले. चित्रा वाघ यांनी माझ्या सुनेला भडकावले, आपल्यावर आरोप करायला लावले, असा आरोप त्यांनी केला. चव्हाण यांनी यावेळी एक कथित ऑडिओ क्लिप ऐकवली. आपल्याला बदनाम करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी चित्रा वाघ यांच्यावर जबाबदारी सोपवली असल्याचा दावा चव्हाण यांनी केला. फडणवीस यांच्या आदेशानुसारच चित्रा वाघ यांनी आतापर्यंत सर्व काही केले, असे त्या म्हणाल्या.






## संक्षिप्त वृत्त



### आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान

**करमाळा, दि.३० जुलै-**

रयत शिक्षण संस्थेचे श्रीमती रामबाई बाबुलाल सुराणा विद्यालय चिखलठाण येथील सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती धारक विदयार्थी व सारथी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी यांचा सन्मान आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते करण्यात आला. निमित्त होते कुगाव ते जेऊर या रस्ता भूमिपूजन प्रसंगाचे या कार्यक्रमाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र कुमार बारकुंड यांनी या विद्यार्थ्यांचा सन्मान घडवून आणला. प्रत्येक विद्यार्थ्याला शाल, सन्मानचिन्ह व आमदार संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त वही भेट असे या सन्मानाचे स्वरूप होते. धनश्री जाडकर, आदर्श बोराडे हे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी तसेच सारथी शिष्यवृत्ती धारक श्रावणी गुटाळ, जानवी गुटाळ, प्रणाली सरडे, स्नेहल गलांडे, अक्षदा सरडे, प्रणवी गव्हाणे, प्रणाली सरडे, साक्षी ढवळे, प्रतिक्षा पाटील, शिवराज पवार, शंभुराजे डोंगरे, शंभुराजे सुपेकर, आदर्श पाटील या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना प्रति वर्ष नऊ हजार सहाशे रुपये असे चार वर्षासाठी प्रति विद्यार्थी ३८ हजार ४०० रुपये शिष्यवृत्ती म्हणून मिळणार आहेत तर आठवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना ८००० ते तीन वर्ष प्रत्येकी २४ हजार रुपये मिळणार आहेत.



### बोरगाव येथे शिक्षण परिषद उत्साहात

**अक्कलकोट, दि. ३० जुलै-**

अक्कलकोट तालुक्यातील जि प प्रा मराठी शाळा बोरगाव (दे) येथे भुरीकवठे केंद्राचे केंद्रप्रमुख बापूराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण परिषद संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश गुरव,माजी सरपंच विलासराव सुरवसे,मुख्याध्यापक विजय थोरात, महादेव विद्या मंदिरचे मुख्याध्यापक प्रभाकर बंदीछोडे, मुख्याध्यापक अरुण पाटील, चंद्रकांत बटगेरी, नबीसाब नदाफ उपस्थित होते. मागील शिक्षण परिषद मागोवा घेत केंद्रप्रमुख बापूराव चव्हाण यांनी माहिती सांगितली. चंद्रकांत बटगेरी यांनी विविध विषयावर माहिती दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक विजय थोरात, बशीर बागवान,शिवाजी धर्मसाले, चनबसप्पा कलबुर्गी, शिवानंद पाटील, प्रशांत वागदरीकर,वर्धमान गायकवाड, अ. मुजीब जुनैदी उर्दू, हिमायत पिरजादे अध्यक्ष बापूराव चव्हाण, प्रमुख पाहुणे सतिश गुरव, सरपंच विलासराव सुरवसे, निरोप व सत्कारमूर्ती महादुरय्या बगले, मनिषा वाघमारे, इस्माईल मुर्डी, रत्नाकर गायकवाड, गंगाधर जिरगे, शरणप्पा कल्याणी, हैदर पठाण, मुस्तफा ताची, सुभाष हडपद, शाहमदार जमादार, राहुल कोळी, सुनील कोरे यांच्यासह गावकाऱ्यांनी सहकार्य केले.




### शिंदेवस्ती जि.प. शाळेत शिक्षण सप्ताह

**नातेपुते, दि.३० जुलै-**

शिंदेवस्तीच्या जिल्हा परिषद शाळेत दि. २३ ते २८ जुलै या कालावधीत वैशिष्टय पूर्ण शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. दि.२२ जुलैपासून अध्ययन अध्यापन साहित्य दिवस टीएलएम डे एफएलएन डे, स्पोर्ट डे, कॅल्क्युलेटर डे, डिजिटल अँड स्कायलिंग डे व इको क्लब या संदर्भाने शैक्षणीक साहित्य प्रदर्शन, निर्मिती, निपुण प्रतिज्ञा, गणितीय खेळ, देशी खेळ, पारंपरिक वेशभूषा, रॅम्प वॉक, नृत्य, कागदकाम, मातकाम इ. उपक्रम राबविले गेले आहेत. जि.प. शाळा शिंदेवस्ती पिंपरी येथे इको क्लब स्थापन करून त्यांच्यामार्फत शिखर शिंगणापूर डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या लोनारणाबा देवस्थान टेकडी परिसरात ८ प्रकारच्या वृक्षांच्या एक हजार बियांचे सीड बॉल बनवून उंच डोंगरावरील दरीत व वनविभागाने खोदलेल्या चारींमधून टाकण्यात आले. पर्यावरण पूरक उपक्रमाचे नियोजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर शिंदे, उपाध्यक्षा वंदनाताई कर्चे व सर्व सदस्यांनी केले. मुख्याध्यापक राजेंद्र ढोबळे, सहकारी शिक्षिकाआदट व क्रीडा शिक्षक सुधाकर व सय्यद यांनी परिश्रम घेतले.

### मोडनिंब सोसायटीच्या चेअरमनपदी जयसिंह पाटील

**मोडनिंब, दि.३० जुलै-**

मोडनिंब (ता.माढा) येथील मोडनिंब विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन पदी जयसिंह पाटील यांची बिनविरोध निवड झाली. व्हाइस चेअरमनपदी पोपट जाधव यांची निवड झाली. निवड निर्णय अधिकारी कोळी, देशमुख भाऊसाहेब यांनी काम पाहिले. यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, उपसरपंच अमित कोळी, बाबुराव सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य कैलास तोडकरी, कुरण गिड्डे, दत्तात्रय सुर्वे, बालाजी पाटील, सोमनाथ माळी, संचालक औदुंबर सुर्वे, माधव सुर्वे, उद्धव सुर्वे, कावेरी सुर्वे, विजय नामदे महाराज, संभाजी लादे, विजय खेलबुडे, सोमनाथ शिंदे, राजू पाटणे, चांगदेव वरवडे, विलास गायकवाड, राहुल पाटील, अतुल गाडे, आप्पा पाटील आदी उपस्थित होते. निवडीनंतर जयसिंह पाटील समर्थकांनी जल्लोष केला.



## पुणे, कोल्हापूर जिल्ह्याच्या धर्तीवर सोलापूर

# जि.प.मध्ये सुरु होणार 'ईएमबी' प्रणाली

### ठेकेदार, सरपंच, ग्रामसेवकांतून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

राज्यातील इतर जिल्ह्याप्रमाणे सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत असलेली विकासकामे करणाऱ्या अवेक्षकाने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन केलेल्या एमबी (मोजमाप पुस्तिका) आता थेट ऑनलाईन करण्यात येणार असल्याने जिल्ह्यातील ठेकेदार, सरपंच व ग्राम सेवकांसातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

राज्यातील जिल्हा परिषदांना कामाची गती वाढविण्यासाठी ई-ऑफिस प्रणालीचा वापर करण्यासंबंधी सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे राज्यातील बऱ्याच जिल्हा परिषदांनी यावर काम सुरू केले आहे. सोलापूर



जिल्हा परिषदेने ई टपाल, ई-फायलिंग ही सिस्टीम सुरू केली आहे. यामुळे कामाची गती वाढली आहे. जिल्हा परिषदेकडे विकास कामे मोठ्या प्रमाणावर असतात. यात आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण, समाज कल्याण आणि ग्रामपंचायत विभागाची बांधकामे या विकास कामाचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. त्याचप्रमाणे लघुपाटबंधारे विभागाकडून छोटे तलाव, बंधारा यांची कामे केली जातात. या सर्व कामाची अंमलबजावणी बांधकाम विभागामार्फत केली जाते. कामांची मोजमापे घेऊन जिल्हा परिषदेला फाईल सादर करण्यासाठी या अवेक्षकांना बराच वेळ जातो. त्यामुळे वेळेवर बिले मिळत नाहीत. त्यासाठी ठेकेदार, सरपंच, ग्रामसेवक हेच एमबीची फाईल घेऊन झेडपीत हेलपाटे मारताना दिसतात. याला कालावधी लागत असल्याने ठेकेदारांच्या हातात वेळेवर पैसे पडत नाहीत. त्यामुळे हे काम जलद गतीने होण्यासाठी आता 'ईएमबी' चा नवीन प्रयोग पुणे व कोल्हापूर जिल्हा परिषदेने केला आहे. सोलापूर जिल्हा परिषदेने याबाबत चाचपणी सुरू केल्याचे सांगण्यात आले. जिल्हा परिषद प्रशासनाने याची अंमलबजावणी केल्यास ठेकेदार, सरपंच, ग्रामसेवकांची सोय होणार आहे. दरम्यान, ही प्रणाली जिल्हा परिषदेत राबविण्यात येणार असल्याने जिल्ह्यातील काही लोकप्रतिनिधींनीही समाधान व्यक्त केले आहे.

## अक्कलकोटमध्ये संपूर्णत: अभियानांतर्गत महिला मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

नीति आयोग, भारत सरकार कडून ४ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी देशाच्या दुर्गम भागात असलेल्या ११२ आकांक्षी जिल्हा व ५०० आकांक्षी तालुक्यामध्ये 'संपूर्णता अभियान' ही तीन महिन्यांची मोहीम सुरु करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यातील सांगोला व अक्कलकोट तालुक्याचा समावेश असल्याने केंद्रीय संचार ब्युरो, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, सोलापूर, जिल्हा आर्थिक विकास महामंडळ आणि श्री स्वामी समर्थ लोकसंचलित साधन केंद्र यांच्या सयुंक्त विद्यमाने दि. ३१ जुलै रोजी कांतामाती श्री विजयसिंह राजे भोसले मंगल कार्यालय, मैंदर्गी रोड, अक्कलकोट येथे सकाळी १२ ते ४ यावेळेत संपूर्णता अभियाना वर महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण यांनी दिली आहे. यामध्ये महिलांसाठी पोषण आहार विषयी मार्गदर्शन, आरोग्य शिबीर, बचत गटांचे स्टॉल, प्रश्नमंजुषा स्पर्धा, बक्षीस वितरण इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देशाच्या दुर्गम भागात असलेल्या ११२ आकांक्षी जिल्हा व ५०० आकांक्षी तालुक्यातील महिलांचे आरोग्य तपासणी शिबीर, पूरक पोषण आहार विषयी गर्भवती महिलांना मार्गदर्शन, बाळांचे संपूर्ण लसीकरण करणे, मृदा नमुना संकलन करून मृदा आरोग्य पत्रिकाचे वाटप करणे आणि महिला बचत गटांचे सक्षमीकरण करणे आदी उपक्रमांचे या अभियानात समाविष्ठ करण्यात आले आहे. सदर मेळाव्याचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा समन्वयक सोमनाथ लामगुंडे आणि क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव यांनी केले आहे.



## हनुमान विद्यामंदिरात शिक्षण सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० जुलै-**

श्री हनुमान विद्यामंदिर, विद्यालयात महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद सोलापूर यांच्या आदेशानुसार शिक्षण सप्ताह उपक्रम साजरा करण्यात आला.

श्री स्वामी विवकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर चे संस्थापक प.पू.डॉ.बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक एस.जी. कोणदे यांच्या हस्ते करुन शिक्षण सप्ताह कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक एस.जी.कोणदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी ज्ञान, विज्ञान व सुसंस्कार व तंत्रज्ञानाच्या माहितीबरोबरच खेळ, कला, व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम आत्मसात करून आपले आयुष्य उज्वल करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यावेळी पर्यवेक्षक ए.एम. हत्तूरे, अमोल भावसार, पंडीत कुंभार, श्रेयस पाटील, श्रीमती एन.एस.राऊत, सुप्रिया जामगे, विजय जाधव, चाबुकस्वार आदींनी परिश्रम घेतले.

## तृतीयपंथी समुदायाला लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळावा

### बार्शीचे सचिन वायकुळे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० जुलै-**

राज्यातील तृतीयपंथी समुदायाला 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी तृतीयपंथी मार्गदर्शक सचिन वायकुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून केली आहे.



या मागणीच्या निवेदनात वायकुळे यांनी म्हटले आहे की, आजवर महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने तृतीयपंथी (पारलिंगी) यांना आधारकार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र मिळवून देण्यात त्यांना यश आले. परिणामी बार्शीत यंदा लोकसभेला प्रथमच तृतीयपंथीयांनी मतदानाचा हक्कही बजावला. राज्य शासन व राज्य निवडणुक आयोगाच्या सकारात्मक भूमिकेचा अधिक तर हा परिणाम आहे. नुकतेच महाराष्ट्रात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेची घोषणा व अंमलबजावणी सुरु केली. पाठोपाठ 'लाडका भाऊ' योजनेही घोषणा केली. या पार्श्वभूमीवर राज्यातील तृतीयपंथी समुदाय मात्र संभ्रमित आहे. शासन म्हणून मुख्यमंत्र्यांनी आजवर या समुदायचा गांभीर्याने विचार केला आहे. तसाच विचार या योजनेबाबतीत कसा करता येईल व त्यांना लाभ कसा मिळेल याबाबतीत शासनाने धोरण निश्चित करावे, अशी विनंती वायकुळे यांनी केली आहे. वंचित म्हणून या घटकाडे पाहत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन म्हणून मुख्यमंत्र्यांनी घेतलेले निर्णय, आखलेली धोरणे राज्यातील तृतीयपंथी समुदायाला आधार देणारी आहेत. आजच्या स्थितीला ४५ हजारांच्या घरात या समुदायाची संख्या आहे. हे निवेदन बार्शी, सोलापूर व राज्यातील सर्व तृतीयपंथी समुदायाच्यावतीनेच सचिन वायकुळे यांनी दिले आहे.

राज्यातील तृतीयपंथी (पारलिंगी) समुदायाला 'मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ कसा देता येऊ शकेल याबाबत ई-मेलद्वारे मागणी केली आहे. बार्शीचे सामाजिक कार्यकर्ते तथा लेखक सचिन वायकुळे हे मागील आठ वर्षांपासून बार्शीसह सोलापूर जिल्ह्यातील तृतीयपंथी (पारलिंगी) समुदाय व वेश्या महिला या घटकांसाठी स्वइच्छेने काम करत आहेत.

## स्वस्त धान्य दुकानदार संघटनेची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांबरोबर बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३० जुलै-**

पंढरपूर, सांगोला, माढा, बार्शी, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, करमाळा, मोहोळ तालुक्यांचे कमिशनसाठी महासंघ जिल्हा संघटनेची व जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यामध्ये विविध विषयावर चर्चा झाली. या बैठकीतील संघटनेतून आलेल्या प्रश्नांचा निपटारा लवकरात लवकर केला जाईल, असे आश्वासन यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिले.

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटनेकडुन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांची भेट संघटनेचा वतीने घेण्यात आली व भेटी दरम्यान धान्य दुकानदार यांच्या विविध अडचणी बाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये राहिलेले तालुक्यांचे कमिशन बाबत प्राधान्याने चर्चा करण्यात आली व नोव्हेंबर डिसेंबर २०२२ रोजी धान्य दुकानदार यांनी चलनाने केलेला भरणा तात्काळ मिळावा याबाबत मागणी केली.तसेच सध्या ऐरणीवर वर असलेला मशीन बाबतचा मुद्दा व धान्य दुकानदारांना होणारा त्रास या बाबत चर्चा



झाली. यापुढील काळात तहसील कार्यालयमधून कोणतीही माहिती मागणी न करता कमिशन हे ऑनलाइन एईपीडीएस प्रणाली वरून थेट जिल्हा पुरवठा कार्यालयामधून जमा व्हावे हि मागणी करण्यात आली. तसेच काही दुकानदारांची मागील राहिलेली कमीशन याविषयी चर्चा करण्यात आली. यावर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी संगितले कि आज किंवा उद्या तीन तालुक्यांचे कमिशन जमा होईल व दुसऱ्या दिवशी नंतर राहिलेलं तालुक्यांचे कमिशन जमा होईल. व नोव्हेंबर डिसेंबर चलनानी केलेला भरणा या बाबत कोणत्याही तहसील कार्यालयाकडून माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.ती आल्यानंतर तात्काळ ती सुद्धा जमा करून टाकु.मशीन बाबतचे अडचण ही संपूर्ण राज्यभर चालू आहे.मशीन चालू झाल्यानंतर अधिकृतरित्या कार्यालयाकडून कळवले जाईल. कोणत्याही रेशन कार्ड धारकाचे धान्य बुडणार नाही याबाबत धान्य दुकानदार यांनी मशीनचे फोटो काढून वारंवार ग्रुपवर टाकू नयेत अशी सूचना दिली आहे. यावेळी उपस्थित सर्व तालुका अध्यक्ष, उपाध्यक्ष व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ट्रॅक्टर चालकास बलात्कार प्रकरणी दहा वर्ष कारावासाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जुलै**

बलात्कारप्रकरणी ट्रॅक्टर चालक ज्योतीराम सपकाळ यास दहा वर्ष कारावासाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी दहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आहे.

वैराग पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्याची हकीकत अशी की, मौजे घाणेगाव येथील फिर्यादीचे वडील यांनी माहे एप्रिल २०१२ मध्ये ट्रॅक्टरने नांगरुन लेवल करण्याचे ठरवले होते. त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या शेतात ट्रॅक्टरने नांगरुन लेवल करण्यासाठी भाडयाने यातील आरोपी ज्योतीराम बाळासाहेब सपकाळ (वय ३६, रा. साकत) यास सांगून पुणे येथे कामासाठी गेले. त्यानंतर आरोपी सपकाळ याने माहे मे २०१२ पासून ते २०१३ चे दिवाळीपर्यंत वेळोवेळी फिर्यादीच्या घरात फिर्यादी एकटीच असतांना ट्रॅक्टरचे राहिलेले भाडयाचे पैसे मागण्याचे निमित्त करुन फिर्यादीच्या घरी जाऊन फिर्यादी घरात एकटीच असल्याचे पाहून घरात जाऊन बळजबरीने बलात्कार केला.

फिर्यादीने आरोपी सपकाळ याचे विरुद्ध वैराग पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवला. त्यानंतर तपासी अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिदास पवार, उपविभाग बार्शी यांनी आरोपीस ताब्यात घेऊन सबळ पुरावा गोळा करुन आरोपीविरुद्ध



न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. त्यानंतर सदर खटल्याची सुनावणीमध्ये फिर्यादी पिडिता व डॉक्टर याची तसेच फिर्यादीचे आई-वडील यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

सरकार पक्षाच्यावतीने ११ साक्षीदार तपासण्यात आले. तसेच तपासी अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिदास पवार यांनी तपासा दरम्यान गोळा केलेले पुरावे हे सरकारी वकील यांनी न्यायालयासमोर मांडले. सरकारी पक्षाचा पुरावा याचा विचार करता आरोपी सपकाळ यास भादंवि कलम ३७६ अन्वये दोषी धरुन दहा वर्षाचा सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंड तर दंड न भरल्यास एक महिन्याचा कारावास अशी शिक्षा दिली.

सरकार पक्षातर्फे सरकारी वकील अॅड. प्रदीप बोचरे यांनी काम पाहिले. सदर केसमध्ये जालिंदर नालकुल, उपविभागीय पोलीस अधिकारी व निवृत्ती मोरे, पोलीस निरीक्षक वैराग यानी वेळोवेळी मार्गदर्शन केले. सदर गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिदास पवार उपविभाग बार्शी यांनी केला होता. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोहेकॉ कुणाल पाटील यांनी काम पाहिले.

# कामाचा व हक्काचा माणूस : धनराज शिंदे

**तभा वृत्तसेवा । सोमनाथ शिंदे**
**कुर्डूवाडी, दि.३० जुलै-**

माढा वेल्फेअर फाऊंडेशन, निमगाव (टे.) या संस्थेचे अध्यक्ष धनराजदादा शिंदे यांनी महत्त्वाकांक्षी कुर्डू बेंद ओढा खोलीकरण व रुंदीकरण प्रकल्पाचे काम पूर्ण केल्याने बासष्ठ हजार एकर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे.याचा थेट फायदा शेतक-यांना होणार असून शासनाने बेंद ओढ्यात पाणी सोडण्याचा निर्णयच यामुळे शक्य झाला आहे. सुमारे ३४.५ कि.मी. लांबीच्या या ओढ्याचे खोलीकरण व रुंदीकरण धनराज शिंदे यांच्या प्रयत्नाने प्रुण झाले आहे. धनराज शिंदे यांनी शेतकरी हित लक्षात घेवूनच पाण्यापासून वंचित राहीलेल्या आणी सतत दुष्काळाने त्रस्त राहीलेल्या भागाला पाणी मिळवून देण्यासाठी आपली पुर्ण सामाजीक व राजकीय ताकत वापरून तसेच राज्यात प्रथमच लोकसहभाग, सरकारी संस्था आणि खासगी संस्था यांच्या भागीदारीतून हे काम हाती घेवून पुर्ण केल्याने तालुक्यातील सुमारे ६२ हजार एकर क्षेत्राला याचा थेट फायदा होणार आहे. हा प्रकल्प राज्यातच नव्हे तर देशात एक आदर्शवत ठरला गेला आहे. याबरोबरच





सामाजीक कामातून, माढा वेल्फेअरच्या माध्यमातून धनराज शिंदे यांनी अनेकांना मदतीचा हात दीला आहे यातूनच त्यांचे तरूण नेतृत्व म्हणून माढा तालुक्यात पुढे आले. म्हणूनच धनराज शिंदे आपला माणूस,कामाचा माणूस म्हणूनच नावारुपाला आले.

वेल्फेअर फाऊंडेशनचे अध्यक्ष धनराज शिंदे यांच्या नेतृत्वाखालील या प्रकल्पाला जिल्हा परिषद सोलापूर, नाम फाऊंडेशन, पुणे, मुकुल माधव फौंडेशन, पुणे यांनी व यासारख्या इतर काही खासगी संस्थांचे अत्यंत मोलाचे आर्थिक सहकार्य लाभले आहे. माढा तालुक्याचे आमदार मा. बबनदादा शिंदे व करमाळा तालुक्याचे आमदार संजयमामा शिंदे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करत शासन स्तरावर या प्रकल्पासाठी पाठपुरावा करुन आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता केल्याने हा अवघड प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यात यश आले असले तरी अत्यंत कमी वयात शेतकरी हीतासाठी आपणही काहीतरी केले पाहीजे या जाणीवेतून आणी भावणेतून हाती घेतलेले काम वेळप्रसंगी पदरमोड करत पुर्ण केल्याच्या भावना शेतक-यांनी व्यक्त केल्यानेच आ.बबनराव शिंदे यांच्या इतकेच महत्व आज धनराज शिंदे यांना सर्वसामान्यातून मिळत आहे.त्यामुळे त्यांच्याकडे तालुक्यातील जनतेचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलला असून नेक्ष्ट नेतृत्व म्हणूनही ओळखले जाते.

शेतकऱ्यांनी बहुमोल सहकार्य केल्यानेच प्रकल्पाचे काम वेगाने करण्यात आपली संस्था यशस्वी झाली. या प्रकल्पाचा लाभ ढवळस, पिंपळखुटे, चौभेपिंपरी, कुई, कुडूवाडी, भोसरे, वडाचीवाडी, रणदिवेवाडी, वडशिंगे, उंदरगाव, महातपूर या गावांना होत असून या गावांतील लोकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला असून ओढ्यालगतच्या सुमारे ६२ हजार एकर क्षेत्राला पाणी उपलब्ध होणार आहे. या कामामुळे बेंद ओढ्याला सध्या पावसाळ्यात नदीचे स्वरूप येते ही शेतक-यासाठी आनंदाची व जमेची बाजू आहे.

## संक्षिप्त वृत्त



### नूतन राज्यपालांचा आज शपथविधी; बैस यांना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून निरोप

**मुंबई, दि.३० जुलै:**

अरे का महाराष्ट्राचे नूतन राज्यपाल पीसी राधाकृष्णन बुधवारी (दि.३१जुलै)कार्यभार स्वीकारणार आहे. सायंकाळी साडेसहा वाजता राजभवनात त्यांचा शपथविधी होणार आहे. दरम्यान आपला कार्यकाळ पूर्ण करीत असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांचा आज महाराष्ट्र शासनातर्फे राजभवन येथे भावपूर्ण निरोप देण्यात आला. राज्यपालांच्या कक्षात झालेल्या एका छोटेखानी सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यपाल बैस व त्यांच्या पत्नी रामबाई बैस यांचा शाल व भेटवस्तू देऊन सत्कार केला. आपल्या कार्यकाळात राज्य शासनाकडून उत्तम सहकार्य मिळाल्याबद्दल राज्यपालांनी सर्वांचे आभार मानले. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी देखील राज्यपालांचे वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. यावेळी पालकमंत्री दीपक केसरकर, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, अतिरिक्त मुख्य सचिव राजशिष्टाचार मनिषा म्हैसकर आदी उपस्थित होते. नवे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा शपथविधी दरबार हॉल राजभवन मुंबई येथे बुधवार दिनांक ३१ जुलै रोजी संध्याकाळी ६.३० वाजता होणार आहे.

### नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाकडून कायमस्वरूपी वैद्यकीय जामीन मंजूर

**मुंबई, दि.३० जुलै-**

महायुती सरकारमधील सहभागी राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे आमदार नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. त्यांना कायमस्वरूपी वैद्यकीय जामीन दिला आहे. उच्च न्यायालय निकाल देईपर्यंत मलिक यांचा वैद्यकीय जामीन कायम राहणार आहे. सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) वकिलांनीही मंगळवारी याबाबत आम्हाला कोणतीही शंका




नसल्याचे सुप्रीम कोर्टात स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयातील न्या. बेला त्रिवेदी यांच्यासमोर आज सुनावणी झाली. डी गँगशी संबंधित नातेवाईकांच्याकडून मालमत्ता विकत घेतल्याप्रकरणी नवाब मलिक यांच्याविरुद्ध सीबीआय व ईडीने गुन्हा दाखल केला आहे. त्यांनी अनेक महिने तुरुंगात काढल्यानंतर पाच महिन्यापूर्वी वैद्यकीय कारणास्तव त्यांना जामीन मंजूर झाला आहे. नवाब मलिक यांनी तुरुंगातून बाहेर आल्यानंतर शरद पवार-अजित पवार राजकीय संघर्षात अजित पवार यांना साथ दिली आहे.

### पात्र लाभार्थ्यांना वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण होणार मोफत : छगन भुजबळ

**मुंबई, दि.३० जुलै-**

महायुती सरकारने मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला असून 'माझी लाडकी बहीण' योजनेसाठी पात्र असलेल्या महिला भगिनींना दरमहा १५०० रुपये आर्थिक सहाय्यासोबतच आता वर्षाला ३ घरगुती गॅस सिलेंडरदेखील मोफत देण्यात येणार आहेत. याबाबत मंत्री छगन भुजबळ यांच्या अन्न



व नागरीपुरवठा विभागाअंतर्गत या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. याबाबत आज शासन निर्णय निर्गमित झाला असून राज्यातील गोरगरीब कुटुंबांना याचा फायदा होणार आहे. देशातील स्त्रियांना धुरमुक्त वातावरणात जगता यावे, देशातील गरीब कुटूंबांना स्वयंपाकासाठी स्वच्छ इंधन पुरविणे, तसेच गरीब कुटुंबातील महिलांच्या आरोग्यमानात सुधारणा करुन स्त्री सक्षमीकरण करणे, या उद्देशाने केंद्रशासनाकडून पंतप्रधान उज्ज्वला योजना सन-२०१६ मध्ये सुरु करण्यात आली. सदर योजनेंतर्गत महाराष्ट्रातील पात्र कुटुंबांना गॅसजोडणी देण्याचे काम तेल कंपन्यांच्या सहकार्याने सुरु आहे. महाराष्ट्रात सद्यस्थितीत पंतप्रधान उज्ज्वला योजनेंतर्गत गॅसजोडणी घेतलेले तसेच, सदर योजनेच्या व्यतिरिक्त अन्य गरीब प्रवर्गातील गॅसजोडण्या असलेल्या काही लाभार्थ्यांना बाजार दराने गॅसजोडण्यांचे पुनर्भरण करणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही. तसेच, एक सिलेंडर संपल्यानंतर दुसरे सिलेंडर उपलब्ध होईपर्यंत स्वयंपाकाकरिता साधन उपलब्ध नसल्यामुळे, परिणामी ते वृक्षतोड करुन पर्यावरणास हानी पोहोचवित असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली होती.

### महायुती सरकार जनतेचे की सत्ताधारी आमदारांना खैरात वाटण्यासाठी?: वडेट्टीवार

**मुंबई, दि. ३० जुलै-**

सहकार भवन बांधण्यासाठी मुंबै बँकेला गोरेगावच्या आरे कॉलनी येथील पशू संवर्धन विभागाच्या मालकीची तीन एकर जागा देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तसा शासकीय आदेश सोमवारी दुपारी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाला होता. मात्र, काही वेळातच या आदेशाची प्रत शासनाच्या संकेतस्थळावरुन हटवण्यात आल्याने विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधत महायुती सरकार हे जनतेचे आहे की सत्ताधारी आमदारांना खैरात वाटण्यासाठी ?असा सवाल उपस्थित केला आहे. ते म्हणाले की, भाजप नेते प्रवीण दरेकर अध्यक्ष असलेल्या मुंबै बँकेला तीन एकर जमीन का देण्यात येत आहे.? महायुती सरकार हे जनतेच आहे की सत्ताधारी पक्षातील आमदारांना खैरात वाटण्यासाठी आहे.



आधी शासन निर्णय काढला, मग शासकीय संकेस्थळावरून का हटवला. महायुतीची चोरी जनतेपासून लपविण्यासाठी शासन निर्णय संकेतस्थळावरून हटवला आहे की निर्णय रद्द करण्यात आलेला आहे याबाबत सरकारने स्पष्टीकरण द्यावे.

# पाच दिवसांत उजनी निम्मे भरले

## शंभरी गाठण्याची आशा; गतवर्षीपेक्षा यावर्षी उजनी ६६ दिवस अगोदर ५० टक्के भरणार



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० जुलै -**

भीमा खोऱ्यात पुन्हा एकदा संततधार पावसाला सुरुवात झाल्याने खडकवासला धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. सायंकाळी ५ वाजता २५ हजार क्युसेक विसर्ग सुरू होता. तर बंडगार्डन येथून २५ हजार २१८ क्युसेक विसर्ग चालू होता. सध्या दौंड येथे २१ हजार ३२२ क्युसेक विसर्ग सुरू आहे.

सोलापूर, पुणे व अहमदनगर जिल्ह्यातील ३० लाख लोकसंख्या, २ लाख पशुधन, किमान ५० साखर कारखाने, २५ औद्योगिक वसाहती, अनेक जलसिंचन योजना, पिण्याच्या पाणीपुरवठा योजना यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणाचीपाणी पातळी मंगळवार सायंकाळपर्यंत ५० टक्के होणार आहे.

सोमवार सायंकाळी उजनी धरणाची पाणी पातळी ४२.०९ टक्के झाली आहे. गतवर्षीपेक्षा यावर्षी उजनी ६६ दिवस अगोदर ५० टक्के भरणार आहे. यावर्षी ७ जूनपासून उजनी धरणाची पाणी पातळी वाढण्यास सुरुवात झाली होती.तर भीमा खोऱ्यात सातत्याने पाऊस सुरू असल्याने ९ जूनपासून दौंड येथील विसर्ग कायम सुरू आहे. यामुळेच उजनी धरणाची पाणी पातळी झपाट्याने वाढू शकली. गेल्या आठवड्यात भीमा खोऱ्यातील धरण पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसामुळे सोमवारपासून उजनी धरणाची पाणी पातळी मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे.

### आठ दिवसांत ६३ टक्के पाणी

सोमवार दि. २२ जुलै रोजी सायंकाळी उजनी धरणाची पाणी पातळी वजा २१.३१ टक्के होती. गेल्या आठ दिवसांत ६३.०४ टक्के पाणी पातळी वाढली आहे. तर ५४.६९ टीएमसी पाणीसाठा ७ जूनपासून उजनी धरणात जमा झाला आहे. तर गेल्या आठ दिवसांत ३४.०९ टीएमसी पाणीसाठा वाढला आहे. १५ ऑक्टोबर २३ रोजी ६०.६६ टक्के भरले होते. २१ जानेवारी मृत साठ्यात गेले होते. तर ७ जून २४ पर्यंत यावर्षी वजा ५९.९९ टक्के इतके सर्वाधिक खाली गेले होते. शुक्रवार दि. २६ जुलै २४ रोजी शून्य टक्के पाणी पातळी झाली होती प्लसकडे वाटचाल केली होती.

पाच दिवसांत ५० टक्के भरत आले आहे. पानशेत धरणातून १५ हजार १३६ क्युसेक विसर्ग सुरू झाल्याने खडकवासला धरणातून विसर्ग सोडण्यात येत आहे. यामुळे मुळा-मुठा नदीद्वारे बंडगार्डन येथून मोठ्या प्रमाणात विसर्ग भीमा नदीत मिसळत आहे. सध्या चासकमान येथून ५ हजार १४५ क्यूसेक विसर्ग सुरू आहे.

# पंकज जयस्वाल यांचे आज करिअर विषयक व्याख्यान

## सोलापूर जनता बँकेतर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे आज (बुधवारी) सायंकाळी ५.३० वाजता शिवस्मारक सभागृहात विद्यार्थी आणि पालकांसाठी पंकज जयस्वाल यांचे करिअर विषयक मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. याप्रसंगी विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात सोलापूर जनता सहकारी बँकेचे सभासद आणि सेवकांच्या इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवंतांचा सत्कार बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे आणि संचालक मंडळाच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून या कार्यक्रमास बँकेचे सभासद आणि सेवकांच्या पाल्यांनी तसेच इतर विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन बँकेतर्फे करण्यात आले आहे.

# बार्शी तालुक्यात पुन्हा जोरदार पाऊस

**बार्शी :** बार्शी तालुक्यावर यंदा वरुण राजाची चांगलीच कृपादृष्टी असल्याचे दिसत आहे. मागील तीन दिवसापासून उघडीप दिलेल्या पावसाने आज पुन्हा एकदा दमदार हजेरी लावली. बार्शी शहर तालुक्यात दुपारनंतर तीन टप्प्यात पुष्य नक्षत्राच्या पावसाच्या सरी चांगल्याच बरसल्या. बार्शी तालुक्यात यंदा दमदारपणे पाऊस पडत आहे. जून महिन्यामध्ये सरासरीच्या अडीचपट तर जुलै महिन्यात देखील सरासरीच्या दुप्पट पाऊस तालुक्यात पडला आहे. तालुक्यातील सर्व लघु व मध्यम प्रकल्प तसेच पाझर तलाव बंधारे पूर्ण क्षमतेने भरुन वाहू लागले आहेत. पाऊस चांगला पडतो ही समाधानाची बाब असली तरी सरासरीपेक्षा दुप्पट पाऊस झाल्याने खरीप हंगामातील पिकाला याचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली असून हा पडत असलेला पाऊस शेतकऱ्यांसाठी नुकसानकारक ठरु लागला आहे.

# आमदारांवर भ्याड हल्ले करणाऱ्या मनसे सैनिकांवर कडक कारवाई करावी : परांजपे

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. ३० जुलै -**

महाराष्ट्रात आमदारांवर जर असे भ्याड हल्ले होणार असतील तर हल्लेखोर मनसेसैनिकांवर कडक कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

प्रदेश प्रवक्ते आमदार अमोल मिटकरी यांच्या गाडीवर जो भ्याड हल्ला मनसेच्या कार्यकर्त्यांनी केला त्याचा राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने तीव्र निषेध यावेळी परांजपे यांनी माध्यमांशी बोलताना केला. यावेळी प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे उपस्थित होते.

महाराष्ट्राने 'खळखटयाक'चे राजकारण नाकारलेले आहे. २००९ मध्ये १३ आमदार असलेला पक्ष, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अस्तित्व असलेला हा पक्ष २०२४ येतायेता केवळ एका आमदाराचा पक्ष आणि काही मर्यादित ठिकाणी राहिलेला आहे याची आठवण परांजपे यांनी करुन दिली आहे.

ज्या राज ठाकरे यांनी पिंपरी - चिंचवडचा विकास आमचे नेते अजित पवार यांनी केल्याची स्तुतीसुमने उधळली आहेत. त्यामुळे गजानन काळे यांची बौद्धिक पातळी कमी आहे म्हणून त्यांनी एकदा शिवतीर्थावर जाऊन राज ठाकरे यांची भेट घेऊन माहिती घ्यावी असा टोलाही परांजपे यांनी लगावला.

# सांगोल्यात लाडक्या बहिणीसाठी समिती गठीत

## अध्यक्षपदी आ.शहाजीबापू पाटील यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**सांगोला, दि. ३० जुलै -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सांगोल्यात समिती गठीत करण्यात आले असून या समितीच्या अध्यक्षपदी आ. शहाजीबापू पाटील यांची तर सदस्य सचिवपदी तहसीलदार संतोष कणसे यांची निवड झाली आहे. तसेच सदस्यपदी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी,गटविकास अधिकारी आनंद लोकरे,समाज कल्याण सहाय्यक अधिकारी महेश जाधव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी,बालविकास प्रकल्प अधिकारी अभिजित मेलाने,अंगणवाडी पर्यवेक्षिका राजश्री जंबेनाळ, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) चव्हाण तर अशासकीय सदस्यपदी डॉ. पियूष साळुंखे पाटील व शिवाजीराव गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविताना महिला भगिनींना सहजासहजी या योजनेचा लाभ मिळावा म्हणून शासनाकडून नवनवीन बदल केले जात आहेत.आता,या



योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी तसेच ही योजना प्रभावी व सुलभतेने राबविण्यासाठी शासनाने काही बदल केले आहेत.महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने नवा शासन निर्णय जारी करण्यात आला असून आता विधानसभा क्षेत्रनिहाय समिती नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे.त्यामुळे, विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातच महिला भगिंनींच्या अडचणींचा निपटारा होणार असून दोन अशासकीय सदस्यांचाही या समितीत समावेश केला आहे.



# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये १६४ प्रकरणे निकाली

## ६ कोटी १९ लाखांची शुल्क वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपर, दि.३० जुलै-**

तालुका विधी सेवा समितीच्यावतीने जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे दि.२७ जुलै रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये १६४ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये एकूण ६ कोटी १८ लाख ८० हजार ६५४ रुपयांची तडजोड झाली असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे प्रभारी अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. देसाई यांनी दिली.

लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित १९ हजार ९८९ प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली त्यामध्ये ५ कोटी ७० लाख ९८ हजाराची वसुली झाली तसेच दाखलपूर्व प्रकरणांमध्ये एकुण ३ हजार ९८० प्रकरणे ठेवण्यात आलेली होती त्यापैकी २६ प्रकरणांमध्ये ४७ लाख ८२ हजारांची वसुली करण्यात आली. या लोकअदालतीसाठी एकुण ५ पॅनलची व १ नियमित न्यायालयाचे व्यवस्था करण्यात आली होती. या पॅनलमध्ये जिल्हा न्यायाधीश एस बी देसाई, न्यायाधीश ए. ए. खंडाळे, न्यायाधीश एस एस चोपडा, न्यायाधीश श्रीमती के जे खोमणे, न्यायाधीश श्रीमती पी बी घोरपडे, व नियमित न्यायालयासाठी न्यायाधीश ए एस सोनवकर यांनी काम पाहिले. सदरच्या लोक अदालतीमध्ये न्यायाधीश एस.एस. चोपडा यांनी तब्बल ३२ वर्ष जुने असलेल्या दिवाणी प्रकरणात यशस्वीरित्या तडजोड घडवून प्रकरण निकाली काढले.

# मराठा आरक्षणाबाबत मोदी जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य : उद्धव ठाकरे

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३० जुलै:**

मराठा आरक्षणासाठी राजकीय नेत्यांना न बोलावता सर्व समाजातील लोकांना एकत्र बोलावून तोडगा काढला पाहिजे. आरक्षण देण्याचा अधिकार राज्याला नाही. हा अधिकार केंद्राचा असून त्याची मर्यादा केंद्र सरकारने वाढवली पाहिजे. मी माझे खासदार द्यायला तयार आहे. सर्वांनी मिळून पंतप्रधान मोदी यांच्याकडे जाऊया. तेथे जो निर्णय होईल तो आम्हाला मान्य असून त्या निर्णयाला आमचा पाठिंबा असेल, अशी स्पष्ट भूमिका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी मांडली.

मराठा आरक्षणावरुन राज्यातील वातावरण तापले आहे. राजकीय पक्ष आरक्षणाबाबत आपली भूमिका मांडत नसल्याने मराठा आंदोलक आक्रमक झाले असून मराठा क्रांती ठोक मोर्चाने मंगळवारी आक्रमक भूमिका घेत शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या 'मातोश्री' निवासस्थानाबाहेर आंदोलन केले. त्यानंतर मराठा आरक्षणाचे नेते रमेश केरे-पाटील यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेत निवेदन दिल्यानंतर ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत, मराठा आरक्षणावरून आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, सध्या राज्यात जाती-पातीत आणि समाजामध्ये भांडण लावून काहीजण आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करतायेत. मराठा आरक्षणासाठी राजकीय नेत्यांना न बोलावता सर्व समाजातील लोकांना एकत्र बोलावून तोडगा काढला पाहिजे. मराठा आरक्षण देण्याचा अधिकार राज्याला नाही. हा अधिकार केंद्राचा आहे. त्याची मर्यादा केंद्र सरकारने वाढवली पाहिजे. मी माझे खासदार द्यायला तयार आहे. सर्वांनी मिळून केंद्राकडे जाऊया मोदींकडे जाऊया... जो निर्णय होईल तो आम्हाला मान्य आहे. त्या निर्णयाला आमचा पाठिंबा असल्याचे सांगितले. अनिल देशमुख यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या गंभीर आरोपाबाबत ते म्हणाले,' देशमुख त्यावेळेला उघडपणे बोलले होते. मलाही त्यांनी सांगितलं होते,हे सगळी लोक अमानुष असून अतिशय घृणास्पद काम त्यांच्याकडून होत आहे. घाणेरड्या प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न केला गेला. यांना मुलंबाळे नाहीत ,अशी ते वागत आहेत. पूर्वीचा भाजपा आणि आताचा भाजपा वेगळा आहे. देश पातळीवर ही वृत्ती संपवण्याची गरज असल्याचे म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपावर हल्लाबोल केला.



अजित पवारांच्या वेषांतर करून झालेल्या दिल्लीवारीबद्दल ते म्हणाले,'अजित पवार वेषांतर करून दिल्लीला गेले यावरून मुंबई, दिल्ली विमानतळाची सुरक्षा किती बोगस आहे, हे समजते. देशाच्या गृहमंत्र्यांच्या सहमतीनं हे सर्व होत असून जो स्वतःच्या पक्षाच्या स्वार्थासाठी सर्व अधिकार वापरतोय हे किती घातक आहे हे आपण समजू शकतो. असा गृहमंत्री पदावर राहता कामा नये. अमित शाह यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी ठाकरे म्हणाले धारावी प्रकल्पाबाबत मी वर्तमानपत्रात बातमी वाचली. मी मागील आठवड्यातही धारावी प्रकल्पाबाबत बोललो होतो की, हा जर प्रकल्प व्हायचा असेल तर धारावीकरांना त्यांच्या हक्काचे घर धारावीमध्येच मिळाले पाहिजे. मुलुंड किंवा मुंबईच्या बाहेर धारावीकरांना घरं नको. अदानींसाठी या प्रकल्पाचा घाट घातला तो आम्ही होऊ देणार नाही. आम्ही मुंबईची 'अदानी सिटी' होऊ देणार नाही, सध्या सर्व योजना 'लाडकी बहीण, लाडका भाऊ' नावाने सुरु आहेत. तसा 'लाडका कॉन्ट्रॅक्टर' ही योजना पण सरकारने आणली पाहिजे. मुंबईतील अनेक जागा, भूखंड हे सरकार कॉन्ट्रॅक्टर आणि काही खास लोकांच्या घशात घालत आहे. पशुसंवर्धन खात्याचा भूखंड मुंबई बँकेला देण्याचा सरकारने घाट घातला. आता जो जीआर वेबसाईटवर डाऊनलोड केला होता, तो आता तिथून डिलीट केला आहे. जे सरकारचे कोणी खास आहेत त्यांच्यासाठी भूखंड देण्याचा सरकारने ठरवले आहे. परंतु, आम्ही असे होऊ देणार नाही. आमचं सरकार आल्यानंतर हा निर्णय नक्की रद्द करून, ज्या कामासाठी हा भूखंड ठेवले आहेत त्याच कामासाठी भूखंड वापरले जातील, असं म्हणत ठाकरेंनी सरकारवर टीका केली.

# देवेंद्र कोठे यांचा उपक्रम कौतुकास्पद : जन्नू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापुरातील युवा नेते देवेंद्र कोठे यांनी हाती घेतलेला वह्या वाटपाचा उपक्रम अतिशय कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू यांनी काढले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दाजी पेठ परिसरातील सोलापूर महानगरपालिका शाळा क्रमांक तीनमध्ये युवा नेते देवेंद्र कोठे यांच्या वतीने ५४ हजार वह्या वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जेष्ठ नेते रामचंद्र जन्नू बोलत होते. या कार्यक्रमास मा महापौर श्रीकांचना यन्नम, भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, नगरसेविका रामेश्वरी बिर्रू, नगरसेवक मेघनाथ येमुल, शहर चिटणीस नागेश सरगम, सावित्रा पल्लाटी, समाजसेवक दत्तात्रय पोसा, ओबीसी मोर्चा सरचिटणीस श्रीनिवास जोगी, अनिल व्हनमाने आदीसह शाळेचे



मुख्याध्यापिका अश्विनी लांबतुरे, मुख्याध्यापक प्रकाश कटारे, यांची प्रमुख उपस्थिती होती

ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू म्हणाले, मी याच महापालिका शाळेचा विद्यार्थी आहे. तुमच्यासारखाच मीही अनेक अडचणीतून शिक्षण घेतले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस वह्या वाटप करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ज्येष्ठ नेते विष्णुपंत कोठे यांचा समाजकार्याचा वारसा नातू देवेंद्र कोठे यांनी पुढे चालू ठेवला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी आपणही भविष्यामध्ये मोठे होऊन सोलापूरचे नाव रोशन करण्यासाठी प्रयत्न करायला हवे.

माजी नगरसेवक मेघराज येमुल म्हणाले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त युवा नेते देवेंद्र कोठे यांनी वह्या वाटपाचा चांगला उपक्रम हाती घेतला आहे. पूर्व भागात प्रामुख्याने यंत्रमाग कामगार, आणि विडी कामगार यांची मुले शिक्षण घेत आहेत. कोठे यांच्या वह्या वाटप उपक्रमामुळे सोलापुरातील गोरगरिबांच्या मुलांना वह्या मिळत आहेत. आपण सर्वजण देवेंद्र कोठे यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देवूया. वह्या वाटपासोबतच आरोग्य शिबीर आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी शिबिरांचे आयोजन देवेंद्र कोठे यांच्यावतीने केले जात आहे. देवेंद्र कोठे यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी आमच्या मनापासून शुभेच्छा आहेत. यावेळी शिक्षक वर्ग स्वाती फुटाणे, उमेश युवनानी, अर्जुन विटकर निखिल पाटील, आनंद सामल, रवी गदवालकर, प्रसन्न देवनुर या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानचे सदस्य पवन खांडेकर, सिद्धेश्वर कमटम, त्रिमूर्ती बल्ला, आदी उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, सदस्य त्याचबरोबर विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या अथक परिश्रमातून हे उपक्रम यशस्वी झाले.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# मुक्ताफळछंदी विरोधी पक्षनेता

निरर्थक मल्लिनाथी करणे, सतत वादग्रस्त विधाने करणे अशा पराक्रमांसाठी आधीच ख्यातकीर्त झालेले राहुल गांधी आता जातीय मुद्यावर नको तितका भर देऊ लागले असून त्यांच्या या भूमिकेमुळे देशातील सामाजिक ऐक्याला नख लागते की काय, अशी भीती वाटू लागली आहे. राहुल गांधी आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. विरोधी पक्षनेत्याचे पद लोकशाहीत फार महत्त्वाचे, आदराचे असते. सत्ताधीशांएवढेच महत्त्व विरोधकांना लोकतांत्रिक व्यवस्थेत दिले पाहिजे, या सूत्राचे प्रतिबिंब म्हणजे विरोधी पक्षनेत्याचे पद. राहुल गांधी यांच्या पक्षाला म्हणजे काँग्रेसला लोकसभा निवडणुकीत शंभरचा आकडा भेदता आला नाही, पण आता ते एका कथित चक्रव्यूहाची आणि तो भेदण्याची भाषा करताहेत. काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये, हे ज्याला कळते तो खरा शहाणा असतो, असे म्हणतात. राहुल गांधी नेहमीच नको ते बोलतात. भारताच्या अर्थसंकल्पावरून, तो प्रत्यक्ष छापायला देण्यापूर्वी, शेवटचा हात फिरविला जातो तेव्हा अर्थ मंत्रालयात 'बजेट हलवा' कार्यक्रम आयोजित करण्याची पद्धत फार जुनी आहे. या कार्यक्रमात साधारणतः अर्थमंत्री, त्या खात्याचे राज्यमंत्री आणि निवडक अधिकारी असतात. अर्थसंकल्पाचे पुस्तक छापायला आरंभ करण्यापूर्वी हलवा कार्यक्रम होतो. या हलवा कार्यक्रमादरम्यान अर्थसंकल्प तयार करणाऱ्या कामात सहभागी असलेल्या सगळ्यांना हलवा दिला जातो. अनेकदा भारताचे अर्थमंत्री स्वतः हलवा वितरण करतात. हे त्यांनी केलेल्या कामाचे गोड प्रतीक असते. बजेट प्रत्यक्ष सादर होईपर्यंत हे सारे लोक कार्यालयातच असतात. दोन-तीन वर्षांपूर्वीपर्यंत या लोकांचा कार्यालयातच राहण्याचा जो कालावधी होता, तो अधिक होता. आता छपाईऐवजी डिजिटल फॉर्मेट आल्यामुळे हा लॉक इन पिरियड कमी झालेला आहे. पण, अर्थसंकल्प संसदेत सादर होईपर्यंत हे कर्मचारी बाहेरील जगाच्या संपर्कात येऊ शकत नाहीत. त्यांच्या कामाचे एक प्रकारे कौतुक करण्याचे माध्यम म्हणजे हलवा कार्यक्रम. या हलवा कार्यक्रमात राहुल गांधी महाशयांनी जातीय क्लेश काढून कहर केला. अर्थसंकल्पावरील चर्चेदरम्यान हलवा कार्यक्रमाचे छायाचित्र दाखवीत ते म्हणाले, ज्या २० अधिकाऱ्यांनी अर्थसंकल्प तयार केला, त्यात एकही मागासवर्गीय किंवा आदिवासी नाही. आता बोला! अर्थसंकल्पाच्या निर्मिती प्रक्रियेतदेखील जात सांभाळायची असते, हे नवीन तत्त्वज्ञान म्हणायचे. त्यामुळेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी कपाळावर हात मारून घेतला. त्यानंतर राहुलबाबा चक्रव्यूह आणि अभिमन्यू या प्रतीकांवर बोलले आणि ते लोकांनी ऐकले. त्यांना नेमके काय म्हणायचे होते, ते त्यांना जरी कळले असेल तरी फावले. केंद्र सरकारने भारतातील लोकांना अभिमन्यूसारखे चक्रव्यूहात अडकवले आहे आणि आम्ही सारे विरोधक हा चक्रव्यूह भेदू... वगैरे... कशाचा कशाशी संबंध नाही. भारताचे केंद्रीय सरकार हे लोकनियुक्त सरकार आहे. काँग्रेसला प्रचंड आपटाआपटी करून केवळ जागा मिळाल्या आणि म्हणून विरोधी पक्षनेते पद मिळाले. यापूर्वीच्या निवडणुकांत विरोधी पक्षनेते पद मिळण्याएवढ्या जागादेखील काँग्रेसला मिळविता आल्या नव्हत्या. यावेळी त्या मिळाल्या, हे लोकशाहीचे सौंदर्य म्हणावे. पण, त्या सौंदर्याला बाधा आणणारी विधाने राहुल गांधी यांनी केली आहे आणि एक प्रकारे विरोधी पक्षनेते पदाची अब्रू त्यांनी पणाला लावली आहे. सांकेतिक रूपात का होईना, पण पंतप्रधान, गृहमंत्री या मंडळींना देशाचे शत्रू ठरवणे हा संसदीय परंपरेच्या दृष्टीने मोठा अपराध आहे आणि तो राहुल गांधी यांनी केला आहे. सरकारने विरोधकांना स्वतःचे किंवा देशाचे शत्रू म्हणू नये, ठरवू नये, हा जसा संकेत आहे, तो विरोधकांनादेखील लागू आहे. त्यांनीसुद्धा टीका करण्याच्या नादात सत्ताधीशांना शत्रू ठरवू नये. विरोधी पक्षाने सरकारवर टीका केलीच पाहिजे. सरकारला धारेवर धरलेच पाहिजे. सरकारला लोकाभिमुख निर्णय घेण्यास भाग पाडलेच पाहिजे. पण, ज्या अधिकाऱ्यांनी अर्थसंकल्प तयार केला, त्यांच्या जाती आणि धर्मावरून प्रश्न उभे करणे आक्षेपार्ह आहे. त्या अधिकाऱ्यांना ते अमूक जातीचे किंवा धर्माचे आहेत म्हणून बजेट तयार करण्याची जबाबदारी दिली गेलेली नव्हती. त्यांची क्षमता, अनुभव यावरून या कामाची जबाबदारी दिली जाते. त्यात जात शोधायची म्हणजे राहुलबाबांच्या कल्पकतेचा कहर म्हटला पाहिजे. राहुलबाबांची आणखी काही मुक्ताफळे अशीच गोंधळी पद्धतीची. अर्थसंकल्पातील इंटर्नशिप कार्यक्रमाचा युवकांना काहीही फायदा होणार नाही (कारण ते माझे म्हणजे राहुल गांधींचे मत आहे), अग्निपथ योजनेत युवकांची फसवणूक झाली (कारण राहुलबाबांना तसे वाटते) आणि शेतकऱ्यांच्या हातावर सरकारने तुरी दिल्या (कारण राहुल गांधी यांना तसे वाटते). यातल्या कशाचाही त्यांनी तार्किक उलगडा केलेला नाही. आडात नसेल तर पोहऱ्यात येणारच कसे. शक्यता नसतेच. राहुल गांधी यांचा अर्थकारणाचा, समाजकारणाचा अभ्यास जेमतेम आहे, हे वारंवार सिद्ध झालेले आहे. भारत हा विविध जाती-धर्मांचा, परंपरांचा देश आहे. या देशासारखे वैविध्य जगात कुठेही नाही. त्यांच्या आज्जीबाई म्हणजे इंदिराजी यांचे वडील- भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्या समकालीन नेत्यांनी, अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारख्या द्रष्ट्या पुढाऱ्यांनी, भारताने या वैविध्याचा उत्सव साजरा केला पाहिजे, अशी भावना रुजविली आणि तिला विविधतेतील एकता (युनिटी इन डायव्हर्सिटी) असे नाव दिले. हे तत्त्व हळूहळू का होईना, लोकजीवनात आणि लोकमानसात रुजले. भारतातील लोकांचे भावनिक ऐक्य दिवसागणिक मजबूत होत गेले त्यामागे आपल्या तत्कालीन द्रष्ट्या नेत्यांचे मार्गदर्शन होते. राहुल गांधी नेमके उलटे वागतात. ते जातील तिथे जात, धर्म यावर बोलून वातावरण बिघडवितात. राजकीय नेत्यांनी समाजाला भेदांच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास शिकवायचे असते. लोकांच्या मानसिक, भावनिक ऐक्यासाठी दिग्दर्शन करायचे असते. जातीपातीचा प्रश्न भारतात आहे. विषमता आहे. ती होती आणि आणखी काही काळ राहणार आहे. विषमता घालवायची असेल तर तिला आधी मनातून घालवावे लागेल. पण, मनांमध्ये विष कालवण्याचा प्रयत्न करणारी वक्तव्ये करणारा विरोधी पक्षनेता असेल तर दोष तरी कुणाला द्यायचा...? असे वक्तव्य भाजपाच्या एखाद्या नेत्याने किंवा पदाधिकाऱ्याने केले असते तर केवढा गहजब झाला असता, याची कल्पनादेखील करवत नाही. पण, राहुल गांधी यांना जणू काही सारे अपराध माफ आहेत. त्यामुळे ते जवळजवळ सुटलातच आणि भरकटत जातात. त्यांच्या भाषणात सूत्रबद्ध मांडणी नसते, तर्कशुद्ध विस्तार नसतो. असलाच तर तो विखार असतो आणि विषाक्त टीकाटिप्पणी असते. हे देशासाठी चांगले नाही. समाजाच्याही भल्याचे नाही. राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांच्या भोवती मल्लिकार्जुन खडगे यांच्यासारखे अनुभवी आणि ज्येष्ठ लोकही आहेत. त्यांनी राहुल गांधी यांचा क्लास घेतला पाहिजे. त्यांना लोकशाही, संसदीय परंपरा, सत्ताधारी आणि विरोधकांचे परस्पर संबंध, सामाजिक सौहार्दाचे देशाच्या विकासातील महत्त्व, अर्थकारण, समाजकारण अशा अनेक विषयांची त्यांना शिकवणीच द्यावी लागणार आहे. ती जबाबदारी काँग्रेस आणि अन्य विरोधकांमधील ज्येष्ठांनी घेतली पाहिजे. राहुल गांधी यांच्यासारखा अपरिपक्व माणूस विरोधी पक्षनेता असणे हे विरोधी पक्षाच्या एकूण प्रतिमेला सोयीचे नाही. ते संसदीय परंपरेला साजेसे नाही आणि लोकशाहीला शोभणारेही नाही. त्यामुळे आता राहुल गांधी यांना विरोधी पक्षनेते म्हणून निवडण्याच्या निर्णयाचा फेरविचार विरोधी पक्षांच्या पातळीवर झाला पाहिजे, असे सुचवावेसे वाटते. यात सरकारचे फार काही बिघडत नाही. त्यांची टीकाटिप्पणी किती गांभीर्याने घ्यायची, हे सरकारला ठरविता येऊ शकते. पण, राहुल गांधी यांच्या अशोभनीय वक्तव्यांमुळे संसदेचे आणि पर्यायाने देशाचे वातावरण बिघडते. त्याची जबाबदारी सरकारवर येणार नाही. ती विरोधकांवर येईल. विरोधकांना जाब द्यावा लागेल. त्यामुळे असे तारतम्य नसलेले व्यक्तिमत्त्व विरोधकांचा नेता म्हणून देशापुढे असावे काय, याचा निर्णय समस्त विरोधकांना कधी तरी करावाच लागेल. राहुलबाबांच्या मुक्ताफळांचा छंद थांबवावाच लागेल.

## प्रासंगिक

# लोकमान्य अन् स्वातंत्र्यवीर!

राहुल गोखले

लोकमान्य टिळकांचा स्मृतिदिन उद्या १ ऑगस्ट रोजी आहे. लोकमान्यांचा भारताच्या जनमानसावर विलक्षण पगडा आहे. त्यांच्या देहावसानाला १०४ वर्षे होत असतानाही ते 'गारुड' अद्याप कायम आहे. याचे कारण लोकमान्यांचे जीवनच अलौकिक असे होते. यंदाचे वर्ष हे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मुक्ततेचे शताब्दी वर्ष आहे. त्यामुळे लोकमान्य आणि स्वातंत्र्यवीर यांच्या एका अर्थाने गुरू-शिष्य नात्याचा मागोवा घेणे औचित्याचे ठरावे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची अंदमानच्या कारागृहातून १९२१ च्या मे महिन्यात सुटका झाली. त्याच्या काही महिने अगोदर लोकमान्य टिळकांचे देहावसान झाले होते. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळक निवर्तले. याचे वृत्त सावरकरांना अंदमानात समजले. ज्यांच्या युयुत्सु वृत्तीचा आदर्श नेहमी ठेवला होता त्या आपल्या लोकनेत्याचे निधन झाल्याचे वर्तमान ऐकून सावरकरांना अतीव दुःख झाले असणार, यात शंका नाही. भारतीय असंतोषाच्या जनकाच्या स्मृतीला वंदन करण्यासाठी अंदमान कारागृहात सावरकरांसह बंद्यांनी उत्स्फूर्तपणे उपोषण केले होते. लोकमान्यांच्या जीवनाचा सर्वच क्रांतिकारकांवर मोठा पगडा होता. सावरकर आणि लोकमान्यांची प्रत्यक्ष भेट होऊन अनेक वर्षे लोटली असली, तरी लोकमान्यांचा त्यांच्यावरील प्रभाव कायम होता. लोकमान्यांच्या देहावसानानंतरही तो कायम राहिला. लोकमान्यांचा क्रांतिकारकांना आशीर्वाद होता. सावरकरांसारख्या जाज्वल्य देशभक्ताला तो असणार, यात नवल नाही. सावरकरांची टिळकांवर एवढी श्रद्धा होती की, टिळक हे मुख्य प्रवाहातील नेते असल्याने आणि आणि पर्यायाने भूमिगत राहू शकत नसल्याने टिळक जे उघडपणे बोलू आणि करू शकत नाहीत, ते गुप्त क्रांतिकारी संघटनांनी केले पाहिजे, अशी सावरकरांची धारणा होती. सावरकर आणि त्यांच्या मित्रांनी मित्रमेळ्याची जी स्थापना केली ती त्याच ऊर्मीतून. टिळकांवर सावरकरांनी लहान वयात कविता रचली होती. पुण्यात शिक्षणासाठी आल्यानंतर सावरकरांना टिळकांचा सहवास आणि मार्गदर्शन मिळाले. १९०२ साली सावरकर पुण्यात आले आणि टिळक, शिवरामपंत परांजपे यांच्याशी त्यांच्या भेटी होऊ लागल्या. सावरकर तरुण नेते म्हणून उदयास येत होते आणि सावरकरांच्या मनातील ती तळमळ टिळकांनी हेरली होती. त्यामुळेच सावरकरांनी केलेल्या उपक्रमांना टिळकांनी नेहमीच प्रोत्साहन दिले.





बंगालच्या फाळणीला टिळकांचा विरोध होता. फाळणीचा विरोध करण्यासाठी आंदोलन करण्याच्या योजनेत सावरकरांनी परदेशी कपड्यांची होळी करण्याची योजना मांडली. ती सभा झाली तेव्हा टिळक पुण्यात नव्हते; मात्र ते परतल्यानंतर सावरकरांनी त्यांच्यासमोर ती योजना मांडली आणि टिळकांना ती कल्पना पसंत पडली; पण एक अटही त्यांनी घातली. ती म्हणजे होळी करण्यासाठी थोडेथोडके नव्हे तर मोठ्या प्रमाणावर कपडे गोळा करायला हवेत. प्रत्यक्ष होळीसाठी जी मिरवणूक निघाली तेव्हा लोकमान्य टिळकही त्यात सहभागी झाले आणि त्यांनी भाषणदेखील केले. याच होळीमुळे सावरकरांना फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतिगृहातून काढून टाकण्यात आले तेव्हा टिळकांनी केसरीत 'हे आमचे गुरू नव्हेत' हा जहाल अग्रलेख लिहून प्राचार्यांना फैलावर घेतले होते. पुढे सावरकरांनी ब्रिटनला जाऊन शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. श्यामजी कृष्ण वर्मा यांच्याकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी त्यांनी अर्ज केला. त्याबरोबर सावरकरांनी दोन शिफारसपत्रे आवर्जून जोडली. एक होते शिवरामपंत परांजपे यांचे आणि दुसरे अर्थातच टिळकांचे. टिळकांनी पत्रात लिहिले होते, 'हा तरुण (सावरकर) अत्यंत तडफदार असल्याचा माझा अनुभव आहे. सरकारी नोकरी कधीही करायची नाही, असा त्याचा निश्चय आहे आणि त्याचे नैतिक आचरण फार चांगले आहे.' टिळक आणि परांजपे यांची शिफारसपत्रे असल्याने सावरकरांना शिष्यवृत्ती नाकारण्याचा प्रश्नच नव्हता. याचे कारण स्वतः वर्मा हेही टिळकांचे भक्त होते. टिळकांना १८९७ साली अटक झाल्यानंतर वर्मा यांनी भारत सोडून लंडनमध्ये कायमचे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला होता. वर्मांनी शिष्यवृत्तीची पहिली खेप म्हणून ४०० रुपये टिळकांकडे पाठवून दिले. करारपत्रावर सह्या करण्यासाठी आणि शिष्यवृत्तीची रक्कम घेण्यासाठी सावरकरांनी आपल्या निवासस्थानी यावे म्हणून टिळकांनी सावरकरांना निरोप धाडला होता. १९०६ साली सावरकरांची लोकमान्यांशी झालेली ती भेट अखेरची ठरली.

इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असतानाच मॅझिनीच्या चरित्राचा अनुवाद करून ते हस्तलिखित सावरकरांनी आपले बंधू बाबाराव यांना पाठवले. १९०७ साली प्रकाशित झालेला तो ग्रंथ लोकमान्यांना अर्पण करण्यात आला होता. काँग्रेसचे अधिवेशन नागपूरला झाले तर टिळक अध्यक्ष म्हणून निवडून येतील, या भयाने अधिवेशन नागपूरऐवजी सुरतला हलविण्यात आले. हेच ते गाजलेले १९०७ चे आणि मवाळ आणि जहाल यांच्यात फूट पडलेले अधिवेशन. मात्र, लंडनमध्ये असूनही सावरकरांचे स्वदेशात घडणाऱ्या घडामोडींकडे बारीक लक्ष होते. टिळक हेच काँग्रेसचे अध्यक्ष निवडून यावेत आणि नागपूरला त्यास विरोध झाला तर तो उधळून लावावा, असे सावरकरांनी पत्रातून बाबारावांना कळविले होते. अर्थात पुढे अधिवेशन सुरतला झाले. बाबाराव तेथेही आपल्या तरुण सहकाऱ्यांना घेऊन गेले होते. पुढे टिळकांची रवानगी मंडाले तुरुंगात झाली आणि सावरकरांची अंदमान तुरुंगात. तथापि, लोकमान्यांच्या हालहवालाविषयी जाणून घेण्याची सावरकरांना तुरुंगात असतानाही उत्कंठा असायची. अंदमानात अगोदर सावरकरांना पत्र लिहिण्यास अनुमती नव्हती; मात्र १९१३ साली त्यांना ती मिळाली तेव्हा आपले बंधू नारायणराव सावरकरांना त्यांनी जे पत्र लिहिले त्यात अन्य काही विषयांबरोबर टिळकांची मुक्तता कधी होणार, हाही एक प्रश्न होता.

१९२० साली लोकमान्यांचे देहावसान झाले आणि त्यानंतर काही महिन्यांनी सावरकरांची अंदमानातून सुटका झाली. त्यामुळे लोकमान्य आणि सावरकर यांची जरी भेट झाली नाही तरी पुढच्या जीवनात लोकमान्यांचा मोठा प्रभाव सावरकरांवर राहिला. अंदमानातून सुटका झाल्यावर राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर सावरकरांची रवानगी रत्नागिरीला करण्यात आली. टिळकांनी समाजाच्या जागरणासाठी सार्वजनिक गणेशोत्सव अनेक वर्षांपूर्वी सुरू केला होता. रत्नागिरीत असताना सावरकरांनी त्याच गणेशोत्सवाला अखिल हिंदू स्वरूप दिले. काँग्रेस अंतर्गतच लोकमान्यांनी १९२० साली लोकशाही स्वराज्य पक्षाची स्थापना केली होती. रत्नागिरीतील स्थानबद्धतेतून सुटका झाल्यावर सावरकरांनी सुरुवातीला त्याच लोकशाही स्वराज्य पक्षात प्रवेश केला आणि कालांतराने ते हिंदू महासभेला जाऊन मिळाले. लोकमान्यांच्या जन्मशताब्दी वर्षात पुण्यात स्थापन झालेल्या सर्वपक्षीय समितीने जन्मशताब्दी समारंभात मुख्य भाषण देण्यासाठी सावरकरांना निमंत्रित केले.

सावरकरांची लोकमान्यांवर निस्सीम भक्ती होती याचा प्रत्यय त्यांचे लेखन, भाषण आणि कृती यातून आल्याखेरीज राहत नाही.

९८२२८२८८१९

## वेध

गिरीश शेरेकर

# पाणी तुंबण्याची समस्या सार्वत्रिक

मोठ्या शहरांसह छोट्या शहरांमध्ये पावसाचे पाणी तुंबण्याची समस्या आता विक्राळ रूप धारण करीत आहे. परवा दिल्लीतल्या जुन्या राजेंद्र नगरात झालेली जीवघेणी घटना डोळ्यांसमोर आली की, यंदाच्या पावसात महाराष्ट्रातल्या पाणी तुंबणाऱ्या शहरांची नावे पटापट तोंडातून बाहेर पडतात. गेल्या काही वर्षांपासून हे सातत्याने होत असून दरवर्षी नव्या शहराची नावे त्यात जोडली जातात. काही ठिकाणी तर जीवघेणे प्रसंग उद्भवले आहेत. त्याचा दोष पावसाला देता येत नाही. कारण, पाऊस आपले काम करतो आहे. फक्त त्याचे वेळापत्रक बिघडले आहे. कुठे एकदम जास्त तर कुठे कमी असा असमतोलपणा पावसाचा निश्चित वाढला आहे. पाऊस पूर्वी येतच होता आणि आता पण येतोच. फरक इतकाच आहे की, पूर्वी आलेल्या पाण्याचा व्यवस्थित निचरा व्हायचा; आता ते तुंबून राहते. पाणी तुंबणे ही समस्या वाढत्या शहरीकरणाच्या नियोजनशून्य विकासातून व शहर रचनेचे कमकुवत नियम आणि आहे त्याची सातत्याने होणाऱ्या मोडतोडीतून निर्माण झाली आहे. काही ठिकाणी मानवीय तर काही ठिकाणी यंत्रणेतल्या दोषातून हे नियम तुडविले जातात. त्याचे परिणाम राज्यातली अनेक शहरे आता भोगत आहेत.

पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी देशात दिल्लीपासून तर गल्लीपर्यंतच्या ज्या काही यंत्रणा आहेत, त्या यंत्रणांचा आपसात नसलेला समन्वय हेदेखील पाणी तुंबण्याच्या समस्येच्या पाठीमागचे महत्त्वाचे कारण आहे. वाढत्या लोकसंख्येला पुरेल इतक्या सुविधा उभ्या करणे हे शासनाचे कामच आहे. हे करत असताना सर्व यंत्रणांना सोबत घेऊन आणि जेथे काम होणार आहे, तेथील व्यवस्था समजून काम केले तर अपवादानेच समस्येचा प्रश्न निर्माण होईल. पण, प्रत्यक्षात तसे अजिबात होत नाही. उदाहरण सांगायचे झाल्यास, शहराच्या मुख्य भागात रस्ता बांधणारी यंत्रणा बांधकाम विभाग असेल तर ते आवश्यक विभागांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन काम सुरू करतात. ना-हरकत देणारे विभाग मात्र बांधकामामुळे भविष्यात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची, वीजवाहिन्यांची, सांडपाणी वाहून जाण्यासह अन्य कोणती अडचण निर्माण तर होणार नाही ना, याची कोणतीही खातरजमा न करताच प्रमाणपत्र देऊन मोकळे होतात. नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, पुणे, कोल्हापूर, नाशिक, जळगावसह अन्य शहरांमध्ये पाणी तुंबण्याची जी समस्या भेडसावत आहे, ती यातून निर्माण झाली आहे. पहिले नियोजन करायचे नाही आणि संकट उभे राहिले की हातपाय मारायचे, असा हा प्रकार आहे. वेळेवरच्या उपायाने काही होत नाही. जे नुकसान व्हायचे ते होतेच. दरवेळी तसे अनुभव येत आहेत. एक वेळ अशी होती की, फक्त मुंबईतूनच पाणी तुंबण्याची बातमी यायची. संबंधित यंत्रणांनी सुसूत्रता आणल्याने आता मुंबईपेक्षा इतर शहरातल्याच बातम्या जास्त यायला लागल्या आहेत. भविष्यात त्या आणखी येण्याची शक्यता आहे.

विकासाची कामे नागरिकांचे जगणे सुसह्य करण्यापेक्षा ते कठीण करत असेल तर त्या विकासाला शाश्वत विकास म्हणता येत नाही. जनतेला विकासाची कामे दाखवायची म्हणून ती पटापट वाटेल तशी करून टाकायची, हा लोकप्रतिनिधींचा सोपा धंदा आहे. पण, जे काम आपल्या पुढाकाराने होत आहे, त्यातून भविष्यात काही अडचणी येणार नाहीत, याची पुरेशी काळजी यंत्रणेशी सल्लामसलत करून घेतलीच जात नाही. करून टाका, पाहून घेऊ आणि पाहण्याची वेळ आली की, हात वर केले जातात. सार्वत्रिक होत असलेल्या पाणी तुंबण्याच्या समस्येवर अभ्यासपूर्ण उपाययोजनांची नितांत गरज आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची कोणत्याच शहरात ठोस व्यवस्था नाही. ज्या काही आहेत त्या कमकुवत ठरल्याचे अनेक शहरांमध्ये नुकतेच दिसले आहे. काही ठिकाणी रस्ते उंच झाले तर घरे, दुकाने खाली गेली. काही ठिकाणी त्याच्या उलट झाले आहे. दोन्ही प्रकारांत नुकसान आहेच. जिवावर बेतेल इतपत ही समस्या गंभीर होत आहे. यावरचा पहिला उपाय म्हणजे, आहे त्या शहरांच्या रचनेचा व तेथील पायाभूत सुविधांचा नव्याने अभ्यास करून अडचणी शोधणे! त्या एकवेळा समोर आल्या की उपाययोजना करणे सहज शक्य आहे. काही ठिकाणी तर अगदी छोटे कारण समस्येचे मूळ ठरले आहे. पण, पायाभूत सुविधा उभी करणारी एकही यंत्रणा आपली जबाबदारी चोख बजावत नसल्यानेच या समस्या उद्भवत आहेत. या सर्व यंत्रणांना एका सूत्रात बांधून विकास कामे करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. देशपातळीवर त्याची एक आदर्श कार्यपद्धती विकसित करून त्याच पद्धतीने ते काम व्हायला हवे. धोरण ठरविणाऱ्या राज्यकर्त्यांचे डोळे उघडले तरच काही सकारात्मक परिणाम समोर येण्याची शक्यता आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# सौंदर्यलहरी : आद्य शंकराचार्यांची ज्ञान गूढ गम्य रचना

प्रा. दिलीप जोशी

चार महिन्यांपूर्वी गुलबर्ग्याच्या सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ, सौंदर्यलहरीच्या साधक आणि तरुण भारतच्या नित्य वाचक डॉ. सौ. मेघा कमलापूरकर यांचा मला भ्रमणध्वनी आला. त्यांनी माझा 'तरुण भारत'मधील 'श्रीललितासहस्रनामा'वरील लेख वाचून माझ्याशी संपर्क केला की, गुलबर्गा येथे आमचे मोठे सौंदर्यलहरी साधक मंडळ आहे. त्यांच्यासमोर आपण सौंदर्यलहरी मांडा. श्रीसूक्त, श्रीयंत्र, ललितासहस्रनामावर मी यथाबुद्धी बोलतो; पण 'सौंदर्यलहरी' मात्र तितका अभ्यासलेला नाही.

*अभ्यासेची प्रकट व्हावे, नाहीतर झाकोनी असावे।*
*प्रकट होवोनी नासावे, हे बरे नव्हे।*

म्हणून मी सकारण विनम्र नकार दिला. डॉ. मेघाताईंनी मला 'सौंदर्यलहरी' अभ्यासण्याची सूचना केली. त्यांचे सहज बोलणे हाच उपदेश समजून मी आज्ञापालन म्हणून सौंदर्यलहरी वाचण्यास घेतला. 'सौंदर्यलहरी' ही आदिशंकराचार्यांनी रचिलेली नितांतसुंदर, त्वरित फलदायी आणि प्रासादिक रचना आहे. सौंदर्यलहरी हे भगवती महात्रिपुरसुंदरी ललितांबिका अर्थात आद्या शक्तीच्या सौंदर्याचे वर्णन असून त्यात एकूण १०० श्लोक आहेत. 'सौंदर्यलहरी' हा त्रिगुणात्मिका जगदंबा, महात्रिपुर सुंदरीचा केवळ स्तुतिपाठ नसून प्रत्येक श्लोक हा स्वतंत्र मंत्र आहे. सध्याच्या भाषेत सांगायचे तर 'सौंदर्यलहरी' म्हणजे १०० मंत्रांचे मंत्रसंकुल आहे.

या मंत्रसंकुलातील प्रत्येक मंत्राची स्वतंत्र विद्या आहे, स्वतंत्र यंत्र आहे आणि प्रत्येक मंत्राचे स्वतंत्र तंत्र आहे. थोडक्यात, प्रत्येक श्लोकाचे स्वतंत्र अस्तित्व आहे. श्रीमद् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी आपल्याला दिलेले हे शतश्लोकी अद्भुत तंत्रविज्ञान किंवा तंत्रशास्त्र आहे. आपल्यासारख्या सामान्य माणसांनी हे भावभक्तीने आणि आर्तभावाने म्हणावे. तांत्रिकजनांनी यंत्र-मंत्र आणि तंत्रासह जबाबदारीने साधना करावी. 'द्वयोरपि समं फलं!' दोघांनाही अपेक्षित फळ मिळते.

सौंदर्यलहरी निर्मितीच्या संदर्भात विविध भेद आहेत. एका मतानुसार सौंदर्यलहरी पूज्यपाद आदिशंकराचार्य अगदी शिशु अवस्थेत म्हणजे अवघे पाच वर्षांचे असताना त्या महात्रिपुरसुंदरीच्या कृपाशीर्वादाने त्यांनी हे स्तुतिगायन रचिले. संत शिरोमणी नामदेवरायांच्या जीवनात भगवंतांनी प्रसाद खाल्ल्याची कथा आपणास ज्ञात आहे. नेमकी तशीच कथा पूज्यपाद शंकराचार्यांच्या जीवनात घडली. त्यांचे वडील बाहेरगावी गेल्यामुळे आदिशंकराचार्य जगदंबेला पायस प्रसाद घेऊन गेले. खूप वेळ झाला तरी भगवती पायस ग्रहण करत नाही पाहिल्यावर आदिशंकराचार्य अस्वस्थ झाले. त्यांनी त्या भवानीला आर्त हाक मारली. स्वतःचे डोके आपटायला सुरुवात केली. तेव्हा साक्षात जगदंबा प्रकट झाली. तिने पायस ग्रहण केले आणि अर्धा पायस प्रसाद आदिशंकराचार्यांना दिला. जगदंबेचा तो उच्छिष्ट प्रसाद ग्रहण करताच त्यांच्या मुखारविंदातून बाहेर पडलेले भगवतीचे सौंदर्य चित्रण म्हणजे 'सौंदर्यलहरी' होय.

दुसरे मत ज्योतिर्मठाचे विद्यमान शंकराचार्य पूज्यपाद अविमुक्तेश्वरानंद महाराजांच्या नुसार आदिशंकराचार्यांनी विविध मताचे जसे खंडण केले तसे शक्तीचेही खंडण केले. असेच परिभ्रमण करीत असताना ते तापाने आजारी पडले. त्यांना एका वैद्याने एक पुडी दिली आणि ती दह्यासोबत खाण्यास सांगितले. ते अशक्त असल्यामुळे त्यांना उठताही येईना. त्याच वेळी रस्त्यावरून एक दहीवाली जात होती. तिचा आवाज ऐकून त्यांनी तिला दही मागितल्यावर तिने 'इकडे रस्त्यावर येऊन दही घेऊन जा' म्हटले. तेव्हा शंकराचार्य भगवान म्हणाले, 'तिथपर्यंत येण्याचीही शक्ती नाही.' तेव्हा ती दहीवाली म्हणाली की, 'उठण्याची शक्ती नाही म्हणतो आणि शक्तीचे खंडण करतो.' तेव्हा पूज्यपाद शंकराचार्यांना लक्षात आले की, दहीवाली नसून ही भगवती पराशक्ती आहे. तिला पाहताच त्यांच्या मुखातून १०० श्लोकी स्तोत्र बाहेर पडले; ते 'सौंदर्यलहरी' आहे.

तिसऱ्या कथेनुसार भगवद् पूज्यपाद आदिशंकराचार्य मानससरोवरावर असताना तपश्चर्येच्या योगाने भगवान महादेवांनी प्रसन्न होऊन त्यांना स्वयं शंभूंनी भवानीच्या सौंदर्याचे वर्णन केलेले १०० श्लोकी 'सौंदर्यलहरी' स्तोत्र दिले. ते घेऊन जाताना वाटेत त्यातील अर्धे स्तोत्र भगवान नंदी यांनी फाडून घेतले. नंदीची तक्रार करण्यास ते महादेवाजवळ गेल्यावर त्यांनी जे आहे ते घे आणि पुढील श्लोकांची रचना तू कर. ते होते ४१ श्लोक. उर्वरित ५९ श्लोक आद्य शंकराचार्यांनी रचले.

भगवान शंकरांकडून मिळालेल्या ४१ श्लोकांना 'आनंदलहरी' तर शंकराचार्यांनी रचलेल्या ५९ श्लोकांना 'सौंदर्यलहरी' म्हणतात. 'आनंदलहरी' निर्गुण ब्रह्म उपासना तर 'सौंदर्यलहरी' सगुण ब्रह्म उपासना आहे. सगुण निर्गुण ब्रह्म उपासना मंत्र मिळून बनणाऱ्या शतक मंत्रांना 'सौंदर्यलहरी' म्हटले जाते. दोन्हींमध्ये जगदंबेच्या सौंदर्याचे नितांतसुंदर वर्णन आहे. इथे सौंदर्य म्हणजे शृंगार नसून ते लेकराने केलेले आपल्या आईचे म्हणजे ललितांबिकेचे निखळ मातृसौंदर्य आहे. लहरी म्हणजे कंपन. त्या कधीच नष्ट होत नाहीत. उलट त्या लहरींचा सर्वत्र संचार असतो. अजून एका प्रघाताप्रमाणे सौंदर्यलहरीची उकल मेरू पर्वतावर भगवान गणेश किंवा पुष्पदंत यांनी केल्याबाबत वर्णन आहे. विस्तारभयाने त्याचे वर्णन टाळतो. सौंदर्यलहरीचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या इतर स्तोत्रात शेवटी वेगळी फलश्रुती असते. इथे मात्र प्रत्येक श्लोक हाच मंत्र असून त्या मंत्रातच फलश्रुती आहे. प्रत्येक श्लोकमंत्राची वेगळी आदिदेवता आहे. प्रत्येक श्लोकाचे वेगळे यंत्र आहे. मूळ श्रीविद्या आहेच, पण श्रीविद्येच्या विविध शाखा प्रत्येक श्लोक मंत्रात आहेत. १०० श्लोकांच्या १०० सिद्धी आहेत. मंत्र किंवा मंत्रसमूह विविध चक्र म्हणजे यंत्र रचना किंवा स्वरूप दर्शविते आणि सोबतच बाला त्रिपुरसुंदरी भगवती श्रीश्री चक्रराजनिलया जगदंबा स्वरूपाचे लावण्यवर्णन यात आहे.

भगवतीच्या लक्षणवती अंगप्रत्यंगाचे अलौकिक वर्णन असलेल्या सौंदर्यलहरी स्तोत्रात बहिरंग आणि अंतरंग उपासना आहे. योगसाधकांना कुंडलिनी जागरण, शरीरातील मूलाधारादी विविध चक्र जागरण सुकर होणारे श्लोकमंत्र यात आहेत. आद्याशक्तीच्या दिव्य तेजानेच चराचर सृष्टी प्रकाशमान आहे. तिच्याच शक्तिप्रेरणेने ब्रह्मा-विष्णू-महेश आपापली कार्ये सुचारू रूपाने करू शकतात. 'सौंदर्यलहरी' हे त्या आद्यशक्ती असलेल्या मूळमाया आणि शस्त्र विद्येचे तात्त्विक, यौगिक आणि प्राकृतिक सगुण रूपाचे रसगर्भित, भक्तिपूर्वक आणि मनोहर असे वर्णन आहे. कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्गाचा समन्वय असलेले तंत्रशास्त्र म्हणजे 'सौंदर्यलहरी' होय. हे तंत्रशास्त्र असले, तरी आपल्यासारख्या सामान्य माणसांना निखळ अंतःकरणाने अर्चन केल्यास हे ज्ञान गूढ असले तरी गम्य आहे.

९८२२२६२७३५

### एका माळेचे मणी

महाराष्ट्राला बुद्धिवादी, विवेकवादी, विज्ञानवादी, समतावादी, समाजातील अंधश्रद्धा निर्मूलन पुढाकार घेणारी, देवाधर्माच्याही पलीकडे गेलेली मानवतावादी विचारसरणी असल्या क्षेत्रात काम करणाऱ्या थोडक्यात स्वतःला पुरोगामी विचारवंत असणाऱ्या साहित्यिक, सामाजिक, तसेच अन्य क्षेत्रातील काम करणाऱ्या लोकांचा मोठा वारसा लाभला आहे, असे म्हटले जाते. अलिकडील काळात या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व मंडळींनी आपल्या मूळ लक्ष्य, ध्येयापासून फारकत घेतली का? असे वाटावयास लागले आहे. कारण, या मंडळींची अलिकडील वक्तव्ये, भाषणे पाहिली की आपल्या सामाजिक, विज्ञान, अंधश्रद्धा या मूळ विषयाला सोडून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, हिंदुत्व, देशातील लोकशाही, ती केंद्र सरकारने कशी धोक्यात आणली आहे, देशाची घटना या विषयावरील सातत्याने आपले विचार मांडत असतात. ही मंडळी एका पक्षाशी वा त्या विचारसरणीच्या संबंधित आहेत. मग आपले कार्यक्षेत्र सोडून या पुरोगामी मंडळींना जर राजकारण करावयाचे असेल तर निवडणुकीच्या राजकारणातच का सरळ उतरत नाही, असाही प्रश्न पडतो. गेल्या लोकसभा निवडणुकीत असीम सरोदे व डॉ. विश्वंभर चौधरी यांनी 'निर्भय बनो' या बॅनर खाली केंद्र सरकार विशेषतः नरेंद्र मोदींविरोधात प्रचार केला होता. आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्याम मानव महाविकास आघाडीतर्फे मैदानात उतरले आहे. सध्या त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची जोरात बॅटिंग चालवली आहे. एकीकडे बोलावयाचे आम्ही सामाजिक कार्य करीत आहोत आणि दुसरीकडे या माध्यमातून सरकारला लक्ष्य करत आपला खरा एजेंडा चालवायचा, असा उद्योग पूर्वाश्रमीच्या समाजवादी, डाव्या विचारसरणीच्या सगळ्या मंडळींचा झाला आहे. आज या मंडळींचे खायचे दात वेगळे दाखवायचे वेगळे आहेत.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे


### मी करदाता... हो मी गुन्हेगार!

हो, मी करदाता आहे. त्यातही मध्यमवर्गीय. त्यातला त्यात नोकरीपेशा आणि हाच माझा गुन्हा आहे. वार्षिक उत्पन्न १२ लाख; त्यात वर्षाला १ लाख २० हजार जीपीएफ, ८० हजार एलआयसी, ज्यावर १८ टक्के जीएसटी म्हणजे १४ हजार ४०० सरकारला. हाऊसिंग लोन १ लाख २० हजार; त्यातून ७२ हजार व्याज बँकेला म्हणजे सरकारला. कार लोन वार्षिक हप्ता १ लाख ५६ हजार, त्यातून व्याज १ लाख २० हजार बँकेला म्हणजेच सरकारला. वैयक्तिक कर्ज वार्षिक हप्ता ९६ हजार त्यातून व्याज ५० हजार म्हणजे बँकेला म्हणजे सरकारला. मी सर्वसामान्य मध्यमवर्गीय. माझे इलेक्ट्रिक बिल वार्षिक ५० हजार त्यावर जीएसटी १८ टक्के म्हणजे ९ हजार वर्षाला परत सरकारला. वार्षिक किराणा ८४ हजार त्यावर १२ टक्के जीएसटी म्हणजे १० हजार ८० रुपये परत सरकारला. घरात ३ मोबाईल. प्रत्येकात २ सिमच्या रिचार्जचा विचार करता १४ हजार ४०० यावर परत जीएसटी २५९२. सर्वसाधारण नागरिक महिन्यातून एकदा हॉटेलला जातो आणि अंदाजे ८०० रुपये खर्च करतो. म्हणजे वर्षाला ९६००. त्यावर परत ७६८ जीएसटी. वर्षभरात २० हजार रुपये दसरा-दिवाळीमध्ये कपडे घेतो. त्यावर परत ५ टक्के जीएसटी म्हणजे १००० परत सरकारला. मुलांच्या शिक्षणाचा खर्च वर्षाला ८० हजार; त्यावर ५ टक्के जीएसटी, हेल्थ इन्शुरन्स ३० हजार. त्यावर १८ टक्के जीएसटी ५४००. दूध खर्च २४ हजार त्यावर १२०० जीएसटी, सण-लग्न-वाढदिवस भेट १५ हजारांवर जीएसटी. एवढा सर्व खर्च करून त्यावर विविध प्रकारे जीएसटीमध्ये १८ टक्के देऊन बचतीसाठी काहीच वाचत नाही. तरीदेखील मी करदाता. वर्षाला ८५ हजार इन्कम टॅक्स भरावा. 'खायला नाही दाणा आणि करदाता म्हणा' अशी म्हणण्याची वेळ आली आहे. माझ्या भरलेल्या पैशावर शासन निवडणूक जिंकण्यासाठी लाडकी भाऊ आणि लाडकी बहीण योजना राबवत आहे. सरकारला व्याजापोटी २ लाख ४२ हजार वर्षाला भरून, जीएसटी रूपात वर्षाला ८० हजार भरल्यावर परत बचतीसाठी काहीही पैसे वाचत नसतानादेखील इन्कम टॅक्सपोटी परत ८५ हजार भरणे म्हणजे एक प्रकारचा अन्याय आहे.

**अजय देवघरे**/नागपूर

### लाडकी बहीण योजना दिलासादायक

लाडकी बहीण योजना तमाम महिला वर्गाला दिलासा देणारी आहे. तसे पाहिले तर मध्यमवर्गीयांमध्ये अशा बऱ्याच महिला आहेत, त्यांनादेखील या योजनेचा लाभ



मिळावा, असे मनापासून वाटते. तेव्हा सरकारने उत्पन्नाची मर्यादा वाढवावी; जेणेकरून त्यांनाही लाडकी बहीण योजनेचा फायदा होईल तसेच गॅस सिलेंडरच्या व पेट्रोलच्या किमती कमी केल्यास तमाम जनतेला दिलासा मिळेल तसेच ईपीएस-९५ च्या पेन्शनरचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने प्रयत्न केल्यास पेन्शनधारक खूश होतील. नाही तर येणाऱ्या निवडणुकीत मतदानाचे प्रमाण गेल्या वेळेपेक्षा कमी झाले तर नवल वाटायला नको.

**विजय देशपांडे**/९०९६६५९४७०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### देवाचा अभिषेक समजून सडा मारण्याचे विषारी औषध पिले

**सोलापूर, दि. ३० जुलै -**

देवीचा अभिषेक समजून सडा मारण्याचे विषारी औषध प्राशन केल्याने अत्यवस्थ झालेल्या तरूणीला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.अन्नपूर्णा अंबादास वड्डेपल्ली (वय १७, रा. जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सध्या नविन विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या तरूणीचे नाव आहे. मंगळवारी सकाळी ११ च्या सुमारास राहत्या घरी अन्नपूर्णा हिने देवाचा अभिषेक समजून चुकून सडा मारायचा पिवळ्या रंगाचे पाणी प्राशन केले. त्यामुळे अन्नपूर्णाला त्रास होऊ लागल्याने तिला वडील अंबादास वड्डेपल्ली यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### काकाने केलेल्या मारहाणीत पुतण्या जखमी

**सोलापूर, दि. ३० जुलै -**

आई वडीलांचे घरगुती भांडण सोडविण्यास गेलेल्या मुलाला काकाने मारहाण करून जखमी केले.पारस नवनाथ शिंदे (वय १३, रा. इंदिरा नगर, टेंभुर्णी, ता. माढा) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २८ जुलै रोजी सायंकाळी राहत्या घरी आई-वडीलांचे घरगुती वाद होत असताना मध्ये सोडवायला जात असताना काका रघुनाथ हरिषचंद्र शिंदे व इतर दोघांनी मिळून पारस शिंदे यास मारहाण केली. यामध्ये पारस याच्या डाव्या हाताच्या मनगटास मार लागल्याने त्यास उपचारासाठी मोहन धोत्रे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मुलीला भेटण्यासाठी गेलेल्या वडीलास मेव्हण्याकडून मारहाण

**सोलापूर, दि. ३० जुलै -**

मुलीला भेटण्यासाठी गेलेल्या वडीलास मेव्हुण्याकडून मारहाण करण्यात आली.विकि सिद्राम सगर (वय २८, रा. विनायक नगर, एमआयडीसी, सोलापूर सध्या रा. विजू सभासे विटभट्टी, नविन घरकुल, सोलापूर) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २९ जुलै रोजी रात्री विकि सगर हा त्याच्या पत्नीच्या घरी उर्दूशाळा, नविन घरकुल येथे स्वतःच्या मुलीला भेटण्यासाठी गेला होता. त्यावेळी विकिचा मेव्हुणा लक्ष्मण करदास व इतर चार जणांनी मिळून लाकडाने व लाथाबुक्क्याने त्यास मारहाण करून जखमी केले. विकि यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## दीड वर्षापूर्वी झालेली खूनाची घटना शहर गुन्हे शाखेने केली उघड

# ४७ लाखांच्या व्यवहारातून बँकेतील क्लार्कचा झाला होता खून; बोगस डॉक्टरास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

सुमारे दीड वर्षापूर्वी बेपत्ता झालेल्या एका बँकेतील क्लार्कचा ४७ लाख रुपयांच्या देवाण-घेवाणीच्या कारणावरून खून झाला असल्याची घटना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी उघडकीस आणली. याप्रकरणी शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एका बोगस डॉक्टराला अटक केली असून त्यास सांगोला पोलिस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.



विशाल दत्तात्रय बनसोडे (वय ३६, रा. सावित्रीबाई फुले हौसींग सोसायटी, संभाजीपूर, नांदणी रोड, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) असे अटक करण्यात आलेल्या बोगस डॉक्टराचे नाव आहे. रमन सातप्पा साबळे (वय ३६, रा. १५१ लक्ष्मी पेठ, देगाव रोड, सोलापूर) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत श्रीमती मिना सातप्पा साबळे (रा. सोलापूर) यांनी दिलेल्या माहितीवरून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आले होते.

११ एप्रिल २०२३ रोजी रमन साबळे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मुंबई येथे जातो असे सांगून सायंकाळी पाचच्या सुमारास घरातून गेले होते. अनेक दिवस झाले तरी रमन घरी परत आलेच नाहीत म्हणून त्यांची आई मिना साबळे यांनी १८ एप्रिल २०२३ रोजी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात मिसिंग दाखल केले होते. अनेक महिने झाले तरी या मिसींगचा तपास होत नव्हता, म्हणून मिना साबळे यांनी पोलिस आयुक्तांना भेटून शोध करण्याची विनंती केली होती. त्यावरून पोलिस आयुक्तांनी या मिसींगचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग केला होता.

याचा तपास करताना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रमन साबळे याच्या मोबाईल क्रमांकाची तांत्रिक माहिती व बँक व्यवहारांचा सखोल अभ्यास केला. तसेच मिना साबळे, रमन साबळेंची पत्नी, भाऊ, रमन कामास असलेल्या बँकेत, मित्रांकडे सखोल चौकशी केली. त्यावेळी रमन साबळे याचे विशाल बनसोडे याच्याशी सतत संपर्क व पैशाचे व्यवहार झाल्याचे दिसून आले.

त्यावरून गुन्हे शाखेच्या पोलिसांनी विशाल बनसोडे याच्याकडे चौकशी केली असता त्यांने सुरुवातीला खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावल्याने त्यांनी बनसोडे यास ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखविला. त्यावेळी बनसोडेने रमनचा खून केल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याने कशाप्रकारे रमनचा खून केला हे सांगितले.

मयत रमण साबळे हा सोलापुरातील एका बँकेत क्लार्क म्हणून काम करायचा तर विशाल बनसोडे हा वैद्यकीय अधिकारी असल्याचे सांगायचा. या दोघांचीही गेल्या अनेक वर्षापासून ओळख होती व एकमेकांच्या घरी येणे-जाणे असायचे. रमण साबळे याची आई मिना या महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यामुळे त्यांच्याकडे सेवानिवृत्तीचा पैसा आलेला होता. विशाल बनसोडे याने रमण साबळे यास त्याचे आईचे पैसे मला दे, ते पैसे मी शेअर मार्केटमध्ये व इतर ठिकाणी गुंतवितो व त्याचा चांगला परतावा परत देतो असे सांगितले होते. त्यामुळे साबळे याने जवळपास ४७ लाख रुपये हे विशाल बनसोडे यास दिले होते. अनेक दिवसानंतर बनसोडे याने साबळे यास गुंतवणुकीतील परतावा किंवा मुद्दल परत न दिल्यामुळे साबळे याने पैसे परत देण्यासाठी बनसोडे याच्यामागे तगादा लावला होता. त्यामुळे विशाल बनसोडे याने रमण साबळे याचा सांगोला तालुक्यातील अनकढाळ टोल नाक्याजवळील राजुरी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूस असलेल्या माळरानावर नेऊन गळा दाबून त्याचा खून केला. बॉडी कोणाची आहे हे ओळखू येऊ नये म्हणून खून केल्यानंतर बनसोडे याने एका पेट्रोल पंपावरून पेट्रोल व डिझेल आणून साबळे याच्या बॉडीवर टाकून बॉडी पेटवून दिली असल्याचे सांगितले.

त्यानुसार गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सांगोला पोलिसांशी संपर्क करून त्यांच्याकडे दाखल असलेल्या गुन्ह्याची माहिती घेतली. त्यावेळी सांगोला पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असून मयत व्यक्तीचा गेल्या १५ महिन्यापासून ओळख पटली नसल्याचे तसेच आरोपीदेखील मिळत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी विशाल बनसोडे यास सांगोला पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, अमंलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, वसीम शेख, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.



### खून केल्यानंतरही बनसोडे रमनच्या घरच्यांशी सतत संपर्कात...

रमनचा खून केल्यानंतर बनसोडे वॉटसअॅपवरून रमनच्या घरच्यांना मेसेज करून तो जिवंत असल्याचे भासवित होता. ऑगस्ट २०२३ पर्यंत वॉटसअॅपवरून मेसेज यायचे, परंतु त्यानंतर मेसेज येणे बंद झाल्याने घरच्यांचा संशय बळावल्याने त्यांनी मिसींगचा तपास होण्यासाठी पोलिसांकडे तगादा लावून उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी केली होती. ज्या ज्या वेळेस फौजदार चावडी पोलिस ठाण्यात रमनचे नातेवाईक गेले होते, त्या त्या वेळेस त्यांच्यासोबत विशाल बनसोडे होता. तसेच फौजदार चावडी पोलिसांनी त्याचा जबाबदेखील नोंदविला आहे. रमनच्या नातेवाईकांनी विशाल हाच मिसींगचा तपास करण्याबाबत मार्गदर्शन करीत होता असेही पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

# मुलीची छेडछाड करणाऱ्यांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

शाळकरी मुलीचा पाठलाग करून चाकूचा धाक दाखवून चिठ्ठी देऊन छेडछाड करणाऱ्या दोघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भोला उर्फ भोलनाथ व त्याचा साथीदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल आहे. याबाबत पिडीत मुलीच्या आईने फिर्याद दाखल केली आहे. भोला व त्याच्या साथीदाराने यातील शाळकरी मुलीचा पाठलाग करून तिच्या मैत्रीणीला चाकूचा धाक दाखवून चिठ्ठी देण्यास सांगितले. चिठ्ठी नाही दिल्यास तिच्या घरच्यांना सोडणार नाही अशी धमकी दिली. महिला सहायक पोलिस निरीक्षक मोरे-पाटील पुढील तपास करीत आहेत.

### अत्याचार करणाऱ्या दोघांवर गुन्हा

**सोलापूर :** काम शोधण्यासाठी रिक्षाची वाट पाहात थांबलेल्या महिलेला अंधारात नेऊन तिच्यावर जबरदस्तीने आलटून-पालटून अत्याचार करणाऱ्या दोघांवर एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ईस्माईल ईब्राहीम शेख व त्याचा मित्र अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पिडीतेने फिर्याद दाखल केली आहे. यातील पिडीता ही २० जुलै रोजी सायंकाळी काम शोधण्यासाठी एमआयडीसीमधील हॉटेल चेतन येथील रिक्षा स्टॉपवर रिक्षाची वाट पहात थांबली होती. त्यावेळी ईस्माईल व त्याचा मित्र तेथे आले व त्यांनी पिडीतेला बोलायचे आहे असे म्हणून मोकळ्या मैदानात अंधारात नेले. तिथे पिडीतेला शिवीगाळ करून मारहाण करून तिच्यावर दोघांनी आलटून-पालटून अत्याचार केला. पिडीतेचा गळा दाबून जबरदस्तीने अत्याचार करून याबद्दल कुणाला काही सांगितल्यास ठार मारण्याची धमकी दिली. महिला सहायक पोलिस निरीक्षक कदू पुढील तपास करीत आहेत.

### दत्तात्रय गायकवाड यांचे निधन

**सोलापूर, दि. ३० जुलै-**



तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील दत्तात्रय विठ्ठल गायकवाड (वय ६०) यांचे आज (दि. ३०) रोजी सकाळी ९ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा आणि १ मुलगी असा परिवार आहे. दै. 'तरुण भारत'चे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड यांचे ते चुलत बंधू होते.


## जाहिर नोटीस

दि सोलापूर इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट सोसा.लि. या संस्थेचे शेअर्स सर्टिफिकेट क्र १२९१ ते १२९५ रु. १००/- चा एक याप्रमाणे रु. ५००/- किमतीचे शेअर्स सर्टिफिकेट अनिल कलगोंडा पाटील या नावाने दिलेले असून ते हरविले असल्याने त्यांनी आम्हास डुप्लीकेटची मागणी केली. याबाबत कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसात संस्थेकडे कळवावे. या मुदतीत कोणाची तक्रार न आल्यास डुप्लीकेट शेअर्स सर्टिफिकेट देण्यात येईल व त्या नंतर कोणाची तक्रार चालणार नाही.

कळावे. दि. ३०/०७/२०२४

सही/-
मकरंद ना गवळी
चेअरमन
दि सोलापूर इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट सोसा.लि सोलापूर

आर टी एस अपील क्र. ४९०/२०२३

## जाहीर नोटीस

### सोलापूर येथील मे.उप-विभागीय अधिकारी क्र.१ यांचे समक्ष, सोलापूर.

१. श्री. अंबादास तमण्णा म्हंता
वय - ६४ वर्षे, धंदा-मजुरी
रा. ३४९ जोडभावी पेठ, मारुती मंदीर जवळ, सोलापूर.
२. श्रीनिवास तमण्णा म्हंता मयताचे वारसदार
अ. रघुनंदन श्रीनिवास म्हंता
वय - २८ वर्षे, धंदा-मजुरी
रा. ३४९ जोडभावी पेठ, मारुती मंदीर जवळ, सोलापूर.
ब. पूजा श्रीनिवास म्हंता
वय - २७ वर्षे, धंदा घरकाम
रा. ३४९ जोडभावी पेठ, मारुती मंदीर जवळ, सोलापूर.
३. श्रीमती. शारदा श्रीनिवास म्हंताटी
वय - ५२ वर्षे, धंदा घरकाम
रा- जे-२६८९ विडी घरकुल, सोलापूर.
४. श्रीमती. सुनंदा मनोहर कनकी
वय ५२ वर्षे, धंदा- घरकाम
रा. ३५० जोडभावी पेठ, मारुती मंदीर जवळ, सोलापूर.
— अपेलंटस्

विरुध्द

१. सौ. गायत्री निशांत तुम्मा
वय - ३८ वर्षे, धंदा- घरकाम
रा. ब्लॉक नं.४, नासा कॉम्प्लेक्स, रंगराज नगर, सोलापूर.
२. मा. मंडल अधिकारी, गाव कामगार तलाठी, कसबे सोलापूर ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, सोलापूर
— रिस्पॉंडंटस्

यातील अॅपेलंट यांनी सागनेवाला नं. १ व २ विरुध्द सदरचे अपील दाखल केलेला असून, सदर कामी सामनेवाला नं. १ हिचे आमचे कार्यालयामार्फ पाठविण्यात आलेले अपीलीय कामी हजर होणेचे नोटीस सदरचे सामनेवाला नं.१ हे दिलेले पत्यावर नाही याकारणास्तव पोष्टाचे शेऱ्यासह न बजावता परत आलेले आहे. सबब याकामी सामनेवाला नं.१ याचे अपील कामी म्हणणे देणेकरीता करीता याकामी नोटीस बजावणी होणे गरजेचे असल्याने सदरचे प्रसिध्दीकरणा अन्वये आपणास याकामी स्वता अथवा वकीलामार्फत हजर करीता सदरचे जाहीर नोटीस प्रसिध्दकरण करण्यात येत असून सदर तारखेस आपण प्रत्यक्ष हजर रहावे त्याअर्थी सदर अपीलकामी नेमलेली तारीख ०५ /०९/२०१४ रोजी सामनेवाला नं.१ ही स्वताः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून म्हणणे सादर करावा अन्यथा तारखेस हजर न राहील्यास काहीही हरकत नाही असे समजून या अपीलाची चौकशी होवून अॅपेलंट यांचा सदरचा अपील मंजूर करण्यात येईल अथवा योग्य तो आदेश करण्यात येईल.

आज दिनांक ३०/७/२०१४ रोजी आमचे सहीने व तहसिलदार शिक्कयाने प्रसिध्द केले असे.

शिक्का

सही/-
सोलापूर येथील
मे.उप-विभागीय अधिकारी क्र.१

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयएनः L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालयः फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
इमेल आयडीः jammill1907@gmail.com

### सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार दि. ०७ ऑगस्ट २०२४ रोजी ६०१-बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५, जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे सध्यांकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३० जून २०२४ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाही च्या कालावधी करीताचा कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही/-
राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

तारीख : ३०.०७.२०२४
ठिकाण : सोलापूर

## Ahmednagar Municipal Corporation, Ahmednagar

**PM E-Bus Seva**

**Year 2024-2025/E-Tender Notice No.01 Year 2024-2025**
**E Tender No. NIC TID: 2024_ANMC_1061093_1**

E-Tender Notice No.01 for the PM- e-BusSeva Year 2024-2025-1 work has been bublished on the government website http://mahaetenders.gov.in for online bidding through e-tender mode.

However, the concerned should take note of this. (With approval of Honble Commissioner)

Sign/-
Head of Electric Department
Ahmednagar Municipal Corporation

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि ।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ- शास्त्री नगर अ झोपडपट्टी या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं.२१६ ही मिळकत घरजागा आमचे अशिल सुग्राबी मुबारक चाउस यांचे मयत पती पै. मुबारक महिबुब चाउस यांचे नांवावर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागाचे कर आकारणी विभागास नोंद आहे.

सदर ठिकाणी तीन खोल्या संडास बाथरुम लाईट कनेक्शनची सुविधा असलेली घरजागा असून सदर ठिकाणी आमचे अशिल हे त्यांचे मयत पतीचे हयातीपासून रहाण्यास आहेत. सदरहू घरजागेवर त्यांचे मयत पती पै. मुबारक महिबुब चाउस यांचे नांव कमी करुन आमचे अशिल सुग्राबी मुबारक चाउस यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा. कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालीलं पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख : ३०/०७/२०२४

सही/-
अॅड. एस.एम. ढेकणे
रा. १२६-अ वाणी गल्ली
बाळे, ता. उत्तर सोलापूर,
जि. सोलापूर अशिलातर्फे
अॅडव्होकेट

## सावधानतेची जाहिर नोटीस

सोलापूर शहरातील तमाम नागरीकांना विशेषतः नेहरु नगर येथील नागरिकांना सदर जाहिर नोटीसीव्दारे कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन डि व सब डि सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मौजे नेहरु नगर येथील जुना सर्व्हे नं. ३५८/१/१/३ यांसी नविन सर्व्हे नं. २८/१/१/३ यापैकी रो-हाऊस नं.८३ यांसी क्षेत्र ४९.४४ चौ.मी. यात सुपर बिल्टअप बांधकाम क्षेत्र ४४.६४ चौ.मी. येणेप्रमाणे चतुः सिमेतील घरजागा.

वर नमुद कलम (१) मधील मिळकतीचे दि.०३/१०/२००८ रोजीचे साठेखत दस्त क्र.५०२१/२००८ चे मुळ साठेखत दस्त आमचे अशिल शंकर रामचंद्र जाधव यांच्याकडून गहाळ झालेले आहे. त्याबाबत आमचे अशिलांनी जोडभावी पेठ पोलीस स्टेशन, सोलापूर येथे रितसर दि.२४/०७/२०२४ रोजी गहाळ रजिस्टर क्र.०३२५/२०२४ अन्वये गहाळ रजिस्टर मध्ये नोंद केलेली आहे. तरी वर नमुद मुळ साठेखत दस्त कोणासही मिळाल्यास त्यांनी त्वरीत खालील नमुद पत्यावर आणून द्यावे. तसेच त्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आंत खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी आपली हरकत नोंदवावी.

सावधानतेची जाहिर नोटीस दिली तारीख ३१/०७/२०२४.

सही/-
अॅड. अजय दिनकर रणशृंगारे
बी.एस.सी., (ऑनर्स) एलएल.बी.
अॅड. अनिता अजय रणशृंगारे
बी.ए., एलएल.बी.
ऑफिस जी. एम. चौक, बुधवार पेठ,
सोलापूर -४१३००२ सेल नं. ९८५०६८४६१६
अशिलातर्फे अॅडव्होकेट

## Invitation for Prequalification

N M Wadia Charitable Hospital, Solapur, intends to carry out repairs and renovation to existing buildings along with construction of new building. Applications are invited from specialised civil contractors for Prequalification.
Interested contractors having substantial past experience of carrying out similar works, preferably of Hospital and Institutional buildings, with average turnover of last three years exceeding 10 Crores can apply.
Prequalification forms can be purchased against payment of Rs. 500/- from the office of the consultants on working days and times till 7th August 2024. The duly filled forms along with documents as specified therein shall be submitted till 14th August 2024 along with all relevant papers and licenses at following office address of the consultants.
**Arch. Shashikant Chincholi**
Office No 3,4, First Floor, Shraddha Empire, Railway Lines, Solapur – 413001.
Contact Number – 9921743257.

Jhaveri

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name **KHALIL AHMED MOHMMED QASIM KHAIRDI** has been changed to change new name **KHALIL MOHMMED QASIM KHAIRDI** residing at 246 Muslim Pachcha Peth Solapur.
The above named person is one and same person.
**(Affidavit no.- 34152)**
Date - 29/07/2024

## Motilal Oswal Home Finance Limited

MOTILAL OSWAL HOME LOANS

Regd. Office: Motilal Oswal Tower, Rahimtullah Sayani Road, Opp. Parel ST Depot, Prabhadevi, Mumbai - 400 025, CS : 8291889898
**Website**: www.motilaloswalhf.com, **Email:** hfquery@motilaloswal.com

### ताबा सूचना (जंगम मालमत्ता/आयईएससाठी)

**(सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (१) अंतर्गत)**

तर खाली स्वाक्षरी केलेले मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, (औपचारिकपणे अस्पायर होम म्हणून ओळखले जाते फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड), आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या अंमलबजावणी अंतर्गत (२००२ चा ५४), आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियमांच्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, २००२ ने येथे नमूद केलेल्या दिनांकित डिमांड नोटीस जारी केली ज्यामध्ये खालील कर्जदारांना नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन केले. नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत नोटीस देखील येथे नमूद केली आहे. खालील कर्जदारांची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे खालील कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात आली आहे. अधोस्वाक्षरीने खाली दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. कायद्याच्या कलम १३ चे कलम (४) येथे नमूद केलेल्या तारखेला सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचले आहे:

| अ. क्र. | कर्ज करार क्रमांक / कर्जदाराचे नाव / सह कर्जदार / जामीनदार | डिमांड नोटिस आणि थकबाकीची तारीख | ताब्यात घेतल्याची तारीख | स्थावर मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | Loxsl00317-180057755 सदाशिव अभिमान सलगर आणि शोभा सदाशिव सलगर | 26-03-2019 साठी रु 1145542/- | 26-07-2024 | Gph No.1126 मालवंडी ता-बार्शी जिल्हा सोलापूर ४१२४०२ पुणे पुणे महाराष्ट्र |

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार, करू नये. वर नमूद केलेल्या रकमेसाठी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडचे शुल्क आणि त्यावरील व्याजाच्या अधीन असेल. कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

**ठिकाण : महाराष्ट्र**
**तारीख : ३१/०७/२०२४**

सही/-
अधिकृत अधिकारी
(मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड)

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

## महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

**महसूल व वन विभाग**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर**
**(भूसंपादन समन्वय शाखा, सोलापूर)**
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, अ विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर ४१३००३

**क्र. २०२४/भूसं./कार्या-१/लवाद/आरआर/२३००/२०२४/दि. ३१/०७/२०२४**

### जाहिरात

लवाद (भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण) तथा जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कार्यालयातील पुढील पदांवर मासिक मानधन तत्वावर कामकाज करण्यासाठी केवळ तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांचे (प्रथम ३ महिने व आवश्यकता असल्यास त्यापुढे ३ महिने) कालावधीसाठी पुढील अटी व शर्ती बंधनकारक ठेऊन पात्र उमेदवारांची नियुक्ती करावयाची आहे.

यासाठी दि. ०१/०८/२०२४ रोजी सकाळी ९.४५ ते दि. १४/०८/२०२४ रोजी सायंकाळी ६.१५ (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) या कालवधीत इच्छुक व पात्र उमेदवारांकडून समक्ष अथवा नोंदणीकृत डाकेद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | आवश्यक संख्या | प्रतिमाह मानधन | वयोमर्यादा (वर्षे) | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विधी अधिकारी | ०१ | ३५,०००/- | ४५ चे आत | विधी शाखेची पदवी व प्रॅक्टीसचा ५ वर्षांचा अनुभव |
| ०२ | संगणक चालक (कॉम्प्युटर ऑपरेटर) | ०२ | १६,०००/- | २२ ते ४५ | कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. संगणक अर्हता म्हणून MSCIT परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेनख ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असलेबाबत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा शासनमान्य संगणक टंकलेखन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक. संगणकावर मराठी व इंग्रजी टंकलेखन करता येणे आवश्यक. |
| ०३ | शिपाई | ०१ | १२,०००/- | १८ ते ४५ | उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एचएससी/१२वी) उत्तीर्ण असणे आवश्यक. मराठी व इंग्रजी लिहिता/वाचता येणे आवश्यक |

भरती प्रक्रियेतील सर्वसाधारण अटी व शर्ती, कामाचे स्वरुप, कार्यालयीन कामकाजाची वेळ, अर्जासोबत सादर करणे आवश्यक असलेले कागदपत्र याबाबतची माहिती इकडील कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुट्टी खेरीज) सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० या वेळेत पहावयास मिळेल.

**दि. ३१/०७/२०२४**
**स्थळ : सोलापूर**

शिक्का

सही/-
कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा
लवाद भा.रा.रा.प्रा., सोलापूर

विमाका-पुणे-जाहि-१२१-२०२४-२५



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोलापूर : बुधवार, ३१ जुलै २०२४ ६
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# दोन कांस्यनंतर सुवर्णपदकावर नजर

## मनू भाकर घडविणार इतिहास ● देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव

◆ **पॅरिस, ३० जुलै**

यावर्षीच्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताची नेमबाज मनू भाकरने इतिहास घडविला. तिने एकाच प्रकारात दोन कांस्य पदके जिंकली आणि अशी करणारी ती पहिली खेळाडू ठरली. ती एक तेजस्वी तारा म्हणून उदयास आली. सर्व भारतीयांचे लक्ष तिने वेधून घेतले. दोन पदके जिंकल्यानंतर आता तिला दुसऱ्या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याची संधी आहे.

मंगळवारी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल मिश्रित स्पर्धेत दक्षिण कोरियाला पराभूत करून स्वातंत्र्यानंतर एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी मनू भाकर पहिली भारतीय ठरली.

मनू आणि सरबज्योत सिंग या भारतीय जोडीने कोरियाच्या ली व्होन्हो आणि ये जिन या जोडीला १६-१० ने पराभूत केले आणि या ऑलिम्पिकमध्ये देशाला दुसरे पदक मिळवून दिले. यापूर्वी, मनूने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत कांस्यपदक जिंकले.

मनूला अद्याप २५ मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत भाग घ्यायचा आहे आणि तिला तिसरे पदक जिंकण्याची संधी देखील आहे. ही स्पर्धा २ ऑगस्टपासून सुरू होईल.

**मी हॅट्ट्रिक करण्याच्या प्रयत्नात**

कांस्यपदक जिंकल्यानंतर मनू भाकर ही तिचा जोडीदार सरबज्योत सिंग यांच्यासह खूप आनंदित होती. जेव्हा तिला विचारले की आता ती पदकाची हॅट्ट्रिक करणार का, त्यावर ती म्हणाली की, मी पदकांची हॅट्ट्रिक करण्याचा प्रयत्न करेन. त्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करेन. पात्रता फेरीत ५८० गुण मिळवून मनू आणि सरबज्योत यांनी कांस्यपदक मिळवले. विजयानंतर मनू म्हणाली, मला खूप अभिमान आहे. शुभेच्छा आणि अभिनंदनासाठी सर्वांचे आभार. मी आणि सरबज्योतने शेवटपर्यंत समन्वय राखला. ◀(वृत्तसंस्था)



व्यासपीठावरील डावीकडून तुर्कीची सव्वल इलियादा तारहान- युसूफ डिकेक, सर्बियाची झोराना अरुनोव्हिक-दामिर मिकेक आणि भारताची मनू भाकर- सरबज्योत सिंग जोडी. सर्बियाने सुवर्णपदक, तर तुर्की आणि भारताने अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक पटकावले आहे

### सामन्यादरम्यान खूप दबाव होता : सरबज्योत

अंबाला येथील नेमबाज सरबज्योतवर वैयक्तिक श्रेणीत अयशस्वी झाल्यानंतर चांगले प्रदर्शन करण्यासाठी दबाव होता. तो म्हणाला, मला आता चांगले वाटत आहे. सामना खूप कठीण होता आणि ऑलिम्पिकमध्ये पिस्तूल खराब झाल्यामुळे मनू अंतिम सामन्यात पात्र ठरू शकली नाही. पण येथे दोन पदके जिंकून तिने प्रत्येक समस्येवर उपाय शोधला, असे त्याने सांगितले. ■

# सात्त्विक-चिराग गटात अव्वल

## तिसऱ्या पराभवासह अश्विनी-तनिषाची मोहीम थांबली

◆ **पॅरिस, ३० जुलै**

एशियन गेम्स चॅम्पियन्सची भारतीय जोडी आणि पदकाचे दावेदार सात्त्विकसाईराज रंकीरेडी आणि चिराग शेट्टी यांनी मंगळवारी पॅरिस ऑलिम्पिक बॅडमिंटनच्या पुरुषांच्या दुहेरी स्पर्धेत इंडोनेशियन जोडीचा पराभव केला. अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रॅस्टो यांचा सलग तिसरा पराभव झाल्याने महिलांच्या दुहेरीमध्ये त्यांचे आव्हान संपुष्टात आले.

जगातील पाचव्या क्रमांकावर असलेल्या सात्त्विक आणि चिरागच्या भारतीय जोडीने जगात सातव्या क्रमांकावर असलेल्या अर्दियान्टो आणि अल्फियन या जोडीला ४० मिनिटांत २१-१३ २१-१३ ने पराभूत केले. या दोन्ही जोड्यांनी आधीच अंतिम आठमध्ये स्थान मिळवले होते आणि संघाने या गटात अव्वल ठरविण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय जोडीने त्यांचे सर्व सामने गटात जिंकले.

अर्दियान्टो आणि अल्फियन विरुद्ध सहा सामन्यांत हा सात्त्विक आणि चिरागचा चौथा विजय आहे. ऑलिम्पिकच्या उपांत्यपूर्व फेरीमध्ये प्रवेश करणारी सात्त्विक आणि चिराग जोडी ही पहिली भारतीय पुरुषांची दुहेरी जोडी आहे.

अश्विनी आणि तनिषा यांना सेथियाना मोपासा आणि अँजेला यू यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला.

भारत आणि इंडोनेशियाच्या जोडी दरम्यान सुरुवातीपासूनच प्रत्येक सामन्यासाठी पुरुषांच्या दुहेरीने एक कठोर आव्हान पाहिले. संपूर्ण सामन्यादरम्यान सात्त्विक आणि चिराग जोडी वरचढ ठरली.



राष्ट्रकुल क्रीडा विजेता सात्त्विक आणि चिरागने पहिल्या सामन्यात ५-३ च्या आघाडीसह चांगली सुरुवात केली पण त्यानंतर स्कोअर ५-५ आणि ७-७ इतके होते. भारतीय जोडीने ९-८ च्या गुणांसह सलग तीन गुणांसह १२-८ अशी आघाडी घेतली.

दुसऱ्या गेममध्येही भारतीय जोडीने वेगवान खेळ सादर केला आणि ५-३ अशी आघाडी घेतली. इंडोनेशियाची जोडी मात्र हार मानण्यास तयार नव्हती. ◀(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### मणिका बत्रा उपांत्यपूर्व फेरीत, पदकाची आशा



**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचून भारताच्या स्टार महिला टेबल टेनिस खेळाडू मणिका बत्राने इतिहास घडविला आहे. सोमवारी ३७ मिनिटांत मणिका बत्राने फ्रान्सच्या प्रीतिका पावडेला ४-० ने पराभूत केले. फ्रेंच खेळाडू मणिकासमोर उभी राहू शकली नाही आणि मणिकाने सलग चार सेट्स ११-९, ११-६, ११-९, ११-७ च्या फरकाने जिंकले. त्यानंतर मणिका बत्राचा सामना हाँगकाँगच्या झु चेंगझू आणि जपानच्या मियू हिरानोच्या विजेताशी होईल. मणिका बत्राने फ्रान्सच्या १९ वर्षीय टेबल टेनिस खेळाडूला पराभूत करून इतिहास घडविला. ऑलिम्पिकच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणारी मणिका ही पहिली भारतीय महिला खेळाडू ठरली आहे. यापूर्वी कोणताही भारतीय पुरुष किंवा महिला टेबल टेनिस खेळाडू येथपर्यंत पोहोचू शकले नाही. माणिका बत्राकडून देशाला पदकाची अपेक्षा आहे. सामन्यापूर्वी मणिका बत्राने प्रतिस्पर्धी खेळाडूंचा आक्रमणाचा सामना केला आणि तिला वर्चस्वाची संधी दिली नाही. ■

### आयसीसी टी-२० रॅंकिंगमध्ये स्मृती मंधाना चौथ्या स्थानी

**नवी दिल्ली** : नुकत्याच आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघ श्रीलंकेकडून पराभूत झाला असला तरी आयसीसीच्या ताज्या टी -२० क्रमवारीत स्टार फलंदाज स्मृती मंधानाला लाभ झाला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या महिला आशिया चषक टी-२० स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सलामीवीर आणि उपकर्णधार स्मृतीने ६० धावा केल्या. आयसीसी टी-२० रॅंकिंगमधील फलंदाजांच्या यादीमध्ये मंधानाने चौथे स्थान मिळविले आहे. ऑस्ट्रेलियाची बेथ मुनी आणि ताहिला मॅकग्रॅग पहिल्या दोन स्थानावर आहेत. तिसऱ्या क्रमांकावर वेस्ट इंडीजची हेले मॅथ्यूज आहे. वेगवान गोलंदाज रेणुका सिंह ठाकूर पाचव्या क्रमांकावर आहे. रेणुकाने आशिया चषक स्पर्धेत सात गडी बाद केले.

### हरयाणाच्या मुख्यमंत्र्यांकडून मनू, सरबज्योतचे अभिनंदन

**चंदीगड** : हरयाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी मंगळवारी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकल्याबद्दल नेमबाज मनू भाकर आणि सरबज्योत सिंग यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे प्रत्येक देशवासीयाला अभिमान वाटत आहे. दरम्यान, पदक जिंकल्यानंतर, झाजरमधील मनूच्या गावात गौरियामध्ये आणि सरबज्योतच्या अंबाला गावात उत्सव साजरा केला गेला. हरयाणाचे मुख्यमंत्री सैनी म्हणाले की हरयाणावासीयांसाठी हा एक गौरवशाली क्षण आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूलच्या मिश्रित संघात हरयाणाची मनू भाकर आणि सरबज्योत सिंग यांचे कांस्यपदक जिंकल्याबद्दल मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा. अंबाला येथील सरबज्योतच्या घरी उत्सवाचे वातावरण होते. त्याचे वडील जतिंदर सिंग यांनी आपल्या मुलाने पदक जिंकल्याबद्दल आनंद व्यक्त केला. काँग्रेसचे नेते आणि हरयाणाचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुड्डा यांनीही कांस्यपदक जिंकल्याबद्दल भाकर आणि सरबज्योतचे अभिनंदन केले.

### २२ वर्षांनंतर बोपण्णाची निवृत्ती

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकच्या पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीत रविवारी झालेल्या पराभवानंतर भारतीय टेनिस स्टार रोहन बोपण्णाने निवृत्ती जाहीर केली. ४४ वर्षांचा बोपण्णा २२ वर्षे भारताकडून खेळत होता. त्याने २००२ मध्ये देशासाठी पदार्पण केले. रविवारी झालेल्या सामन्यात त्यांना गेल मॉन्फिल्स आणि एडवर्ड रॉजर व्हॅसेलिन या फ्रेंच जोडीने ५-७, ६-२ ने पराभूत केले. यासह भारतीय जोडी स्पर्धेतून बाहेर पडली. तो ६ ग्रॅंडस्लॅम पुरुष दुहेरी सामन्यांमध्ये अंतिम फेरीत होता. २०१७ मध्ये मिश्र दुहेरीत फ्रेंच ओपन आणि २०२४ मध्ये पुरुष दुहेरीत ऑस्ट्रेलियन ओपन जिंकले आहे. पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी, बोपण्णाने शेवटचे आशियाई खेळ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले होते, ज्यामध्ये रुतुजा भोसलेसह मिश्र दुहेरीत सुवर्णपदक जिंकले होते. ■

# विम्बल्डन विजेता अल्काराज स्नायुदुखीमळे त्रस्त

◆ **पॅरिस, ३० जुलै**

पॅरिस ऑलिम्पिकच्या टेनिसच्या पुरुषांच्या एकेरीत टॅलॉन ग्रोकेट्सपूरवर ६-१, ७-६ (३) जिंकल्यानंतर कार्लोस अल्काराज आनंदी आहे. या विजयानंतर तो म्हणाला की, विम्बल्डनपासून मांडीच्या स्नायूंमध्ये दुखण्यामुळे मी त्रस्त आहे. या सामन्यादरम्यान अल्काराझने उपचारही घेतले.



ऑलिम्पिक पुरुषांच्या दुहेरीत राफेल नदालशी जोडी करून तो खेळत आहे. यावर्षी फ्रेंच ओपन आणि विम्बल्डन विजेतेपद जिंकणारा अल्काराज म्हणाला, मला माहीत आहे की मी सध्या वेदनांसह खेळत आहे. मी शक्य तितक्या लवकर यावर मात करण्याचा प्रयत्न करेन.

अल्काराज म्हणाला की, ग्रिक्सपूरचा सामना करण्यापूर्वी त्याने नोवाक जोकोविचच्या नदालचा ६-१, ६-४ चा काही भाग पाहिला होता. तो म्हणाला, जेव्हा जोकोविच असा खेळ खेळत असताना त्याना सामोरे जाणे खरोखर कठीण आहे. तो अत्यंत आक्रमक खेळ सादर करीत आहे आणि कोणतीही चूक करीत नाही. राफेल चांगला खेळला पण ती त्याची सर्वोत्कृष्ट कामगिरी नव्हती.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये राफेल नदाल जिंकल्यानंतर अमेरिकेच्या ओपनच्या संदर्भात नोवाक जोकोविचने मॉन्ट्रियल ओपन टेनिस स्पर्धेतून आपले नाव मागे घेतले. ऑलिम्पिक पुरुषांच्या एकेरीच्या दुसऱ्या फेरीत जोकोविचने सोमवारी येथे सरळ सेटमध्ये नदालचा पराभव केला. ६ ऑगस्टपासून नॅशनल बँक ओपन एटीपी मास्टर्स १००० स्पर्धेत भाग घेण्याची जोकोविचची योजना होती परंतु आयोजकांनी सांगितले की त्यानी स्पर्धेतून माघार घेतली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# हरमनप्रीतच्या दोन गोलने भारताचा विजय

## भारतीय हॉकी संघाची विजयी घोडदौड ● आयर्लंडचा २-० ने पराभव

◆ **पॅरिस, ३० जुलै**

कर्णधार हरमनप्रीत सिंगच्या दोन गोलांच्या मदतीने आणि गोलकीपर पीआर श्रीजेशच्या उत्कृष्ट कामगिरीने भारतीय पुरुषांच्या हॉकी संघाने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आयर्लंडचा २-० ने पराभव केला.

पहिल्या दोन सामन्यांमध्ये अनेक चुका करणाऱ्या भारतीय संघाने पूल बीच्या तिसऱ्या सामन्यात मंगळवारी हाफटाईमपर्यंत आयर्लंडवर संपूर्ण दबाव कायम ठेवला. ११ व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकवर कर्णधार हरमनप्रीत सिंगने पहिला आणि १९ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरमध्ये दुसरा गोल केला.

पहिल्या सामन्यात न्यूझीलंडवर ३-२ च्या विजयात हरमनप्रीतने ५९ व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकवर विजय मिळविला. त्याच वेळी, रिओ ऑलिम्पिक चॅम्पियन अर्जेंटिनाविरुद्ध सोमवारी ५९ व्या मिनिटाला, त्याने पेनल्टी कॉर्नरचे रूपांतर केले आणि भारताला पराभवापासून वाचवले.

शेवटच्या सामन्यात सरासरी कामगिरी करणारे मिडफिल्डर्स मनप्रीत सिंग आणि हार्दिक सिंग यांनी आज चांगला खेळ सादर केला. पहिल्या क्वार्टरमध्ये पहिल्यांदा भारताने गोल केला, तर शेवटच्या दोन सामन्यांमधील पहिल्या गोलने विरोधी संघाने गोल केला.

या सामन्यात आयर्लंडला दहा पेनल्टी कॉर्नर मिळाले आणि भारताला नऊ पेनल्टी कॉर्नर आणि एक पेनल्टी मिळाला. पुढील दोन सामने भारताला सध्याचे चॅम्पियन्स बेल्जियम आणि ऑस्ट्रेलियासारख्या संघाशी खेळायचे आहेत. गेल्या वर्षी भारतीय संघाशी संबंधित प्रशिक्षक फुल्टन आयर्लंड संघाचा माजी प्रशिक्षक ठरला आहे.

भारतीय संघाने आक्रमक सुरुवात केली आणि दुसऱ्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण हरमनप्रीतला तो गोलमध्ये रूपांतरित करता आला नाही.


५२ व्या मिनिटाला ग्रीन कार्ड मिळाल्यामुळे भारतीय कर्णधार हरमनप्रीतला दोन मिनिटे मैदान सोडावे लागले. शेवटच्या क्षणी आयर्लंडला पेनल्टी कॉर्नर देखील मिळाला परंतु ते गोल करू शकले नाहीत. ◀(वृत्तसंस्था)



आयर्लंड संघावर विजय मिळवल्यानंतर आनंद साजरा करताना भारतीय हॉकीपटू

# सीन नदीतील पाण्याच्या गुणवत्तेबद्दल प्रश्नचिन्ह

## ट्रायथलॉन स्पर्धा पुढे ढकलली



◆ **पॅरिस, ३० जुलै**

पॅरिस ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा सीन नदीच्या काठावर झाला. यावर खूप चर्चा झाली, परंतु आता या नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेवर प्रश्न विचारला जात आहे. पाण्याच्या गुणवत्तेच्या चिंतेमुळे मंगळवारी होणारी ऑलिम्पिक ट्रायथलॉन पुढे ढकलण्यात आली आहे.

बुधवारी पुरुषांच्या ट्रायथलॉनचे आयोजन करण्याचा प्रयत्न करतील असे आयोजकांनी सांगितले. बुधवारी महिला स्पर्धा देखील नियोजित आहे, परंतु या दोघांचे आयोजन पाण्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असेल. हवामानशास्त्रीय विभागाच्या म्हणण्यानुसार, मंगळवार, बुधवार आणि गुरुवारी संध्याकाळी वादळ उद्भवू शकते, ज्यामुळे परिस्थिती आणखी बिघडू शकते.

मुसळधार पावसामुळे, सीन नदीतील जीवाणूंची पातळी वाढते. शुक्रवारी ऑलिम्पिक उद्घाटन समारंभात पॅरिसला मुसळधार पाऊस पडला आणि शनिवारी पाऊस सुरूच राहिला. सीन नदीतील पाण्याच्या गुणवत्तेच्या चिंतेमुळे रविवारी आणि सोमवारी ट्रायथलॉनची सराव सत्रे रद्द करावी लागली.

फ्रेंच क्रीडा मंत्री अमेली ऑडिया-कॅस्टेराने सोमवारी स्थानिक वाहिनीला सांगितले की अधिकारी या आयोजनाबद्दल आश्वस्त आहेत. नदीतील जीवाणूंच्या पातळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी केलेल्या योजना प्रभावी ठरल्या आहेत, परंतु हवामान त्यांच्या नियंत्रणाबाहेर आहे. ◀(वृत्तसंस्था)

### भारतीय नेमबाज टोन्मन २१ व्या क्रमांकावर

**पॅरिस** : भारतीय नेमबाज पृथ्वीराज टोन्मनने पुरुषांच्या ट्रॅप स्पर्धेच्या पात्रता फेरीच्या अंतिम दोन फेरीत अचूक लक्ष्य गाठले. परंतु तो २१ व्या क्रमांकावर होता. ■

# बलराज पनवारचा धमाका, उपांत्य फेरीत प्रवेश

◆ **पॅरिस, ३० जुलै**

भारताच्या स्टार रोअर बलराज पनवारने पुरुषांच्या सिंगल स्कल्स स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या सी आणि डी गटात प्रवेश केला आहे. बलराजने अंतिम (७:०५:१०) मध्ये २००० मीटर पूर्ण केले. त्याने पाचवे स्थान मिळवले. आता तो १३ ते २४ व्या स्थानावर खेळेल. चार क्वार्टर-फायनल हिटमध्ये पहिल्या तीनवर राहणारे खेळाडू उपांत्य फेरीच्या एबीमध्ये पोहोचले जे पदकासाठी स्पर्धा करतील. क्वार्टर -अंतिम सामन्यात चौथ्या हिटमध्ये २५ वर्षीय पनवार ५ व्या क्रमांकावर राहिला. तो उपांत्य फेरीच्या सी आणि डी गटामध्ये राहिला. हे खेळाडू १३ ते २४ व्या स्थानावर येतील. पनवारने रेपॅकलच्या शर्यतीत दुसरे स्थान मिळवून उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. शनिवारी, तो हिटच्या शर्यतीच्या पहिल्या फेरीत चौथ्या स्थानावर पोहोचला. तत्पूर्वी, बलराज पनवारने रविवारी वेरासे-सु-मार्ने नोटिकल स्टेडियमवर पुरुषांच्या सिंगल स्कल्स इव्हेंटच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात रेपेकेज फेरीत स्थान मिळवले. त्याने प्रथम ०३:३३.९४ मध्ये १००० मीटर पूर्ण केले आणि त्यावेळी ते दुसऱ्या क्रमांकावर होता. भारतीय लष्कारत असणाऱ्या बलराज पनवारने यावर्षी दक्षिण कोरियामधील आशियाई आणि ओशन रोइंग ऑलिम्पिक पात्रता रेगाटामध्ये कांस्यपदक जिंकून पॅरिस २४ ऑलिम्पिकसाठी स्थान मिळवले. ◀(वृत्तसंस्था)



# जसपालमुळेच मनूचा आत्मविश्वास वाढला

## वडील राम किशन यांनी व्यक्त केला आनंद

◆ **सुरजकुंड (हरियाणा), ३० जुलै**

नेमबाज मनू भाकरचे सुरजकुंडमधील घर पुन्हा एकदा उत्साहाने भरले आहे. मंगळवारी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये तिच्या ऐतिहासिक पदकानंतर येथे घरी येऊन चाहत्यांनी तिच्या आई-वडिलांवर अभिनंदनाचा वर्षाव केला.

ऑलिम्पिक स्पर्धेच्या एकाच आवृत्तीत दोन पदके मिळविणारी मनू भाकर पहिली ॲथ्लिट ठरली. तिने आणि सरबज्योत सिंग यांनी १० मीटर एअर पिस्तूल मिश्रित संघ कांस्यपदक जिंकून दक्षिण कोरियाला १६-१० ने पराभूत केले.

२२ वर्षीय हरियाणा शूटरने पॅरिसजवळील चॅटॉरॉक्स शूटिंग रेंजवर १०-अधिक स्कोअर शूट करण्यासाठी दबावाच्या परिस्थितीत प्रचंड शांतता आणि दृढनिश्चय दर्शविला.

भोकरचे वडील राम किशन म्हणाले की, पॅरिसमध्ये आपल्या मुलीच्या कामगिरीमुळे ते अवाक् झाले आहेत आणि प्रशिक्षक जसपाल राणाबरोबर जुळल्यानंतर तिच्यात प्रचंड आत्मविश्वास बळावला.

मी अवाक् झालो आहे. देशासाठी ही एक मोठी कामगिरी आहे, असे राम किशन यांनी सांगितले. येथे मिठाई वाटपासह ढोलताशा निनादत होता.

जसपाल राणा त्याच्या काळात एक उत्तम नेमबाज होते आणि त्यांची ट्यूनिंग खूप चांगली आहे. राम किशन म्हणाले, मनूचे प्रयत्न आणि जसपालचे आशीर्वाद यामुळेच हे यश मिळाले आहे. ◀(वृत्तसंस्था)



दुसरे कांस्य पदक मिळवल्यानंतर आनंद साजरा करताना मनू भाकरचे आई-वडील

# पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताचे सामने

**बॅडमिंटन** : दुपारी १२.०० वाजता- पुरुष एकेरी गट टप्पा (एच. एस. प्रणॉय, लक्ष्य सेन), महिला एकेरी गट टप्पा (पी. व्ही. सिंधू), पुरुष दुहेरी गट टप्पा (सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी).

**नेमबाजी** : दुपारी १२.३० वा.- ५० मी रायफल थ्री पोझीशन पुरुषांची पात्रता (ऐश्वरी तोमर, स्वप्निल कुसळे). ट्रॅप महिला पात्रता फेरी (राजेश्वरी कुमारी,श्रेयसी सिंग). सायंकाळी ७.०० वा.- महिला ट्रॅप अंतिम फेरी (पात्रतेच्या अधीन).

**रोइंग** : दुपारी १.२४ वा.- पुरुष एकल स्कल्स उपांत्य फेरी (पात्रतेच्या अधीन):

**घोडेस्वार** : दुपारी १:३० नंतर- ड्रेसेज वैयक्तिक दिवस १ (अनुष अग्रवाला)

**टेबल टेनिस** : दुपारी १:३० वा.- महिला एकेरी (मनिका बत्रा, श्रीजा अकुला)अंतिम ३२ ची फेरी (पात्रतेच्या अधीन). सायंकाळी ६.३० वा.- महिला एकेरी फेरी अंतिम १६ ची फेरी (पात्रतेच्या अधीन)

**मुष्टियुद्ध** : दुपारी ३:०२ नंतर- पुरुषांची ७१ किलो १६ फेरी (पात्रतेच्या अधीन). दुपारी ३.३४ वाजता- महिला ७५ किलो प्राथमिक फेरी (लवलिना बोर्गोहेन)

**तिरंदाजी** : दुपारी ३:३० वा.- पुरुषांची व महिलांची वैयक्तिक अंतिम ६४ व ३२ ची फेरी ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दोन्ही पक्षकारांतील वाद मध्यस्थीमुळे सुटणे सोपे होतात : ॲड.अंत्रोळीकर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

न्यायालयातील दोन्ही पक्षकारांमधील वाद जर कोणी मध्यस्थी करून सोडविले तर ते सोपे जाते व दोनही पक्षकरांमधील असलेले नाते संबंधातील कटूता तडजोडीमुळे संपून जाते, असे मत कौटुंबिक न्यायालय येथे मध्यस्थी या विषयावर आयोजीत केलेल्या चर्चासत्रात विधिज्ञा श्रीमती. आर. एम. अंत्रोळीकर यांनी व्यक्त केले. न्यायालयात दिर्घकाळ खटला चालवून न्याय मिळवायला बराच कालावधी लागतो. त्यामुळे पक्षकारांनी आपापसातील वाद मध्यस्थीमार्फत जर सोडविले तर पक्षकारांचा वेळ व पैसा वाचतो तसेच त्यांचा मानसिक त्रास कमी होतो. सध्या न्यायालयात प्रचंड प्रमाणात प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्याही कमी होण्यास यामुळे मदत होते असे मत प्रमुख न्यायाधीश, के. डी. शिरभाते यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. या चर्चासत्रासाठी व्याख्याते म्हणून उपस्थित असलेल्या आर.एम.अंत्राळीकर-शहा यांचा सत्कार के. डी. शिरभाते यांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून न्यायाधीश के. डी. शिरभाते व बार ॲसोशिएशन कौटुंबिक न्यायालयचे अध्यक्ष ॲड.एन. एम. स्वामी, तसेच समुपदेशक श्रीमती. एन. डी. मुलवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक हरिदास पोटाबत्ती यांनी केले तर आभार एन. एम. स्वामी यांनी मानले. कार्यक्रमास बहुसंख्य पक्षकार, विधिज्ञ तुपडे, श्रीमती. डोके, निलंकठ स्वामी, डि.एस नागटाळे, एस.सी.नदाफ तसेच सर्व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

### अण्णाप्पा काडादी हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचा शुक्रवारी स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

अण्णाप्पा काडादी हायस्कूलमधील माजी विद्यार्थ्यांचा सुवर्ण महोत्सवी स्नेह मेळावा शुक्रवार दि. २ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता काडादी हायस्कूलच्या सप्तर्षी हॉलमध्ये आयोजित केला आहे, अशी माहिती माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष उपेंद्र ठाकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी माजी विद्यार्थी मेळावा, गणित प्रयोगशाळा उद्घाटन आणि सुवर्णस्मृति स्मरणिकेचे प्रकाशन के.एल.ई. सोसायटी (बेळगाव)चे चेअरमन डॉ. प्रभाकर कोरे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी शालेय नियामक मंडळाच्या अध्यक्षा सिंधूताई काडादी, मुख्याध्यापक अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी या शाळेतील एस. एस सी. (जुनी अकरावी)च्या सन १९७४ मधील बॅचचे एकूण १०० माजी विद्यार्थी सपत्नीक या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला गणित प्रयोगशाळा समर्पित करण्यात येणार आहे. माजी विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने अंदाजे ४ लाख ५० हजार रुपये खर्चातून ही प्रयोगशाळा उभी केली आहे. दरम्यान, शुक्रवारी दुपारी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे माजी विद्यार्थ्यांचे इतर कार्यक्रम होणार आहेत. यावेळी मोठ्या संख्येने माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन उपेंद्र ठाकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत मराठा सेवा संघाचे माजी अध्यक्ष शरदचंद्र ढोकळे, परशुराम माढेकर, विजय राजपूत, वेणुगोपाळ शेट्टी, शिरीष गांधी उपस्थित होते.

### अक्कलकोट येथे व्हॉलीबॉल स्पर्धा सुरु

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ३० जुलै-**



फत्तेसिंह क्रीडा संकुलन अक्कलकोट येथे तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तालुका क्रीडा समन्वयक परमेश्वर व्हसुरे क्रीडा मार्गदर्शक अविनाश राठोड मुख्याध्यापक अभय शेटे कल्याणी लकशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गोविंद चव्हाण,नाशिक सय्यद,नृदिन देरेवाले, अमोल कोकाटे, प्रशांत राचोटे, राजेंद्र साखरे, अतुल पाटील, संदीप स्वामी, महेश कोरे, सोहेल शेख, सुभाष माने, कासिम महसूलदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन गुरव तर सुनील बिराजदार यांनी आभार मानले.

# मूकबधिर विद्यार्थी पर्यावरणपूरक राख्या बनवण्यात व्यस्त

## ● सौंदर्यपूर्ण राख्यांचे भरवले जाणार प्रदर्शन



**तभा वृत्तसेवा। यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

भावा बहिणीचे अतूट नाते म्हणून राखी पौर्णिमेकडे पाहिले जाते. याच राखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर मूकबधिर विद्यार्थी आपल्या हस्तकौशल्याच्या जोरावर आकर्षक आणि सौंदर्यपूर्ण राख्या बनवण्यात व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहे.

सोलापूर शहरातील ममता मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी राखी पौर्णिमे निमित्त सौंदर्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण अशा पर्यावरणपूरक राखी बनवण्याचे कार्य सुरू केले आहे. सायन लैंग्वेजच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने राख्या बनवायच्या हे शिकवले जात आहे. या विद्यालयामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना हस्तकौशल्याच्या माध्यमातून राखी पौर्णिमेच्या अनुषंगाने राखी बनवणे, दिवाळीच्या सणामध्ये आकर्षक आकाश कंदील आणि पणती तयार करणे, असे विविध उपक्रम घेतले जातात. त्याच अनुषंगाने राखी पौर्णिमा सण दृष्टिक्षेपात आला आहे. भावा बहिणीचे अतूट नाते या सणामधून दिसून येते. याच राखी पौर्णिमेनिमित्त पर्यावरण पूरक अशी राखी बनवली जात आहे. राखी पौर्णिमा सणाच्या एक महिन्या अगोदर पासून याचे कामकाज सुरू होते.

दरम्यान सदरची राखी ही पर्यावरण पूरक आहे. पेपर क्विलिंगसह मोती, खडे, सुती दोरा, चमकीचा दोरा, फेविकॉल या अशा विविध साहित्याच्या माध्यमातून आकर्षक अशी राखी तयार केली जात आहे. ममता मूकबधिर विद्यालयातील विविध वर्गातील विद्यार्थी यामध्ये हिरहिरीने सहभाग

**● राखी प्रदर्शनास भेट देण्याचे आवाहन**

राखी पौर्णिमा दिवशी शाळेच्या प्रांगणामध्ये सदरच्या आकर्षक राख्यांचे प्रदर्शन भरवले जाणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी तयार केलेले राख्या या ठिकाणी प्रदर्शनात ठेवण्यात येणार आहेत. परिसरातील नागरिकांनी तसेच सोलापूरवासियांनी या राख्यांचे प्रदर्शन पाहावे आणि राखी खरेदी करावी असे आवाहन शाळा आणि विद्यार्थ्यांच्यावतीने करण्यात आले आहे.

**● व्यावसायिक, पर्यावरण दृष्टिकोन**

ममता मूकबधिर विद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी हे मूकबधिर आहेत. त्यांच्या पुढील जीवनात हस्तकौशल्याच्या माध्यमातून व्यवसायीक दृष्टिकोन निर्माण केला जात आहे. स्वतःच्या पायावर उभे राहून एखादा व्यवसाय सुरू करून हे मूकबधिर विद्यार्थी विद्यार्थिनी कोणावरही अवलंबून न राहता. आपला उदरनिर्वाह करू शकतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांची सांगड घालून शिक्षण दिले जात आहे. विद्यार्थी देखील मोठ्या उत्साहात यामध्ये सहभाग नोंदवून आपले कलागुण अविष्कार सादर करत असतात.

**- नीता देशपांडे,**
हस्तकला शिक्षिका, ममता बधिर विद्यालय सोलापूर

# माजी आ.दिलीप माने यांचा शनिवारी नागरी सत्कार

**● १३ शेतकऱ्यांचा व भजन स्पर्धेतील विजेत्याचा होणार सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

माजी आ. दिलीप माने यांचा वाढदिवसानिमित्त शनिवार दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता जामगुंडी मंगल कार्यालयात नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती गौरव समितीचे सचिन चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या उज्वला शिंदे व खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते नागरी सत्कार होणार आहे. या समारंभास श्री सिध्देश्वर साखर कारखान्याचे मार्गदर्शक धर्मराज काडादी, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आ. राजन पाटील, शिवशरण पाटील, ज्येष्ठ नेते बळीराम साठे, शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष नंदकुमार पवार यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १३ शेतकऱ्यांचा आणि भजन स्पर्धेतील विजेत्या मंडळाचा सन्मान करण्यात येणार आहे.

यावेळी १३ शेतकऱ्यांचा सन्मान केला जाणार आहे. यामध्ये मल्लिकार्जुन हालप्पा बिराजदार-पाटील (निंबर्गी), नबीसाहेब बारुदवाले (भंडारकवठे), आप्पाराव कोले (कंदलगांव), मल्लिकार्जुन म्हमाने (हिपळे), दयानंद हल्ले (आहेरवाडी), निबण्णा जंगलगी (भंडारकवठे), मळसिध्द शेंडगे (मंद्रुप), काशिनाथ राठोड (फताटेवाडी), अंबंण्णा कांबळे (येळेगांव), केदार दिंडोरे (होटगी) मल्लण्णा म्हेत्रे (टाकळी), रामचंद्र बाळकृष्ण ढेपे (पाकणी), शिवाजी पाटील (तेलगांव) यांचा समावेश आहे.



माजी आ. दिलीप माने यांचा वाढदिवसानिमित्त आयोजित या पत्रकार परिषदेस गंगाधर बिराजदार, प्रथमेश पाटील, श्रीकांत मेलगे - पाटील, युवराज चव्हाण आदी उपस्थित होते.

# फसवणुकप्रकरणी मंद्रुपच्या संत सेवालाल निधी लिमिटेडच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

जास्तीचा परतावा देण्याचे आमिष दाखवून ६१ हजार रुपयांची फसवणुक करणाऱ्या मंद्रुपच्या संत सेवालाल निधी लिमिटेडच्या संचालक मंडळाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

शिवाजी नामदेव जाधव, सुनिता शिवाजी जाधव, सचिन शिवाजी जाधव, पुजा सचिन जाधव, सुजाता सचिन चव्हाण, सीमा वीरधवल शाह, मधुबेन राजनभाई पटेल, अर्चना प्रविण देशपांडे (सर्व रा. मंद्रुप) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत योगेश नागनाथ पवार (वय ४१, रा. अभिषेक पार्क, धुम्मा वस्ती,सोलापूर) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

सेवालाल निधी लिमिटेडचे संचालक शिवाजी जाधव यांची योगेश पवार यांच्याशी ओळख होती. शिवाजी याने योगेश यास पैसे गुंतविण्यास सांगून जास्तीचा परतावा देण्याचे आमिष दाखविले. त्यामुळे पवार याने जाधव याच्या सेवालाममध्ये १२ सप्टेंबर २०२२ मध्ये ५० हजार रुपयांची ठेव ठेवली. त्या ठेवीची मुदत संपल्यानंतर पवार याने जाधव यांना ठेवीची रक्कम व त्यावरील ११ हजार रुपये व्याज असे ६१ हजार रुपयांची मागणी केली असता जाधव याने रक्कम देण्यास टाळाटाळ केली. पोलिस निरीक्षक अजित लकडे तपास करीत आहेत.

**● फसवणुक झालेल्यांची संख्या वाढण्याची शक्यता**

पैसे गुंतवणुक करणाऱ्यांची संख्या ही खूप जास्त आहे. गुन्हा दाखल झालेले शिवाजी जाधव हे जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. ते गेल्या काही महिन्यापूर्वीच सेवानिवृत्त झालेले आहेत. संत सेवालाल निधी लिमिटेडमध्ये फसवणुक झाल्याबाबतच्या अनेक तक्रारी या मंद्रुप पोलिस ठाणे व सोलापूर ग्रामीण पोलिसांकडे नागरीकांनी केलेल्या होत्या. परंतु, पोलिसांकडून कोणतीही कारवाई झाली नव्हती. अखेर शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यामुळे या गुन्ह्यातील फसवणुक झालेल्या संख्या व फसवणुकीची रक्कम वाढण्याची शक्यता आहे.

# नवनीत हॉस्पीटलसमोर व सिव्हील हॉस्पीटलमधील ओपीडीसमोर हाणामारी

**● १० जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

दुचाकीचा धक्का लागल्याच्या कारणावरून नवनीत हॉस्पीटलसमोर व सिव्हील हॉस्पीटलमधील ओपीडीसमोर तरुणास बेदम मारहाण करून चाकूने मारहाण करणाऱ्या दहा जणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना सोमवारी दुपारी घडली.

याबाबत कृष्णा राजू जमादार (वय १९, रा. हुच्छेश्वर मठ भाग ३, कुमठा नाका, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन प्रकाश मौलावाले, अभिषेक चौधरी, विनायक मौलावाले, अक्षय चौधरी, इल्ली मौलावाले, राणा मौलावाले, अविनाश बाबावाले, महेश मौलावाले, विटल्या मन्सावाले, पापेश मन्सावाले (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास प्रकाश मौलावाले व त्याच्या साथीदारांनी नवनीत हॉस्पीटलसमोरील शितलादेवी मंदीराकडे जाणाऱ्या रोडवर कृष्णा जमादार याच्या दुचाकीस धक्का दिला. त्यावेळी जमादार हा विचारणा करण्यास गेल्यानंतर मौलावाले व इतरांनी त्यास हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जमादार याच्या दुचाकीवर दगडं मारून नुकसान केले. त्यानंतर जमादार हा उपचारासाठी सिव्हील हॉस्पीटलमध्ये गेला असताना सिव्हील हॉस्पीटलमधील १७ नंबर ओपीडीसमोर मौलावाले व इतरांनी बेकायदेशीर जमाव जमवून जमादार यास शिवीगाळ, दमदाटी करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यावेळी विनायक मौलावाले याने त्याच्याजवळी चाकूने जमादार याच्या उजव्या हातावर वार केला. तो वार जमादार याच्या करंगळीवर खोलवर लागला असून प्रकाश मौलावाले याने लोखंडी रॉडने जमादार याचे वडीलांच्या हातावर मारहाण करून जखमी केले. तसेच शनी जमादार व दिपक जमादार यांना अभिषेक चौधरी याने फायटरने मारहाण करून जखमी केले. तसेच जमादार याच्या दुचाकीचे नुकसान केले. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

# महाराष्ट्र विद्यालयाच्या १० खेळाडूंची जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जुलै-**



तालुका बुद्धिबळ स्पर्धेतून महाराष्ट्र विद्यालयाच्या १० खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड झाली.

सुलाखे इंग्लिश मीडियम स्कूल बार्शी येथे १४, १७ व १९ वयोगटातील मुले व मुलींच्या स्पर्धेतून विद्यालयाने ही कामगिरी केली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक पी.डी पाटील, योगेश उपळकर, विकास पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष एन. एन. जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिवए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व्ही.एस.पाटील, बी.के.भालके, प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस.सी. म हामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे आदींनी अभिनंदन केले.


**कामगिरी केलेले खेळाडू :** १४ वर्षे मुली : प्रथम क्रमांक सान्वी गोरे, चौथा क्रमांक गौरी माने. १७ वर्षे मुली : चौथा क्रमांक सृष्टी पाटील, पाचवा क्रमांक वेदिका घोळवे. १७ वर्षे मुले : द्वितीय क्रमांक प्रज्वल शिंदे, तिसरा क्रमांक हरीश कावरे व वयोगट १९ वर्षे मुली : तिसरा क्रमांक आदिती वायकर. १९ वर्षे मुले : प्रथम क्रमांक प्रसन्न जगदाळे, द्वितीय क्रमांक वेदांत खोसे, चौथा क्रमांक यज्ञेश जाधव.

## जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक

# आठव्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

श्री रमा जगदीश महिला बहुउद्देश्यीय महिला उत्कर्ष संस्थेच्या विद्यमाने आयोजित व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार व ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक मालिकेतील आठवी बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केली आहे. यामध्ये येत्या पाच महिन्यात तीन बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केल्या जाणार आहेत.



त्यामध्ये सर्वात जास्त गुण मिळवून विजयी झालेल्या चार गटातील प्रथम खेळाडूंना (९,११,१४,२३) चार गटात चार सायकली बक्षीस देण्यात येणार आहेत २ते५ क्रमांकापर्यंतच्या खेळाडूंना रोख बक्षीसे देण्यात येणार आहेत. या मालिकेतील आठवी स्पर्धा ११ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता जगदीश मंगल कार्यालय धर्मवीर संभाजी तलाव जवळ सोलापुर येथे सुरु होणार आहे. १२,१५,२४ व खुल्या गटात ही स्पर्धा आयोजित होणार असून ७,८,९,१०,११वर्षाखालील खेळाडू करिता उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी रोख बक्षीसे व ६०चषक मिळून २५ हजार रूपयांची बक्षीसे विजयी खेळाडूंना दिली जाणार आहेत. या स्पर्धेसाठी येताना खेळाडूंनी स्वतःचे बुद्धिबळपट व सोंगट्या आणाव्यात व स्पर्धेच्या संपूर्ण माहिती करता शरद नाईक सचिव सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन यांना (९४२३३३७३४६) या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष अर्जुन कदम, मधुकर नाईक, शिरीष नाईक, राजू राजपूत, नीता तांबोळकर, युवराज पंतूवाले, प्रा डॉ. शैलेन्द्र नाईक यांनी केले आहे.

# सोलापूरच्या यशस्वी महिला उद्योजिका अस्मिता गायकवाड

**● महिलांचे बचतगट वाढविण्यासाठी घेतले परिश्रम**
**● शेकडो महिलांना मिळवून दिला रोजगार**

**प्रत्येकाच्या आयुष्यात एखादा आदर्श असतो. मला अमुक अमुक व्यक्तीसारखं व्हायचंय, त्याच्यासारख यश मिळवायचं आहे, त्यांच्यासारखं राहणीमान, मानसन्मान मिळवायचा.. स्टार व्हायचं.. सेलिब्रेटी व्हायचं असं प्रत्येकाला वाटत असतं. अनेक जण त्या त्या प्रसिद्ध व्यक्तीची कॉपी करण्याचा प्रयत्नही करतात. कारण काय तर तो त्या व्यक्तींचा आदर्श, आयकॉन, सुपरहिरो, आवडता असतो. अशाच शेकडो महिलांचे आदर्शवत, सुपर वूमन, आयकॉन, स्टार व आयडॉल असणाऱ्या अस्मिता गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेला हा आढावा.**

अस्मिता गायकवाड या सोलापुरातीलच नव्हे महाराष्ट्रातील एक यशस्वी महिला उद्योजकांपैकी एक आहेत. बँकिंग, ॲग्रो टुरिझम, राजकीय, मिडिया क्षेत्रात आपल्या स्वतःची वेगळी छाप निर्माण केलेल्या अस्मिता यांनी सोलापुरातच नव्हे तर राज्याच्या अनेक भागात आदरानं घेतलं जातं. काही वर्षांपूर्वी महिलांचे उद्योग म्हणजे स्वयंरोजगार किंवा गृहउद्योग अशी परिस्थिती आपल्याकडे होती. हा बदल घडविण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली, ज्यांनी महिलांचे संघटन उभारलं

**▶ ॲग्रो कंपनी स्थापन करणार**

अस्मिता यांनी शहराबरोबरच ग्रामीण भागातील महिलांमधील बेरोजगारी संपविण्याचं स्वप्न उराशी बाळगलं आहे. त्यांनी ॲग्रो कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून त्यासंदर्भातील प्रस्ताव व आवश्यक ती कार्यवाही सुरू असून ५ जून २०२४ रोजी या कंपनीचा शुभारंभ होईल, असेही सांगण्यात आले. या कंपनीच्या माध्यमातून आंबा, चिक्कू, सीताफळ, सोयाबीन, आवळा व अन्य फळांवर प्रोसेस करून विविध खाद्यपदार्थ, जाम, औषधं निर्माण करण्यात येणार आहेत.



**▶ शेतकऱ्यांसाठी मंगल कार्यालय**

मोहोळ तालुक्यातील मसले चौधरी या गावात अस्मिता कृषी पर्यटन निर्माण करण्यात आले. निसर्गाच्या सान्निध्यात आपले आरोग्य चांगले राहील, हे कोविडने आपल्याला शिकवलं. त्यामुळे अस्मिता कृषी पर्यटनाची पर्वणी सोलापूरला येणाऱ्या पर्यटकांसाठी त्यांनी उपलब्ध करून दिली. येथे मंगल कार्यालय उभे करण्यात आले आहे. मुलीच्या किंवा मुलाच्या लग्नासाठी शेतकरी कर्ज काढतात. अवकाळी पाऊस, वादळी वारे, दुष्काळामुळे शेतीतून म्हणावे तसे उत्पन्न मिळत नाही, परिणामी कर्जाचा डोंगर वाढतच जातो, सावकारी लोकांकडून सातत्याने त्रास दिला असल्याने शेतकरी आत्महत्या करतात. अगदी कमी खर्चात चांगलं, दिमाखात लग्न करता यावं यासाठी अस्मिता गायकवाड यांनी मोहोळ तालुक्यातील मसले चौधरी या गावी असलेल्या अस्मिता पर्यटन केंद्र परिसरात मंगल कार्यालय उभारलं आहे. अवघ्या काही खर्चात शेतकऱ्यांच्या मुलाचे किंवा मुलीचे लग्न करता यावे, लग्नात होणाऱ्या अवाढव्य खर्चाची बचत व्हावी, कर्जामुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात याच हेतूने अस्मिता गायकवाड यांनी मंगल कार्यालय उभारले आहे.

**▶ महिलांसाठी गारमेंट प्रोजेक्ट उभारणार**

महिलांच्या हाताला काम मिळावे, महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारावी याच हेतूने अस्मिता यांनी गारमेंट प्रोजेक्ट सुरू करण्याचा निर्णय घेतला. येत्या काही दिवसात तो मंजूर झाल्यास तब्बल शेकडो महिलांना रोजगार मिळेल, असा गारमेंट प्रोजेक्ट सोलापुरात उभारणार आहे. महापालिकेत महिला व बालकल्याण समिती स्थापन करण्याबरोबरच मुली व महिलांना बसमध्ये मोफत प्रवासाचा प्रस्तावही अस्मिता यांनी सर्वप्रथम मांडला होता गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणात सक्रिय असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या राज्याच्या उपनेत्या अस्मिता या आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे पक्षाच्या शहर मध्य विधानसभा मतदारसंघाच्या प्रमुख दावेदार आहेत. शहरप्रमुख, नगरसेविका, सभापती, जिल्हाप्रमुख ते राज्याच्या उपनेत्या या पदावर काम करीत असताना शिवसेना वाढविण्यासाठी त्यांनी योगदान दिले.

**अस्मिता गायकवाड यांची पदे**

▶ उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना ▶ पक्षाच्या उपनेत्या. ▶ कार्याध्यक्ष, मनोरमा बँक. ▶ संपादिका, अस्मिता ▶ व्हिजन. ▶ माजी सदस्य, जिल्हा नियोजन मंडळ ▶ संचालिका, नागरी बँक असोसिएशन, सोलापूर, ▶ चेअरमन, वैभवलक्ष्मी पतसंस्था. ▶ माजी नगरसेविका, सोमपा. ▶ स्थायी समिती माजी विरोधी ▶ पक्षनेत्या ▶ माजी सदस्या महिला व बालकल्याण समिती, सोमपा. ▶ स्थापत्य समिती माजी उपसभापती, सोमपा. ▶ माजी सभापती मंड्या व उद्यान सभापती सोमपा.

**चेअरमन ते विद्यमान कार्याध्यक्षपर्यंतचा प्रवास**

वैभवलक्ष्मी पतसंस्थेच्या माध्यमातून आर्थिक आधार देणाऱ्या अस्मिता गायकवाड यांचे कार्य आज सातासमुद्रापार गेले आहे, हेही तितकेच खरे. प्रत्येक महिलेमध्ये एक वेगळेपण असते ते जपलं पाहिजे. समाजातील प्रत्येक क्षेत्रात काम केलं पाहिजे. विशेषतः आर्थिक क्षेत्रात महिलांनी आर्थिक सक्षम होण्याची खूप गरज आहे. हा इंटरनॅशनल अवॉर्ड माझे पती ॲड. सुरेशजी गायकवाड, मुलगा विराज, परीस व सून गौरी या सर्वांना व माझे आई-वडील, सासू-सासरे याचबरोबर राजकीय क्षेत्रामध्ये माझे रोल मॉडेल असणारे शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दवजी बाळासाहेब ठाकरे, रश्मी वहिनी उद्धवजी ठाकरे या सर्वांना मी धन्यवाद देईन. तसेच मला सामाजिक क्षेत्रात सतत मार्गदर्शन करणारे मनोरमा परिवाराचे श्रीकांतजी मोरे व शोभाताई मोरे या सर्वांच्या सहकार्य, मदत व मार्गदर्शनामुळे मला हा पुरस्कार मिळाला असे मानते.

**- अस्मिता गायकवाड, सोलापूर**

# हुतात्मा स्मृती मंदिरातील किरकोळ दुरुस्त्या राज्य नाट्य स्पर्धेपूर्वी पूर्ण करण्यात येणार

● महापालिका उपायुक्त लोकरे यांच्या समवेत शहरातील रंगकर्मींची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

त्वरित मोठे बजेट उपलब्ध होणार नसले तरी हुतात्मा स्मृती मंदिरातील सर्व किरकोळ दुरुस्त्या राज्य नाट्य स्पर्धेपूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी रंगकर्मींना दिले.

येथील हुतात्मा स्मृती मंदिरातील विविध अडचणींसंदर्भात महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी शहरातील रंगकर्मींची बैठक घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

शहरातील हुतात्मा स्मृती मंदिरामध्ये कलावंतांना अनेक अडचणींना सामाना करावा लागतो. अनेक साहित्य जुने व नादुरुस्त झालेले आहे. या सर्व अडचणींचा आढावा उपायुक्त आशिष लोकरे यांनी यावेळी घेतला. या बैठकीला रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे सदस्य गुरू वठारे, राज्य नाट्य स्पर्धेचे समन्वयक अमोल धाबळे, नाट्य परिषदेच्या उपनगरीय शाखेच्या उपाध्यक्ष मीरा शेंडगे आदी उपस्थित होते.

दरम्यान, या बैठकीत उपायुक्त आशिष लोकरे यांनी त्वरित मोठे बजेट उपलब्ध होणार नसले तरी सर्व किरकोळ दुरुस्त्या राज्य नाट्य स्पर्धेपूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. रंगमंचावर १६ स्पॉट लाइटची आवश्यकता आहे. मात्र, प्रत्यक्षात चारच आहेत त्वरित किमान दहा स्पॉटलाईट मंजूर करण्यात आले. तसेच घड्याळ, खुर्चा, कलावंताच्या सोयीसाठी भोजन कक्ष सुरू करणे, तिथे टेबल व खुर्च्या खरेदी करणे आदी बाबींची पूर्तता करण्यात येणार आहे. महिला स्वच्छतागृहातील समस्या त्वरित सोडविण्यात आल्या आहेत.



**● मेकअप रूम अद्ययावत करण्यात येणार**

नादुरुस्त खुर्च्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. सर्व खुर्च्यांवरील नंबर नव्याने टाकण्यात येणार आहेत. येथील मेकअप रूम अद्ययावत करण्यात येईल. कवी कुंजविहारी स्मारक दुरुस्त करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला.

**● रंगकर्मी नामदेव वठारे स्मरणार्थ वॉटर कुलर भेट देणार**

रंगकर्मींना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती. यासाठी प्रायोजक मिळतो का पाहावा, असे उपायुक्त आशिष लोकरे यांनी सुचवले असता गुरू वठारे यांनी रंगकर्मी नामदेव वठारे यांच्या स्मरणार्थ वॉटर कुलर भेट देण्याचे जाहीर केले. नाट्यप्रयोग सुरू असताना उशिरा येणाऱ्या प्रेक्षकांसाठी पूर्वी बॅटरीवाला होता. मागील काही वर्षांपासून ही सुविधा बंद होती. ती पुन्हा सुरू करण्यात येणार आहे, असेही यावेळी ठरविण्यात आले.






# मुंबई उच्च न्यायालयात संविधान पत्रिकेचे अनावरण

**सोलापूर, दि. ३० जुलै -**

मुंबई उच्च न्यायालयात न्यायमुर्ती देवेंद्रकुमार उपाध्ये यांच्या हस्ते संविधान पत्रिकेचे नुकतेच अनावरण करण्यात आले.

अॅडव्होकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया या वकिलांच्या संघटनेने गुरुपौर्णिमेनिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रारंभी संघटनेचे सदस्य अॅड. विक्रांत फताटे यांच्या हस्ते न्या. उपाध्ये यांचा सत्कार करण्यात आला. संघटनेने तयार केलेल्या अॅडव्होकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया या बारच्या वैयक्तिक अॅपचेही अनावरण न्या. उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात कृतार्थ पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष प्रशांत रेवळेकर, उपाध्यक्ष प्राची ताटके, सचिव सुरेश सब्रड, खजिनदार राकेश भाटकर, सुकुमार घनवट आदी उपस्थित होते.

'प्रेमातून प्रेमाकडे' पुस्तकाच्या अभिवाचनाने

# प्रिसिजन वाचन अभियानाचं दुसरं पान उघडणार

**● लेखिका डॉ.अरुणा ढेरे यांची मुलाखत साहित्यिक हेमकिरण पत्की घेणार**



सोलापूर, दि. ३० जुलै-

प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत 'प्रेमातून प्रेमाकडे' पुस्तकाच्या अभिवाचनाने या अभियानाचं दुसरं पान उघडणार असून सोलापूरकरांच्या प्रतिसादाला आम्ही साथ देत ऑगस्ट मधील कार्यक्रमासाठी घेऊन येत आहोत महाराष्ट्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व जेष्ठ कवियत्री, लेखिका, समीक्षिका डॉ अरुण ढेरे. अरुणा ढेरे लिखित प्रेमातून प्रेमाकडे या पुस्तकाचे अभिवाचन आणि त्यानंतर त्यांच्या प्रकट मुलखातीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जेष्ठ साहित्यिक हेमकिरण पत्की ही मुलाखत घेणार आहेत. तर प्रेमातून प्रेमाकडे ह्या पुस्तकाचे अभिवाचन ममता बोल्ली व जैद हसन हे करणार आहेत. अभिवाचन आणि मुलाखतीचा कार्यक्रम शनिवार ३ ऑगस्टला सायंकाळी ०६.२५वा. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होईल. वाचनप्रेमी रसिकांनी या अभियानात वाचन आणि श्रवणाचा आनंद घ्यावा असे आवाहन प्रिसिजन फाऊंडेशन तर्फे करण्यात येत आहे.

# ३ हजार ८७ विद्यार्थ्यांनी दिली पी.एचडी पेट-९ ची परीक्षा!

**● सोलापूर विद्यापीठाकडून ऑनलाईन वेबबेस्ड परीक्षा नियोजन यशस्वी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पी.एचडी प्रवेश पूर्व पेट-९ ची परीक्षा ३ हजार ८७ विद्यार्थ्यांनी दिली. विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून प्रथमच ऑनलाइन वेब बेस्ड पद्धतीने ही परीक्षा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांनी घरी व आपल्या सोयीच्या ठिकाणी बसून यशस्वीपणे ही परीक्षा दिली. ५७४ विद्यार्थ्यांनी या परीक्षेला गैरहजेरी दर्शवली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही परीक्षा यशस्वीपणे पार पडली. मंगळवारी सकाळच्या आणि दुपारच्या अशा दोन सत्रात परीक्षा पार पडली. सकाळच्या क्षेत्रात कॉमन तर दुपारच्या सत्रात संबंधित विषयाची परीक्षा पार पडली. विविध अभ्यासक्रम व विषयांच्या ४७७ जागांसाठी पीएचडी प्रवेश पूर्व पेट-९ ची परीक्षा पार पडली. ४ हजार २०० विद्यार्थ्यांनी यासाठी नोंदणी केली होती. महाराष्ट्रात सोलापूर विद्यापीठ प्रथमच पी. एचडी प्रवेश पूर्व परीक्षा ही ऑनलाईन वेब बेस्ड प्रणालीद्वारे घेण्यात यशस्वी झाली. महाराष्ट्र, देश व परदेशातून बसून देखील विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रणालीद्वारे ही परीक्षा दिली.

**१८० विद्यार्थ्यांवर कारवाई :** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर व प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन वेबसाईट प्रणालीद्वारे यशस्वीपणे पेट-९ची परीक्षा मंगळवारी घेण्यात आली. ३ हजार ८७ जणांनी ही परीक्षा दिली. ५७४ विद्यार्थी जॉईन झाले नाहीत. तर १८० विद्यार्थ्यांवर गैरप्रकार केल्याने त्यांच्यावर बाहेर पडण्याची कारवाई करण्यात आली. सकाळच्या सत्रात कॉमन पेपरच्या वेळेस काही विद्यार्थ्यांना जॉईन होताना हेल्पलाइन नंबरवरून मदत करण्यात आली. मॉक टेस्ट घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने परीक्षा देता आली. सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा चांगल्या पद्धतीने पार पडली.

**- डॉ. श्रीकांत अंधारे,**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# महसूल कर्मचारी संघटना अध्यक्षपदी निवृत्ती लांडगे; रविराज नष्टे सरचिटणीस, कार्याध्यक्षपदी गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी निवृत्ती लांडगे, सरचिटणीसपदी रविराज नष्टे तर कार्याध्यक्षपदी गजानन गायकवाड यांची निवड झाली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीत नागनाथ माळवदकर हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपस्थीत होते. या वेळी महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष शंतनू गायकवाड, सहसचिव धर्यशिल जाधव, विभागीय सहसचिव, प्रविण शिरसीकर, ज्योतीबा पवार, तसेच महसूल



संघटनेचे अध्यक्ष जयंत जुगदार, सरचिटणीस अमर भिंगे, महसूल पतसंस्थेचे चेअरमन सुखदेव पाटील व इतर पदाधिकारी उपस्थित होते. या सभेचे प्रास्ताविक लक्ष्मीकांत आयगोळे यांनी केले.ज्योतीबा पवार यांनी आभार केले.

**इतर कार्यकारिणी :** रणजित म्हेत्रे- कोषाध्यक्ष, तृप्ती पुजारी- संघटक, यल्लप्पा वरगंट्टी- शहर अध्यक्ष, सुभाष मुपडे शहर सचिव , गंगाधर हाके- शहर कार्याध्यक्ष,मुदस्सर मंगळूरकर शहर कोषाध्यक्ष, राजकन्या साळुंखे-शहर महिला प्रतिनिधी, सोलापूर विभाग क्रं.१ उपाध्यक्ष रामराजे जाधवर, सहसचिव मल्लिनाथ लाकडे, महिला प्रतिनिधी स्मिता कोल्हे, सोलापूर विभाग क्र.२ उपाध्यक्ष समाधान राऊत, सहसचिव मल्लिकार्जुन सुतार, महिला प्रतिनिधी पल्लवी शेंडगे, पंढरपूर विभाग उपाध्यक्ष चंद्रकांत ढवळे, सहसचिव अजित वाघमोडे, महिला प्रतिनिधी मनिषा अंकुशे, मंगळवेढा विभाग उपाध्यक्ष मिलिंद पेटकर, सहसचिव एस. आर. कोळी, महिला प्रतिनिधी सविता पापरकर, माढा विभाग उपाध्यक्ष विजय देवकांबळे, सहसचिव परमेश्वर ठोकळ, महिला प्रतिनिधी मनिषा मुंढे, माळशिरस विभाग उपाध्यक्ष चंद्रशेखर लोखंडे, सहसचिव हरी भाकरे, महिला प्रतिनिधी निता गोडसे, वाहन चालक उपाध्यक्ष राजेश पाटील.

# अतिसार थांबवा मोहिमेमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनेबरोबर जनजागृतीही महत्त्वाची

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

अतिसार थांबवा मोहिमेमध्ये प्रत्येक गावात शाश्वत स्वच्छता व पिण्यासाठी शुद्ध पाणी पुरवठा करणे यासारख्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेबरोबर जिल्ह्यातील ग्रामस्थांमध्ये जनजागृतीही महत्त्वाची आहे असे प्रतिपादन उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी केले.

अतिसार थांबवा मोहिम (स्टाप डायरिया) अंतर्गत आज समाज कल्याण केंद्र, रंगभवन सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव हे बोलत होते. यावेळी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता सुनिल कटकधोंड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मोहन शेगर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मिनाक्षी बनसोडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुप्रिया शिंदे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, कनिष्ठ भूवैज्ञानिक निंबाळकर, प्रायमुव्हचे समन्वयक डॉ. ए. सी. मुजावर, सहाय्यक गट विकास अधिकारी सावंत, जिल्हा कक्षमधील कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन सोनकांबळे, माध्यम विस्तार अधिकारी आदी उपस्थित होते.



**प्रभावीपणे अंमलबजावणी करावी**



जिल्ह्यात सर्व तालुकास्तरावर अतिसार थांबवा या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्राम पंचायत व इतर शासकीय यंत्रणा, सर्व विभाग या अभियानात सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. गाव पातळीवर पाणी समितीची स्थापना, बळकटीकरण समितीद्वारे गाव पातळीवर पाण्याचे स्त्रोतांची स्वच्छता, स्वच्छ भारत मिशन ( ग्रामीण) - २ अंतर्गत गावे हागणदारीमुक्त अधिक (ओडीएफ प्लस) करणे, गाव पातळीवर कार्यात्मक नळ जोडणी करणे, छतावरील पाणी संकलन, हात पंप दुरुस्ती याबाबत प्रत्यक्ष गाव पातळीवर प्रभात फेऱ्या काढून जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**- मनिषा आव्हाळे,** मुख्य कार्यकारी अधिकारी







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मानपानावरून विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

लग्नात योग्य मानपान केला नाही व माहेरहून एक लाख रुपये घेऊन ये असे म्हणत विवाहितेला मारहाण करत उपाशी ठेवून शारीरिक व मानसिक त्रास देत छळ केल्याप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी फरहाना नदीम बागवान (वय २५, रा. बोल्ली मंगल कार्यालय जवळ, अशोक चौक) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती नदीम बागवान, चुलत सासरे महबूब शेख, सासु राशद बागवान (रा.हडपसर, पुणे) व पतीचे मामा बाशा बागवान (रा. पाथरूड चौक, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. नोव्हेंबर २०१८ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत फरहाना बागवान या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती नदीम व त्याच्या घरातील लोकांनी लग्नात योग्य मानपान केला नाही, माहेरून १ लाख रुपये आणावेत म्हणून फरहानाचा छळ केला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार सय्यद हे करीत आहेत.



## क्राईम वृत्त...

### अवंती नगरातून दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

जुना पुना नाका येथील अवंती नगर येथून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी राजेश अरुण जाधव (वय ४०, रा. अवंती नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. राजेश जाधव यांनी त्यांच्या घराजवळ दुचाकी क्रमांक एमएच १३ सीपी ३४४३ ही हँडल लॉक करून ठेवलेली होती. २५ जुलैच्या पहाटेच्या सुमारा ती दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून हाणामारी; दहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

किरकोळ कारणावरून गैर कायद्याची मंडळी जमा करून तरूणास हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करत खिशातून फायटर काढून तरुणाच्या डोक्यात मारून जखमी केल्याप्रकरणी १० जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी दुपारी सिव्हिल हॉस्पिटल येथील ए ब्लॉक समोर घडली. याप्रकरणी सुगत शिवलाल कांबळे (वय १९, रा. भाजी मार्केट बुद्ध विहार) याने दिलेल्या फिर्यादीवरुन प्रकाश मौलावाले, अभिषेक चौधरी, विनायक मौलावाले, अक्षय चौधरी, इल्ली मौलावाले, राणा मौलावाले, अविनाश बाबावाले, महेश मौलावाले, विटल्या मन्सावाले, पापेश मन्सावाले (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध १० जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अहिवळे हे करीत आहेत.

# चक्क! मेथी मार्केट यार्डाच्या रस्त्यावर!

## ● महागलेला भाजीपाला कोसळला अन् रस्त्यावर सडू लागला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

**भाजीपाला अत्यावश्यक मात्र त्याचे अतिरिक्त उत्पादन झाले की त्याला कोणी किंमत देत नाही. कधीकाळी ४०- ५० रुपये पेंडीने विकली जाणारी मेथी सध्या मार्केट यार्डच्या रस्त्यावर पडून सडू लागली आहे. त्यातून दुर्गंधी सुटू नये म्हणून मार्केट यार्डातील स्वच्छता कर्मचारी खोऱ्याने गोळा करून ट्रॅक्टरमध्ये भरून त्याची विल्हेवाट लावत आहेत. एकीकडे पडलेला भाव, दुसरीकडे कृषी उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची खरेदी करताना वाढलेली महागाई, लादलेली जीएसटी यामध्ये शेतकरी दबला जात असताना पडलेल्या भाजीपालाच्या दराने जगाचा पोशिंदा अन्नदाता बळीराजा पार हतबल झाला आहे.**



रणरणत्या उन्हामध्ये नाही तर जूनच्या महिन्यात मृग नक्षत्राच्या सरी आशादायकपणे बरसत असताना भाजीपाल्याचा दर गगनाला भिडला होता. खरेदी करणारे खवय्ये भाजीपाल्याला वगळून दाळ आणि भातावर आले होते. महिन्याचा कालावधी लोटला नाही. पावसाची सुरुवात झाली. भाजीपाला उत्पादनासाठी पोषक वातावरण तयार झाले आणि अमाप मेथीचे पीक आले. अचानकपणे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मेथीच्या भाजीची मोठ्या प्रमाणात आवक झाली. दर पडला आणि ग्राहक मेथी खरेदीपासून लांब जाऊ लागले. खवय्ये खाणार खाणार तरी किती? साठवूनही ठेवताही येत नाही. यामुळे नाशवंत भाजीपाला असलेल्या मेथी खरेदी करण्याकडे कोणीच येत नसल्याने चक्क शेतकऱ्यांनी सोलापूरच्या श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रस्त्यावर मेथीची भाजी ओतून आसवे पुसत, स्वतःच्या नशिबाला दोष देत मार्केट यार्डाचा निरोप घेत आहेत. वर पावसाच्या सरी कोसळत असताना रस्त्यावर पडलेली भाजी तशीच राहिली तर सडून दुर्गंधी सुटेल या भीतीने खोऱ्याने काढून ट्रॅक्टरमध्ये भरून त्याची विल्हेवाट लावली आहे.

### ● मेथीची इतकी झाली आवक



सोमवारी सोलापूरच्या बाजार समितीमध्ये सहा हजार ९ पेंडी मेथीची आवक झाली होती. त्याला कमीत कमी २००, जास्तीत जास्त ८००, सर्वसाधारण ५०० रुपये इतका दर शंभर पेंडीला मिळाला आहे. म्हणजे एका पेंडीचा दर फारच कमी झाल्याने मेथी उत्पादकांना रस्त्यावर भाजी टाकावी लागत आहे. कोथिंबीर, पालक, शेपू, टोमॅटो, वांगी या भाज्यांचाही दर खाली आला आहे. त्यामुळे भाजीपाला उत्पादक अडचणीत सापडला आहे.

### स्थानिकसह बाहेरून आवक



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोलापूर जिल्ह्यासह कर्नाटक, मराठवाडा, आंध्रप्रदेशातून मोठ्या प्रमणात भाजीपाल्याची आवक होत आहे. सोलापूर बाजार समितीतून भाज्यांची जिल्ह्याच्या बाहेर व परराज्यात निर्यात होते. यंदा सगळीकडून आवक झाल्याने मेथीचा भाव पडला आहे. शेतकऱ्यांनी अंदाज घेऊन भाव मिळेल याचा अभ्यास करून भाजीपाल्याचे उत्पादन करावे.

**- दौलतराज गोविंद,**
भाजीपाला विक्रेता, सोलापूर



# विजापूर रोड परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई

**● चार चाकी हातगाडी, एक लोखंडी खोका, पाच वजन काटे जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने गजबजलेल्या विजापूर महामार्गावरील फुटपाथ वरील भाजी विक्रेत्यांवर कारवाई केली. येथील रस्त्यावरील चार चाकी गाडी, एक लोखंडी खोका यासह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, विजापूर रोड फुटपाथ वर रहदारीस अडथळा येईल अशा प्रकारे अतिक्रमण करून भाजी व फळ विक्रेते व्यवसाय करत आहेत. यामुळे या ठिकाणी सायंकाळी नियमितपणे कारवाईची मोहीम राबवली जात आहे. मात्र सकाळच्या सत्रात येथील अनधिकृत भाजी व फळ विक्रेते ठाण मांडून असतात अशी ओरड सुरू आहे. त्यामुळे आज सकाळी दहा वाजताच महापालिका अतिक्रमणविरोधी पथक येथे दाखल झाले. यावेळी अनधिकृत फळ व भाजी विक्रेत्यांची चांगलीच धावपळ उडाली. यावेळी येथील एक चार चाकी हात गाडी , एक लोखंडी खोका, पाच वजन काटे जप्त करण्यात आले. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.

सोलापूर शहरात अनधिकृतपणे रहदारीस अडथळा ठरेल अशा प्रकारे कोणीही व्यवसाय करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रभारी प्रमुख मुर्तुजा शहापुरे यांनी केले आहे.

## भाजपाच्या भटक्या विमुक्त आघाडीच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी चंद्रकांत गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

भारतीय जनता पक्षाच्या भटक्या विमुक्त आघाडीच्या पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी चंद्रकांत गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती भाजपा भटक्या विमुक्त आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राहुल केंद्रे यांच्या आदेशाने करण्यात आली असून या निवडीबद्दल आ. विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, सोलापूर शहर भाजपचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांनी अभिनंदन केले आहे.











सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८४६

**माते तृण बाळा दुधाची ते गोडी ।**
**ज्याची नये जोडी त्यासी कामा ।।**

समाजात असे अनेक लोक असतात की जे स्वत: खूप कष्ट करतात आणि त्या कष्टातून साध्य झालेले इतरांना उपभोगासाठी मुक्तमनाने देऊन टाकतात. अशा माणसांची संख्या खूप कमी असली तरीही खऱ्या अर्थाने समाजातील चांगुलपणाचे अस्तित्व अशा महान लोकांच्या मुक्त मनाने देण्याच्या वृत्तीवर अवलंबून असते. संत महात्यांनी अतोनात कष्ट भोगून समाजाला ज्ञान दिले नसते तर समाज अज्ञानाच्या अंध:कारात चाचपडत राहिला असता. राष्ट्रभक्तांनी आपले बलिदान करून स्वातंत्र्य मिळवून दिले नसते तर आपण गुलामगिरीत अडकून राहिलो असतो. संत, महात्म्ये, राष्ट्रभक्तांसारखे अनेक लोक स्वत: खूप कष्ट भोगतात; पण या कष्टातून निर्माण होणाऱ्या फलिताचा ते उपभोग घेत नाहीत. त्यांनी मिळविलेले फलित त्यांच्या कामी न येता समाजाच्या कामी येते. गाय दिवसभर रानात, डोंगरात उन्हात वणवण भटकून मिळेल ते ओला-वाळला चारा खाते आणि त्यापासून निर्माण होणारे दूध मात्र तिच्या वासराच्या कामी येते. ते दूध वासराला देण्यातच तिला खरा आनंद मिळतो. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**माते तृण बाळा दुधाची ते गोडी ।**
**ज्याची नये जोडी त्यासी कामा ।।**

स्वत: कष्ट करून इतरांना देणारे समाजात खूप कमी आहेत, मात्र इतरांच्या कष्टावर डल्ला मारणारे समाजात खूप आहेत. अशा लोकांमुळेच खऱ्या अर्थाने समाज अधोगतीच्या मार्गावर वाटचाल करीत आहे. समाजाची ही वाटचाल योग्य मार्गाकडे वळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या साधुसंतांना, महात्म्यांना, समाजसुधारकांना स्वार्थी लोक सरळपणे कामे करू देत नाहीत. त्यांच्या कामात अडसर आणण्याचा प्रयत्न कांही लोकांकडून झाल्याशिवाय राहत नाही. आपल्या कष्टातून इतरांना देण्याची मनोवृत्ती जोपासणे व त्याप्रमाणे वागणे ही साधी बाब नाही. मानवी जीवनातील ही बाब महत्वपुर्ण असली तरीही अत्यंत अवघड बाब आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. आपल्याकडील प्रचंड साठ्यातून मूठभर लोकांना द्यायचे आणि त्याची प्रचंड प्रसिध्दी करून घ्यायची हे मात्र अनेकांना जमते. अर्थात, इतरांना देण्यातूनही लोक स्वार्थ साधून मोकळे होतात. इतरांना वस्तू देण्याचे तर जाऊच द्या. पण दिल्याने वाढले जाणारे ज्ञानही लोक इतरांना मुक्तमनाने देत नाहीत. इतरांना दिल्याने एखादा आपल्यापेक्षा वरचढ होईल व आपला मान कमी होईल असे अनेकांना वाटत असावे. जर असे वाटत नसते तर सर्वच ज्ञानी लोकांनी मुक्तमनाने ज्ञानदान केल्याचे आपणाला पाहायला व अनुभवायला मिळाले असते. बरेच लोक त्यांच्याकडील इतरांना तर कांहीच देत नाहीत, पण कुटुंबातल्या सदस्यांनाही देत नाहीत. असो,आपणाला ज्ञानोबा-तुकोबांचे भक्त म्हणून घ्यायचे असेल तर आपणाला इतरांना जेवढे देता येईल तेवढे मुक्तमनाने द्यावेच लागणार आहे, हे लक्षात ठेवायला हवे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार
दि. ३१ जुलै २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - आषाढ
कृ. एकादशी (१५.५५)
ऋतु - वसंत
नक्षत्र- रोहिणी (१०.२२)
योग - ध्रुव (१४.१३)
करण - कौलव (२७.३९)
सुर्योदय - ०६.१७
सूर्यास्त - १९.१२
दिनविशेष -
कामिका एकादशी

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ** : मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन** : स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क** : घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह** : हितशत्रूंचा काही प्रम ाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या** : मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ** : व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु** : विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन** : मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# संपूर्ण शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याच्या हालचाली

## उजनी धरणाची पाणीपातळी वाढत असल्याने महापालिकेकडून नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

आता उजनी धरणात मुबलक पाणी साठा उपलब्ध झाल्याने नव्याने नियोजन आखून शहराला आणि हद्दवाढला सरसकट चार दिवसाआड पाणीपुरवठा आणि पुढे काही दिवसांनी सरसकट तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यामुळे नागरिकांना दिलासा मिळू शकणार आहे.

सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणातील पाणी पातळी खालावल्याने दुबार आणि तिबार पंपिंग सुरू करण्यात आले होते. ही प्रक्रिया करताना शहरातील पाणीपुरवठा चार दिवसाआड तर हद्दवाढ भागातील पाणीपुरवठा पाच दिवसाआड करण्यात आला होता. यासंदर्भात हद्दवाढ भागातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात ओरड होत असल्याने कोणत्याही प्रकारचा दुजाभाव न करता आता संपूर्ण शहरात चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

महापालिका प्रशासनाने शहराला सुरळीत पाणीपुरवठा करता यावा यासाठी विविध



उपायोजना आखल्या आहेत. मागील वर्षी कमी पावसामुळे उजनी धरण पूर्ण क्षमतेने न भरल्याने ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर उजनीतील पाण्याची पातळी कमी झाली होती. यामुळे प्रथम दुबार पंपिंग सुरू करून शहराचा पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आखण्यात आले होते. यानंतर मात्र उजनी धरण वजा ५० गाठल्याने तिबार पंपिंग प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

यंदाच्या पावसाळ्यात धरण परिसरात जोरदार पाऊस झाल्याने उजनी धरणातील पाण्याची पातळी वाढली आता उजनी धरण प्लस मध्ये येऊन धरण भरण्याकडे वाटचाल सुरू ठेवली आहे. यातूनच महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तिबार पंपिंग प्रक्रिया आणि त्या पाठोपाठ दुबार पंपिंग प्रक्रिया बंद केली आहे.

उजनी धरणातून तिबार पंपिंग सुरू असताना शहराचा पाणीपुरवठा चार दिवसाआड तर हद्दवाढ भागातील पाणीपुरवठा पाच दिवसाआड करण्यात आला होता. याचे नियोजन देखील आखण्यात आले होते. यानुसार सध्याही पाणीपुरवठा सुरू आहे. त्यावेळी महापालिका प्रशासनाने धरणातील पाणी पातळी वाढल्यास शहर आणि हद्द वाढला सरसकट पाणीपुरवठा आणि शक्यतो यामध्ये एक दिवसाने पाणीपुरवठा कमी करण्याची घोषणा केली होती.

दरम्यान, सोलापूर शहराला चार दिवसाआड आणि हद्दवाढ भागाला पाच दिवसाआड त्यातही हद्दवाढ भागातील अनेक भागांमध्ये आठ आठ दिवस पाणीपुरवठा होत नसल्याने या भागातील नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया आणि ओरड सुरू झाली होती. उजनी धरणातील पाणी पातळी वाढत असल्याने आता महापालिका प्रशासनाकडून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न आहे.

## जीवनात ध्येय हवे : साध्वी प्राचीश्रीजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**




जीवनात उच्च ध्येय, लक्ष हवे. एक ध्येय ठेवून वाटचाल करा.त्या ध्येयाप्रत पोहोचण्यासाठी आपण प्रयत्न करा असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका परमपूज्य साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

बलिदान चौक येथील जैन स्थानकात चातुर्मासानिमित्त आयोजित प्रवचनात बोलत होत्या .यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, आपली जिज्ञासा वृत्ती नेहमी जागृत असावी.नवनवीन ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. आपल्या मनातील शंका गुरूसमोर मांडावयास हवे. गुरुनादेखील ज्ञानपीपासू शिष्य प्रिय असतात. गुरूंकडे ज्ञानामृत असते. फक्त शिष्याची इच्छा असावी लागते हे सांगताना त्यांनी जम्बुस्वामी आणि सुधर्मास्वामी यांचे उदाहरण दिले. दान व दानाचे प्रकार सांगताना त्या म्हणाल्या, आपल्याकडे असलेल्या संपत्तीचा सदुपयोग करा, दानधर्मासाठी वापर करा. फक्त संपत्ती दान म्हणजे दान नव्हे. आपल्याकडे असलेल्या वेळेपैकी काही वेळ धार्मिक कार्यासाठी देऊन वेळेचा देखील दान करा. शब्द दान म्हणजे आपल्याकडे कोणी एखादी सम स्या घेऊन किंवा काही सल्ला विचारण्यासाठी आला तर त्याला योग्य तो सल्ला द्या.त्याला बरे वाटेल, समाधान वाटेल, त्याचे मनोधैर्य वाढेल असे दोन शब्द खर्च करा, सांत्वन पर शब्द बोला. समोरच्याचे म्हणणे ऐका. यथाशक्ती सेवा करा.आपल्या नातेवाईकांमध्ये आपला आदर्श ठेवा.आपले व्यक्तिमत्व आदर्श व प्रभावशाली आहे का याचा विचार करा. लोकांसमोर आपला आदर्श ठेवा.

नुतीश्री आयुष सुराणा यांनी नऊ उपवास म्हणजे बडी तपस्या केल्याबद्दल संघातर्फे या महान तपस्वीचे अभिनंदन करण्यात आले.




## समता विद्यालयात शिक्षण सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

येथील मागास समाजसेवा मंडळ संचलित समता मराठी विद्यालयात राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. या दरम्यान सात दिवसातल्या प्रत्येक दिवशी वेगवेगळे उपक्रम शाळेत राबविण्यात आले असल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक जयवंत हक्के यांनी दिली.

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग यांच्या वतीने झालेल्या शिक्षण सप्ताह पाळण्यात आला. सप्ताहामध्ये अध्यापन-शिक्षण साहित्य दिवस, पायाभूत साक्षरता, आणि अंकता दिवस, क्रीडा दिन आणि सांस्कृतिक दिवस यांचा सम ावेश होता. शिक्षण सप्ताहासाठी शाळेचे मुख्याध्यापक जयवंत हक्के यांच्या मार्गदर्शनाखाली मिनाक्षी दि राठोड, सुनिता पवार, चारूशिला म्हमाणे, ज्योती रणसिंग, संतोष रजपूत, सुजाता डोंगरे, मिनाक्षी एस राठोड, कल्पना वाघमारे, समिना मुजावर, लता क्षिरसागर, रामराव चव्हाण, अनिल चव्हाण यांनी या शिक्षण सप्ताहात मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना उपक्रम सांगितले.

# सिव्हिल हॉस्पिटलजवळ रस्त्यावरील कचरा, जनावरांच्या अनधिकृत कत्तली रोखा

### पालिका उपायुक्तांसह मक्तेदारावर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

सिव्हिल हॉस्पिटलजवळ रस्त्यावरील कचरा, जनावरांची अनधिकृत कत्तलीच्या सार्वजनिक उपद्रवाबद्दल जिल्हाधिकारी, पोलीस व सोमपा आयुक्तांकडे डॉ. संदीप आडके यांनी तक्रार केली असून मनपाचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप, घनकचरा मक्तेदार व सर्व संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.

सिव्हील हॉस्पिटल जवळील आडके हॉस्पिटलच्या जवळ २४ तास रस्त्यावर अस्ताव्यस्त कचरा, बीडयाची पाने टाकलेली असतात. त्यामुळे तेथे कुत्रे, गाढवे व इतर मोकाट जनावरांचा वावर होत आहे. शेजारीच




येथील एका नगरसेवकाने अनधिकृत पणे मुतारी बांधलेली आहे. पण त्याचा गैरवापर होऊन सर्रास लोक रस्त्यावरच लघुशंका करणे, रस्त्यावर शौचास बसणे अशा घाणेरड्या प्रकरणामुळे येथून जाणे मुश्किल झाले आहे व रहदारीस अडथळा होत आहे.

शेजारीच सिव्हिल हॉस्पिटल व निवासी डॉक्टरांचे वसतीगृह आहे, तसेच बाजूलाच अनेक हॉस्पिटल्स व इमारती आहेत. त्यातच दि. २७ जुलै २०२४ रोजी येथे अनधिकृत पणे बोकडांची विक्री करण्यात आलेली आहे.

दुसऱ्या दिवशी आषाढ सणानिमित्त परिसरातील लोकांनी प्रतिबंध असताना सुद्धा या बोकडांची कत्तल घरी करून त्याची घाण या ठिकाणी टाकलेली आहे. त्याबाबत डॉ. संदीप आडके यांनी जिल्हाधिकारी, सोमपा आयुक्त व सदर बझार पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केलेली आहे. सार्वजनिक ठिकाणी घाण करणे, लोकांच्या आरोग्याला हानी पोहोचवणे, शहराचे विद्रूपिक करणे, अनधिकृत प्राण्यांची विक्री व कत्तल करणे यावर फौजदारी कलम ५१०, १३३ व महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १९७६ प्रमाणे कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.

तसेच कर्तव्यात कसूर करण्याबद्दल सोलापूर म हानगरपालिकेचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप, मुख्य सफाई अधीक्षक एन सी बिराजदार, सफाई निरीक्षक अन्वर शेख, प्रकाश नरळे, जितू मोरे व सर्व संबंधित कर्मचाऱ्यांवर तसेच घनकचरा व्यवस्थापन मक्तेदारावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

सोलापूर स्मार्ट सिटीत असे घाणेरडे प्रकार सर्व ठिकाणी होताना दिसत आहेत. यावर तात्काळ प्रतिबंधन न झाल्यास पुढील अतिशय कठोर पावले उचलण्याचा इशारा डॉ. आडके यांनी दिलेला आहे.



## वालचंद महाविद्यालयात शिक्षण सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त २२ ते २८ जुलै या कालावधीत, वालचंद कला व शास्त्र कनिष्ठ महाविद्यालय विभागात शिक्षण सप्ताह विद्यार्थ्यांच्या उत्साह पूर्ण, कृतीयुक्त सहभागाने व वैविध्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांनी संपन्न झाला.

शिक्षण सप्ताहाच्यासमारोपाच्या दिवशी विद्यांजली या उपक्रमांतर्गत लोक सहभागातून माजी विद्यार्थ्यांकडून, पालकांकडून, महाविद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना स्वयंप्रेरणेने, वह्या-पुस्तकांची मदत, विद्यार्थ्यांची शिक्षण संदेश व पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर करा असा संदेश देणारी रॅली महाविद्यालयात काढण्यात आली. अशा, वैविध्यपूर्ण उपक्रमांनी, विद्यार्थ्यांच्या कृती युक्त सहभागाने शिक्षण सप्ताह संपन्न झाला. या विविध उपक्रमांच्या आयोजनासाठी, म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांनी मार्गदर्शन केले.

### बेगम पेठ पोलिस चौकीत फौजदारास धक्काबुक्की प्रकरण;

## माजी नगरसेवक तौफिक हत्तुरेसह चौघांची मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**



सोलापूर शहरातील बेगम पेठ पोलीस चौकी मध्ये फौजदारास धक्काबुक्की करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी काँग्रेसचे माजी नगरसेवक तौफिक हत्तुरे सह चौघांची मुक्तता करण्याचे आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी दिले.

तौफिक बाबुमिया हत्तुरे, अजरुद्दीन इसाक हत्तुरे, मोहसीन गुलाबसाब मैंदर्गीकर, शरीफ मकबूल बागवान उर्फ कॅडो अशी सुटलेल्याची नावे आहेत. याबाबत पोलिस उपनिरीक्षक लिगाडे यांनी जेलरोड पोलिस ठाण्या फिर्याद दाखल केली होती.२२ ऑक्टोबर २०१८ रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास बेगम पेठ पोलीस चौकीत महिलेकडे विचारपूस व चौकशी करीत असताना त्या ठिकाणी काँग्रेसचे तत्कालीन नगरसेवक तौफिक हत्तुरे, अझरुद्दीन हत्तुरे, मोहसीन मैंदर्गीकर, शरीफ बागवान असे चौघेजण चौकीमध्ये आले. त्यावेळी तौफिक हत्तुरे पोलिस उपनिरीक्षक लिगाडे यांना ढकलून दिल्याने त्यांच्या उजव्या हाताच्या कोपऱ्यात, डाव्या पायाच्या घोट्याजवळ व छातीस मुक्कामार लागला होता. त्यामुळे तौफिक हत्तुरे व त्यांच्या ३ साथीदारांनी पोलीस चौकीमध्ये येऊन सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय लिगाडे यांनी जेलरोड पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची सुनावणी सत्र न्यायाधीश राणे यांच्यासमोर झाली. या खटल्यात एकूण ७ जणांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्षीदारांच्या जबाब मधील विसंगती तसेच सबळ पुरावा नसल्याचे आरोपींच्या वकिलांनी न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले. तसेच आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सत्र न्यायाधीश राणे यांनी हत्तुरे यांच्यासह चौघांची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले.या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे अॅड. दत्तूसिंग पवार यांनी तर आरोपीतर्फे अॅड रियाज शेख यांनी तर काम पाहिले.

## कवी पवार हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक भूषण : डॉ. येळेगावकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

कवी. रा. ना. पवारांनी कोंबडा, लेकीची लावणी, देव, आज भोंगा वाजत आहे, प्राक्तन अशा दर्जेदार काळजाला भिडणाऱ्या शेकडो कविता केल्या. त्या ढंगदार शैलीत सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळविली. कानाला आणि मनाला सुश्राव्य करणारी मधुर भावगीते, भक्तिगीते लिहिली. आणि ती नामवंत गायक, गायिकांनी गायली आहेत. त्यांच्या कविराय राम जोशी या नाटकांचे अडीचशेपेक्षा जास्त प्रयोग महाराष्ट्रभर झाले म्हणूनच स्वर्गीय कवी रा.ना.पवार हे म हाराष्ट्राचे सांस्कृतिक भूषण होते. त्यांनी सोलापूरचा नावलौकिक म



हाराष्ट्रभर वाढवला असे प्रतिपादन श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

स्वर्गीय कवी रा.ना.पवार यांच्या १०४व्या जयंती निमित्त त्यांच्या निवासस्थानी रा.ना. पवार मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ.येळेगावकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा.ना.यांचे चिरंजीव माधव पवार होते. याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, कवी गिरीश दुनाखे आणि उमेश जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. कवी रा.ना. च्या कवितेत गेयता सामाजिकता, नाट्यात्मकता, वास्तवता, होती म्हणून त्यांच्या कविता आणि गीते काळजाला भिडत होती. आजही त्यांची गाणी गायली जातात, म्हणूनच प्रतिभा संपन्न साहित्यिक त्यांच्या साहित्यकृती मुळे आजरामर असतात आणि नवोदित साहित्यिकांना प्रेरणा देत राहतील असेही डॉ. येळेगावकर यांनी आपल्या भाषणात सांगितले.




## संजीव कुसुरकर लिखित 'ज्ञानेश्वरी दृष्टांत रत्ने' पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. ३० जुलै -**

श्री संत साहित्य सेवा संघ, सोलापूरचे विश्वस्त संजीव कुसुरकर यांनी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरी दृष्टांत रत्ने' या पुस्तकाचे प्रकाशन इंदौर येथे करण्यात आले.

अखिल भारतीय त्रिपदी परिवार इंदोर शाखा आणि श्री सर्वोत्तम मराठी मासिक यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले होते. अखिल भारतीय त्रिपदी परिवाराचे प्रमुख डॉ. बाबामहाराज तराणेकर यांच्या अध्यक्षतेखाली पुस्तकाचे प्रकाशन झाले. याप्रसंगी व्यासपीठावर संत साहित्याचे अभ्यासक विलास देशपांडे-चारठाणकर, लिवा साहित्य सेवा समितीचे अरविंद जवळेकर, म झी माऊली मंडळाच्या राजश्री दुराफे, अश्विन खरे, लेखक संजीव कुसुरकर उपस्थित होते. जया गाडगे यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### शाह कन्या प्रशालेत वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा

**बार्शी, दि. ३० जुलै-**

शालेय शिक्षण सप्ताहाअंतर्गत वृक्षारोपण उपक्रम शाह कन्या प्रशालेत साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थिनी व माता यांच्या हस्ते कारंजा, सीताफळ, चिंच, लिंब, जांभूळ ही झाडे लावण्यात आली.वृक्षलागवडीचे फायदे याबद्दल संदेश घाडगे यांनी माहिती सांगितली. पर्यावरण संतुलन टिकण्यासाठी वृक्ष आवश्यक आहेत. त्यामुळे सर्वांनी वृक्षलागवड करावी, असे विचार मुख्याध्यापिका सौ. शुभदा जोशी यांनी मांडले. यावेळी पर्यावरणप्रेमी विद्यार्थिनींचे इको मंडळ स्थापन करण्यात आले. मंडळ स्थापन करण्यासाठी ज्योती अगरवाल, वैष्णवी हातोळकर, उज्वला स्वामी, अर्चना बुटे, अंजली कुलकर्णी, रेखा गुंड यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास गोकर्णा परंडकर, माधुरी उपळकर, शीतल शिंदे, आशा शिंदे, अनिता पवार, ज्योती बारंगुळे या पालक उपस्थित होत्या. तुकाराम सुपे यांनी आभार मानले.



### सांगोला रेल्वे स्टेशन हरीत क्रांतीमध्ये सिंह यांचे मोठे योगदान : शिंदे

**सांगोला, दि. ३० जुलै-**

सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने सांगोला रेल्वे स्टेशनचे अधीक्षक सत्येंद्र सिंह यांचा खात्यांतर्गत बदलीनिमित सत्कार करण्यात आला. सुरुवातीस रेल्वे स्टेशन येथे सत्येंद्र सिंह यांना संघटनेच्या वतीने अशोक कामटे यांची प्रतिमा, घड्याळ व आंब्याचे झाड मकरंद पाटील यांच्या हस्ते देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी नीलकंठ शिंदे यांनी अधीक्षक सत्येंद्र सिंह यांचे सांगोला रेल्वे स्टेशन हरित क्रांतीमध्ये मोठे योगदान असल्याचे सांगून स्टेशनमध्ये जे आमूलाग्र बदल केले त्याबद्दल कौतुक केले. सांगोलकर ही गोष्ट कदापीही विसरणार नसल्याचे मत व्यक्त केले. यावेळी संघटनेचे अनिल तरलाकर, बाळासाहेब टापरे, प्रकाश खडतरे, गांगाकुमार सिंह यांच्यासह स्टेशन मधील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



### प्रबुद्ध संस्थेच्या वतीने पीएसआय अभिजीत सावंत यांचा सत्कार

**नातेपुते, दि. ३० जुलै-**

प्रबुद्ध मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था नातेपुते यांच्या वतीने गिरवी (ता. माळशिरस) येथील अभिजीत भोसले यांची एमपीएससी परीक्षेअंतर्गत पीएसआयपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी मोहनानंद महाराज, संस्थेचे अध्यक्ष देठे, खजिनदार युवराज वाघमारे, सहसचिव प्रकाश साळवे, बंटी नलवडे, सुवर्णा नलवडे, ललिता वाघमारे, लक्ष्मी देठे, योजना निकाळजे, निनाद सोरटे, सुहास सोरटे, सोरटे आदी उपस्थित होते.



### नागनहळळी आश्रमशाळेत शिक्षण सप्ताहाचा समारोप

**अक्कलकोट, दि.३० जुलै-**

२२ ते २८ जुलै या कालावधीत शिक्षण सप्ताह साजरा करण्यात आला. त्यानुषंगाने समुदाय सहभाग अंतर्गत विद्याजंली व स्नेहभोजन उपक्रम साजरे करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. शरद फुटाणे म्हणाले, गुरु आई वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आयुष्यभर प्रामाणिकपणे कार्य करावे, असा उपदेश केला. व संस्थेची शालेय इमारत, प्रयोगशाळा व वसतिगृह विभाग यामधील गरीब व होतकरु विदयार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांबद्दल संस्थेविषयी गौरवदगार काढले. यावेळी संस्थेचे सचिव जावेद पटेल, माजी मुख्याध्यापक मोहन चव्हाण, पत्रकार मारुती बावडे, स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप व उद्योजक विक्रम फुटाणे, प्राचार्य मुजावर आय.एम., मुख्याध्यापक रईस अहमद शेख यांची उपस्थित होती. सूत्रसंचालन मोहन गुरव आभार शिवाजी चव्हाण यांनी मानले. शिक्षण सप्ताह अंतर्गत पहिल्या दिवशी अध्ययन अध्यापन साहित्य निर्मिती कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले. दुस-या दिवशी निपुण प्रतिज्ञा गणितीय परिपाठ व तज्ञांची माहिती विदयार्थ्यांना करुन देण्यात आली. तिस-या दिवशी क्रिडा दिवस साजरा करण्यात आला. चौथ्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला. पाचव्या दिवशी कौशल्य व डिजिटल, सहाव्या दिवशी इको क्लबची स्थापना, वृक्षारोपन व शालेय पोषाण आहार याविषयी माहिती देण्यात आली.

# जिल्ह्यात आता उसापाठोपाठ उडीद अन् सोयाबीनचे उत्पादन

## पोषक हवामान अन् पावसामुळे दोन लाख ६७ हजार हेक्टर क्षेत्रात उडीद व सोयाबीनचा पेरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जुलै-**

सोलापूर जिल्ह्यात मृग नक्षत्राच्या जोरदार पावसानंतर खरीप पिकांच्या पेरण्यांना वेग आला असून विशेषतः मृगाच्या शेवटी आणि आर्द्रा नक्षत्रात पावसाने ओढ दिल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वापसा तयार झाला. परिणामी, आजमितीला जिल्ह्यात खरिपाचा २७० टक्के पेरा झाला आहे. यात सोयाबीनचा पेरा एक लाख ३२ हजार ४४० हेक्टर तर उडिदाचा पेरा एक लाख ३४ हजार ४६३ हेक्टर क्षेत्रात गेला आहे. सोयाबीन आणि उडीद या दोन्ही पिकांची मिळून दोन लाख ६६ हजार ९०३ हेक्टर क्षेत्रात पेरणी झाली आहे.

वरदायिनी ठरलेल्या उजनी धरणामुळे साखरेचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापुरात आता उसापाठोपाठ उडीद आणि सोयाबीनचे उत्पादन होत आहे. रब्बी हंगामाचा म्हणून परिचित असलेल्या सोलापूर जिल्ह्यात खरीप पेरण्यांचे एकूण सरासरी क्षेत्र दोन लाख ८९ हजार ५७० हेक्टर असताना प्रत्यक्षात पावसामुळे निर्माण झालेल्या अनुकूल वातावरणात चार लाख ९२ हजार ८४५ हेक्टर क्षेत्रात पेरण्या झाल्या आहेत. यात उडीद व सोयाबीनसह मका, बाजरी, तूर, मूग, सूर्यफूल, भुईमूग आदी पिकांच्या पेरण्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. विशेषतः अलिकडे जिल्ह्यात बार्शीसह दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मोहोळ व अक्कलकोट भागात सोयाबीन पेरा वाढत आहे. सोयाबीन पेरणीचे सरासरी क्षेत्र ४७ हजार ०६७ हेक्टर



असताना प्रत्यक्षात एक लाख ३२ हजार ४४० हेक्टर (२८१.३९ टक्के) एवढ्या पेरण्या झाल्या आहेत. यात सर्वाधिक बार्शीत ८५ हजार ३४ हेक्टर क्षेत्रात (२१९.९९ टक्के) सोयाबीनचा पेरा झाला आहे. तर उत्तर सोलापुरात केवळ १३१६ हेक्टर सरासरी क्षेत्र असताना त्याच्या तेरा पटींनी जास्त म्हणजे १६ हजार ७५९ हेक्टर क्षेत्रात (१२७३ टक्के) पेरण्या झाल्या आहेत. मोहोळ-९३७३ हेक्टर (८४०.६३ टक्के), दक्षिण सोलापूर-६९९९.४ हेक्टर (४१९.०८ टक्के) आणि अक्कलकोट-१३ हजार ६१७ हेक्टर (३८० टक्के) याप्रमाणे सोयाबीनचा पेरा वाढला आहे. सुदैवाने या पिकांची उगवण होत असताना अजून तरी गोगलगाईंचा प्रादुर्भाव झाला नाही, असा दावा केला जात आहे. सोयाबीनपेक्षा जास्त म्हणजे उडीद डाळीची लागवड झाली असून ती एक लाख ३४ हजार ४६४ हेक्टर क्षेत्रात (२८९.३१ टक्के) आहे. करमाळ्यात सर्वाधिक ५५ हजार ८३७ हेक्टर (१०७१ टक्के) उडीद पेरणी झाली आहे. त्याखालोखाल अक्कलकोट (२७ हजार ६४२ हेक्टर, १४१ टक्के), माढा (२० हजार ५२१ हेक्टर, ४६५.५२ टक्के), दक्षिण सोलापूर (१४ हजार ३२२ हेक्टर, २६९ टक्के) आदी भागात लागवड केलेली उडीद बहरत आहे. एरव्ही, भुईमूग पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करण्याची परंपरा अलिकडे खंडित होत आहे. लागवड खर्चाच्या प्रमणात हाती येणारे उत्पन्न कमी असल्यामुळे यंदा ४८५९ हेक्टर सरासरी क्षेत्रापैकी केवळ २७५७ हेक्टर क्षेत्रात ( ५६.७५ टक्के) भुईमुगाची लागवड झाली आहे. सूर्यफुलाचीही जवळपास हीच तऱ्हा असून सध्या ६६३४ हेक्टर क्षेत्रापर्यंतच्या (७४ टक्के) मर्यादेत सूर्यफुलाचा पेरा झाला आहे.

गळीतधान्यांची पेरणी एक लाख ४१ हजार ८५४ हेक्टर (२२८.३६ टक्के) क्षेत्रात झाली आहे. तृणधान्यांमध्ये मक्याची लागवड ८३ हजार १२९ हेक्टर क्षेत्रात (२३५.१४ टक्के) झाली आहे. तर बाजरी (२४ हजार २०५ हेक्टर, ६१ टक्के), तूर (९५ हजार ७५३ हेक्टर, ११०.८६ टक्के), मूग (१२ हजार ८५४ हेक्टर, ७४.४५ टक्के) याप्रमाणे पेरण्या झाल्या आहेत. या पिकांच्या वाढीसाठी बेताने पडणारा पाऊस पोषक मानला जातो.

## बार्शीतील पत्रकारांना रेनकोटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जुलै-**

पत्रकारांसाठी पावसाळ्यातील रेनकोटची आवश्यकता ओळखून शहराध्यक्ष हर्षद लोहार यांच्या संकल्पनेतून उपक्रम राबविण्यात आला. संघटनेच्या कार्यालयात राज्याचे महासचिव गणेश शिंदे यांच्या हस्ते रेनकोटचे वाटप करण्यात आले.



व्हॉईस ऑफ मीडिया ही जगभरातील विविध ४३ देशात कार्यरत असलेली, देशतील सर्वात जास्त कार्यरत सदस्य असलेली संघटना असून विविध भाषा व प्रांतानुसार उपशाखा आहेत. प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, साप्ताहिक विंग, रेडिओ विंग, डिजिटल मीडिया विंग अशा वेगवेगळ्या माध्यमातील स्वतंत्र शाखा नियमित कार्यरत आहेत. पत्रकारांचे आरोग्य, पत्रकारांचे कौशल्य, पत्रकारांच्या मुलांचे शिक्षण, पत्रकारांचे निवास अशा मूलभूत गरजांची पूर्तता करणे तसेच इतरही प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी यशस्वी झालेली संघटना आहे. व्हॉईस ऑफ मीडिया बार्शी शहर शाखेच्यावतीने राज्यस्तरीय संमेलन, कार्यशाळा, पत्रकारांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी, पत्रकारांच्या मुलांसाठी शालेय साहित्य, करियर मार्गदर्शन असे विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यावेळी शहराध्यक्ष हर्षद लोहार, उपाध्यक्ष विजय शिंगाडे, सचिव जमीर कुरेशी, कार्याध्यक्ष मयूर थोरात, खजिनदार प्रविण पावले, मल्लिकार्जुन धारुरकर, प्रदीप माळी, शाम थोरात, उमेश काळे, श्रीशैल्य माळी, भूषण देवकर, समाधान चव्हाण, अपर्णा दळवी, विक्रांत पवार, संगीता पवार, आमीन गोरे, अमोल आजबे, संदीप आलाट, सुवर्णा शिवपुरे, नितीन भोसले, प्रभुलिंग स्वामी उपस्थित होते.

## नीरा देवधर प्रकल्पासाठी खासदार मोहिते-पाटील यांनी कंबर कसली

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० जुलै-**

निरादेवघर प्रकल्पाचा पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याबाबत जल संसाधन विकास मंत्री सी.आर.पाटील यांची खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भेट घेतली असून खासदार मोहिते-पाटील यांनी या प्रकल्पाबाबत कंबर कसली आहे.

निरा देवघर प्रकल्प २००७ साली पूर्ण झाला. मात्र अद्यापही या प्रकल्पाचे वितरण जाळे अपूर्ण राहिलेले आहे. परिणामी माढा लोकसभा मतदारसंघातील अवर्षण प्रवण क्षेत्र असलेल्या माळशिरस, फलटण तालुक्यातील अंदाजे २५००० हेक्टर क्षेत्राला अपेक्षित सिंचन लाभ मिळालेला नाही. तसेच आज आखेर पर्यंत पंतप्रधान कृषी सिंचन योजना व जलसंसाधन विकास मंत्रालयाकडून निधी




प्राप्त झालेला नाही.

निरा देवघर प्रकल्पाला पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत समावेश करून अपूर्ण कामांना पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा यासाठी खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय जलसंसाधन विकास मंत्री सी.आर. पाटील यांच्याकडे विनंती केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी दिले आहे.

## श्रावणमासनिमित्त गौडगांव मारुती मंदिरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० जुलै-**

तालुक्यातील गौडगाव बु.दक्षिण मुखी जागृत श्री मारुती मंदिरात श्रावण मासच्या उत्सवानिमित्त धर्मसंकिर्तन, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन केले असुन प्रत्येक शनिवार, मंगळवार, अमावस्या व पौर्णिमेला महाप्रसाद चालू असल्याची माहिती ट्रस्टीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे यांनी दिली.




तालुक्यातील गौडगांव बू. येथे हेमांडपंथीय रामदास स्वामी स्थापित श्री जागृत मारुती मंदिर दक्षिण मुखी असल्याने येथे विशेष ११ शनिवार आणि मंगळवार मारुतीचे दर्शन घेतल्यास मनातील इच्छा, आकांक्षा व शारीरिक पीडा दूर होतो. अशी दृढ श्रद्धा आहे.

गौडगांवच्या जागृत मारुती मंदिरात महिनाभर चालणाऱ्या श्रावणमासनिमित्त मंदीरात सायंकाळी ९ ते रात्री १ वाजेपर्यंत विविध धर्मिक, सामाजीक,भजन, किर्तन होणार असुन पहाटे ३ वाजेपासुन मारूतीस महारूद्राभिषेक, अभषेक, नवग्रह पुजा, शनिपूजा व होमहवन यज्ञचा कार्यक्रम होणार आहे. राज्य व परराज्यातून येणाऱ्या भावीक भक्तांना दर्शनाची सुलभ सोय व्हावी म्हणून योग्य ती खबरदारी मंदिर ट्रस्टी घेतला आहे. येणाऱ्या प्रत्येक भाविकांना मंदिर समितीकडून हानुमान चाळीसा देण्याची सोय केली आहे. मंगळवार व शनिवार दुपारी १२ वाजता विशेष महाआरतीचा कार्यक्रम पडणार असुन महाआरतीमध्ये रांगेत प्रथम उभे असलेल्या भक्तना मान मिळणार आहे.

नवसाला पावणाऱ्या देवस्थान असल्याने महाराष्ट्र, कर्नाटक, आध्रप्रदेश व देश भरातुन भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. याकरीता देवस्थान समिती कडून जय्यत तयारी केले आहेत. दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी गौडगांव अन्नछत्र मंडळात सकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत महाप्रसाद चालू राहणार आहे. तरी मारूती भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत खानापूरे यांनी केले आहे. अन्नदान कार्यात देणगी रूपाने अन्नछत्र सेवेत सढळ हाताने मदत करून मारुतीसेवेत सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिर समितीने केले आहे.

## जळभावी, गारवाड परिसराला पावसाची प्रतीक्षा

### तालुक्यात चार टँकर सुरुच; रिमझिम पावसाने पिके तग धरून

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.३० जुलै-**

राज्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती असताना तालुक्यातील काही गावात समाधान कारक पाऊस झाला असला तरी जळभावी, गारवाड, मगरवाडी, परिसरात अद्यापही समाधानकारक पाऊस झाला नसल्याने या ठिकाणचे नाले, ओढे वाहिले बसून, बंधारे, तलाव यामध्ये पाणीसाठा वाढला नाही तसेच विहिरीची पाणी पातळी वाढली नसल्याने या गावांना अद्यापही टंकरने पाणी पुरवठा केला जात असून या भागात पेरणी केलेली पिके रिमझिम पावसाने तग धरून असल्याचे चित्र असून शेतकरीवर्ग मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत असून पावसाचा कालावधी संपत आल्याने चिंताग्रस्त झाला आहे.

राज्यात सर्वत्र दमदार पाऊस सुरु असताना माळशिरस तालुक्यातील जळभावी, गारवाड, मगरवाडी, पठाणवस्ती, भागात अद्यापही पाऊसाने दडी मारल्याने या भागातील सर्वच पाण्याचे स्रोत अद्यापही कोरडेच असून या गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. या भागात जून महिन्यात काही प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी बाजरी, मका पिकाची पेर केली आहे. जुलै महिन्यात केवळ ५३ मि.मि. पाऊस झाला आहे.



**पाणी टँकर चालू ठेवणे आवश्यक**

जळभावी गावच्या सरपंच पुष्पा शिंदे, ग्रामसेवक, पी.बी. काळे, तलाठी अर्षद सय्यद यांच्या समवेत पाहणी केली असता या भागातील विहिरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली नसल्याचे दिसून आले तसेच या तलावात हि पाणी नसल्याने पाणी टंकर चालू ठेवणे आवशक आहे.

**-सुभाष रणदिवे, मंडळ अधिकारी (जळभावी)**

## अधिकाधिक क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी प्रयत्नशील

### आ. शहाजीबापू पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० जुलै-**

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेत सांगोला तालुक्यातील एखतपूर आणि शिवणे गावांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. या योजनेतून १४ गावांना लाभ होणार असून सिंचन प्रकल्पांतून तालुक्यातील अधिकाधिक क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही आ. शहाजीबापू पाटील यांनी दिली.

स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन प्रकल्पात नव्याने समावेश झालेल्या शिवणे व एखतपूर गावात ड्रोन सर्व्हेक्षणाचा शुभारंभ करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, माजी पं. स. सदस्य सुभाष इंगोले,



सरपंच दादासाहेब घाडगे, शंकर जाधव, विजय इंगोले, महादेव शिंदे, प्रवीण नवले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

आ. शहाजीबापू पाटील म्हणाले, गेल्या २५ वर्षांपासून बासनात गुंडाळलेली सांगोला उपसा सिंचन योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून या योजनेला नव्याने मंजुरी मिळवून घेत १२ वंचित गावातील ३९ हजार एकर क्षेत्राचा यामध्ये समावेश केला. तालुक्यासाठी वरदायिनी असलेल्या स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन प्रकल्पाला ८८३ कोटी ७८ लाख रुपयांच्या खर्चास मंत्रिमंडळाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पातून तालुक्यातील लक्ष्मीनगर, अचकदाणी, बागलवाडी, सोनलवाडी, अजनाळे, वाकी शिवणे, नरळेवाडी, य. मंगेवाडी, बंडगरवाडी, चिकमहूद, कटफळ, खवासपूर, जुनी लोटेवाडी, नवी लोटेवाडी व इटकी या गावांचा समावेश होता.

**एकही गाव वंचित राहणार नाही**

एकही गाव सिंचनापासून वंचित राहू नये यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून या योजनेत एखतपूर आणि शिवणे गावांचा नव्याने समावेश केला आहे. सांगोला विधानसभा मतदारसंघातील शेतीला हक्काचे पाणी मिळण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे आ. पाटील यांनी आवर्जून सांगितले.



## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या दक्षिण तालुका कार्याध्यक्षपदी गणेश मोरे

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि.३० जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हा अध्यक्ष बळीराम साठे, नागेश पवार, भास्कर खटके, मनोज साठे व छावाचे रतिकांत पाटील यांच्या उपस्थितीत दक्षिण तालुका कार्याध्यक्षपदी गणेश मोरे यांची निवड करण्यात आली.

यावेळी गणेश मोरे यांच्या सोबत बाबासाहेब आंबूळे, गोरख चव्हाण, रियाज शेख, टिपू मुल्ला, युवराज चव्हाण, आण्णा चव्हाण, मधुकर कांबळे, सोमा पाटील, दादा निकम, सुबान तांबोळी, चंद्रकांत पुजारी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

दक्षिण तालुक्यात प्रत्येक गावात राष्ट्रवादी शरद पवार पक्ष पोहोचवून पक्ष वाढवण्यासाठी कार्य करणार असल्याचे गणेश मोरे यांनी सांगितले.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दक्षिणमधून विधानसभेसाठी सुरेश हसापुरे यांचा काँग्रेसकडून उमेदवारी मागणीचा अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि.३० जुलै-**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून सोलापूर जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापूरे यांनी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मागणीचा अर्ज सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्याकडे काँग्रेस भवन सोलापूर येथे सादर केला. यावेळी लवंगीचे सरपंच संगमेश बगले, आरके फाउंडेशनचे अध्यक्ष मोतीलाल राठोड, कुरघोटचे माजी सरपंच बनसिद्ध बन्ने, तिरुपती परकीपंडला, होटगी स्टेशनचे माजी सरपंच सुभाष पाटोळे, आचेगाव सोसायटी चेअरमन



जयशंकर पाटील, गुंजेगावचे माजी सरपंच संतोष पवार, कंदलगाव सोसायटी चेअरमन शाम व्हनमाने, माळकवठेचे माजी सरपंच शिवलिंग बगले, सुधाकर जोकारे, केरू बंडगर, विश्वनाथ जोकारे, सागर उबाळे, सुभाष वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी प्रयत्न करणार : शिवतेजसिंह

**अकलूज, दि.३० जुलै-**

सत्तेचा उपयोग गावच्या विकासासाठी करताना अकलूजमध्ये कोणतीही गोष्ट करताना पुढील २५ ते ३० वर्षांचा विचार केला जातो, अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या विस्तारीकरणाबाबतही सर्वांना विश्वासात घेऊन विकास करण्यात येईल असे आश्वासन अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी दिले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अकलूज नगरपरिषद व मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत शिवतेजसिंह मोहिते पाटील बोलत होते. यावेळी माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील, मुख्याधिकारी दयानंद गोरे, पोलीस निरीक्षक भानुदास निंभोरे उपस्थित होते. यावेळी बोलताना किशोरसिंह माने-पाटील यांनी अकलूज गावचा सर्वधर्मसमभाव आबादित असून सामाजिक सलोखा राखणारे गाव म्हणून अकलूज कडे पाहिले जात असल्याचे सांगितले. आज वरच्या सर्व मिरवणुका शिस्तबद्ध व शांततेत पार पडल्याचा इतिहास असल्याचेही त्यांनी सांगितले. पोलीस निरीक्षक भानुदास निंभोरे यांनी कायद्याचे पालन करत जयंती उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव साजरा करण्यासाठी अकलूज नगरपरिषदेच्या वतीने शक्य होईल तेवढे सहकार्य करण्यात येईल असे सांगितले.



### संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर दुतर्फा वृक्षारोपण

**अकलूज, दि. ३० जुलै-**

नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया, जी.एच.व्ही.इंडिया लिमिटेड व शिवरत्न कन्स्ट्रक्शनच्यावतीने संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग अकलूज ते तोंडले या मार्गावर अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, प्रांताधिकारी विजया पांगारकर, प्रोजेक्ट डायरेक्टर केशव घोडके यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. एक पेड मां के नाम या अभियानांतर्गत संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या दुतर्फा बाजूस वृक्षारोपण करण्याची मोहीम सध्या सुरू असून माळशिरस तालुक्यातून जाणाऱ्या अकलूज ते तोंडले दरम्यान तब्बल ३५०० वृक्षांचे रोपण करण्याचा शुभारंभ आज करण्यात आला. यामधे वड, पिंपळ, चिंच, कडुनिंब, बांबू या रोपांचा समावेश आहे. तसेच महामर्गाच्या मधील दुभाजकावर बोगन वेल, पिकोमा, कॅलेंड्रीया, टॅफिया या शो च्या ३२०० झाडांच्या रोपनाचा शुभारंभ ही यावेळी करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद शाळा गट नंबर दोन मधील विद्यार्थी, शिक्षक व महाळुंग, तांबवे परिसरातील नागरिक, शिवरत्न कन्स्ट्रक्शन कंपनीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना, प्रोजेक्ट डायरेक्टर केशव घोडके म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकारी कर्मचारी, जी एच व्ही इंडिया कंपनी, शिवरत्न कन्स्ट्रक्शन कंपनी बरोबरच परिसरातील विद्यार्थ्यांबरोबरच नागरिकांनीही रोपण केलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्याबरोबरच त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी घेणे गरजेचे आहे. या वृक्षामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाणार आहे.



### गिरवी-गणेशगाव बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याची मागणी

**इंदापूर, दि.३० जुलै-**

नीरा नदीवरील गिरवी-गणेशगाव येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या भरावास पुराच्या पाण्याने शुक्रवारी (दि. २६) भागदाड पडले आहे. परिणामी, शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने या बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे. या बंधाऱ्याला भरावास पुराच्या पाण्याने भगदाड पडण्याची ही तिसरी वेळ आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होत आहे. निरेला आलेल्या पुराच्या पाण्याने गिरवी गावच्या बाजूला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे इंदापूर तालुक्यातील गिरवी गावातून माळशिरस तालुक्यातील गणेशगाव कडे होणारे दळणवळण बंद पडले आहे. जर या बंधाऱ्याच्या भगदाडाची तातडीने दुरुस्ती केली नाही, तर मात्र हा बंधारा पाण्याभोवी कोरडा राहिल्यास बंधाऱ्याच्या पाण्यावर अवलंबून असणारी इंदापूर व माळशिरस तालुक्यातील पिके धोक्यात येणार आहेत. त्यामुळे जलसंपदा विभागाने तातडीने बंधाऱ्याच्या भगदाडाची दुरुस्ती करावी, अशी सूचना हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

# २० कोटींच्या वडापूर बॅरेज प्रस्तावाला मान्यता

## ● आमदार सुभाष देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

वडापूर (ता. द. सोलापूर) येथे भीमा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधला आहे. या बंधाऱ्यातून व लोखंडी दरवाज्यातून मोठ्या प्रमाणात गळती होत आहे. पाण्याचा साठा होत नसल्याने शेतकरी वर्ग सिंचनापासून वंचित राहत आहे. या बंधार्याचे गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी बंधार्याच्या ठिकाणी बॅरेज बांधण्याबाबत शासनास विनंती केली होती. त्याला यश आले असून शासनाकडून २० कोटी १७ लाख किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

पाण्याचे नियमन व व्यवस्थापन व्यवस्थित होण्यासाठी भीमा नदीवर वडापूर येथे व सीना नदीवर वडकबाळ येथे बॅरेज बांधण्याच्या कामास शासनाने प्रायोगिक तत्वावर मान्यता दिली आहे. नदीच्या पुराचा अभ्यास करून मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिककडून पुराच्या विसर्गास मान्यता घेतली आहे.



सुरूवातीला बॅरेजचे स्थान अस्तित्वातील को.प. बंधार्याच्या वरील बाजूस निश्चित केले होते. त्याप्रमाणे कार्यस्थळावरील भुस्तर वर्गीकरणाची माहिती मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे सादर करण्यात आली. त्याप्रमाणे संकल्पनात बद्दल होवून सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत ७४ कोटी १० लाख इतकी झाली आहे. त्याची किंमत मूळ प्रमाण किंमतीपेक्षा १० टक्क्यांनी जास्त जादा असल्याने तांत्रिक उच्चस्तरीय समितीकडून त्यास मान्यता घेण्याबाबत शासनाच्या सूचना आहेत. त्यानुसार हा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे सादर करण्यात आला. या उच्चस्तरीय समितीच्या झालेल्या बैठकीत ७४ कोटी१० लाख रकमेच्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे. यात सुधारित मान्यतेत ५३ कोटी ९४ लाखांची वाढ झाली आहे. यास तांत्रिकदृष्या मान्यता मिळाली आहे. या बैठकीमध्ये वडापूर येथील पूर अभ्यासाबद्दल सविस्तर चर्चा होऊन बंधार्याच्या ठिकाणी ९३४४.५५ क्युसेक म्हणजेच ३.३ लक्ष क्युसेक पुरास मान्यता दिली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### शस्त्राने गंभीर दुखापत केल्याप्रकरणी आरोपीचा अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० जुलै-**

पांगरी पोलीस स्टेशनअंतर्गत आरोपी अंकुश रंगनाथ कदम यांचे विरुद्ध दाखल असलेल्या भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ३२६, ३२४, ५०४, ५०६ आणि ३४ अंतर्गत गुन्हा नोंद झाला होता. सदर आरोपीने ॲड. सहदेव गुंड यांच्यावतीने मे. अति जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज ठेवला. सदर जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपीचे वकील ॲड अनिकेत गुंड यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. आरोपीतर्फे ॲड. अनिकेत गुंड यांनी काम पाहिले.

### पिलीव येथे आनंद पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.३० जुलै-**

पिलीव येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी नुकतीच आनंद रामचंद्र पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार माजी उपसरपंच नारायण सुळे,शंकर शेंडगे,संतोषकुमार शेंडगे सर यांच्या हस्ते करणयात आला. यावेळी सचिन मदने, सागर शेंडगे, योगेश शेंडगे, सुदाम शिंदे, संजय पाटील, संतोष दुबे, लहु पाटील, पडळकर, दत्ता शेंडगेसह मान्यवरांच्या उपस्थितीत करणयात आला.

## सांगोल्यात महिला बचत गटांना कर्जाचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० जुलै-**

राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेच्या माध्यमातून सांगोला शहरातील महावीर व शिवसमर्थ या स्वयंसहायता महिला बचत गटांना महाराष्ट्र बँकेच्या माध्यामातून व्यवसाय वाढीसाठी अनुक्रमे ८ लाख व ५ लाखांचे कर्जाचे वितरण मुख्यधिकारी तथा प्रशासक डॉ.सुधीर गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापक नागेश गुंजोटे, सहा.प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे उपस्थित होते. तसेच धनादेश स्वीकारण्यासाठी महावीर व



शिवसमर्थ या दोन्ही बचत गटांच्या अध्यक्षा, सचिव व सर्व महिला सदस्य उपस्थित होते.

सांगोला नगरपरिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या योजनेंतर्गत महिला बचत गटांना अंतर्गत कर्ज व्यवहारासाठी नगरपरिषदेच्या वतीने दहा हजार इतका फिरता निधी अनुदान म्हणून दिला जातो. त्याचप्रमाणे ज्या बचत गटांना स्थापन होऊन सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेला असेल अशा बचत गटांना बँकेच्या सवलतीच्या व्याज दराने कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

> सांगोला नगरपरिषदेच्या राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानच्या माध्यातून बचत गटातील महिला बँकेकडून मिळणाऱ्या सवलतीच्या व्याजदरातील कर्जाच्या मदतीने स्वत:चा व्यवसाय सुरु करून आर्थिक दृष्ट्या सक्षम व आत्मनिर्भर होत आहेत.
>
> **- डॉ.सुधीर गवळी,**
> मुख्याधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद सांगोला

## थकीत अकरा कोटी रुपये यात्रा अनुदान देण्याची नगरपरिषदेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३० जुलै -**

आषाढी यात्रेत येणाऱ्या भाविकांना सोविसुविधा देण्यासाठी शासनाकडून नगर परिषदेला दरवर्षी यात्रा अनुदान दिले जाते. मात्र गेल्या वर्षीचे आणि यावर्षीचे असे दोन वर्षाच्या अनुदानातील एकुण ११ कोटी रुपये इतकी अनुदानाची रक्कम अजूनही शासनाकडे थकीत आहेत. याचा शहरातील विविध विकास कामांवर परिणाम होत आहे. अनेक विकास कामे ठप्प झालेली आहेत. त्यामुळे शासनाने अनुदानाचे थकीत ११ कोटी रुपये त्वरीत पालिकेकडे हस्तांतरीत करावेत अशी मागणी नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आली आहे

नुकतीच यावर्षीची आषाढी यात्रा संपन्न झाली असून यात्रेसाठी सुमारे बारा ते पंधरा लाख भाविकांची उपस्थिती होती. विक्रमी संख्येने भरलेल्या यावर्षीच्या आषाढी यात्रेच्या काळात नगरपालिकेने स्वच्छतेचे चांगले काम केले आहे.यावर्षी पहिल्यांदाच पालिकेच्या वतीने वाखरी ते पासष्ठ एकर पर्यंत विद्युतरोषणाई करण्यात आली होती. यात्रेच्या काळात शहराची सफाई तसेच अतिरिक्त पाणीपुरवठा तसेच आरोग्याच्या सोयीसुविधांसाठी पालिकेला कोट्यावधी रुपयांची तजबीज करावी लागते. दरम्यान गेल्या वर्षी शासनाने पंढरपूर नगर परिषदेला यात्रा अनुदान दिले होते. यातीत ६ कोटी रुपये अद्यापही थकीत आहेत. यंदाच्या वर्षी १० कोटी रुपये यात्रा अनुदान शासनाकडून मंजूर करण्यात आले आहे. यातील पाच कोटी रुपये आषाढी यात्रा कालावधीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले. मात्र उर्वरित पाच कोटी रुपये शासनाकडे अद्यापही थकीत आहेत.त्यामुळे गेल्या वर्षीचे सहा कोटी व यंदाच्या वर्षीचे पाच कोटी असे एकुण दोन वर्षाचे अकरा कोटी रुपये यात्रा अनुदान शासनाकडे थकीत आहेत. ती कामे 'उधारीवर' करण्यात आली असल्याने ठेकेदारांकडून नगर परिषदेकडे बिलाची मागणी केली जाऊ लागली आहे. मात्र शासनाकडून यात्रा अनुदान थकीत असल्याने नगरपरिषदेने ते अनुदान आल्यानंतर देण्यात येईल असे आश्वासन ठेकेदारमंडळींना दिले आहे. त्यामुळे ठेकेदारांना उत्तरे देताना पालिकेच्या आधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडत आहे.


## संत सावता महाराज वास्तुशिल्प व भक्त निवासाचे ४ ऑगस्टला भूमिपूजन

**उपमुख्यमंत्री फडणवीस व मंत्री भुजबळ यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.३० जुलै-**

माढा तालुक्यातील अरण येथे संत शिरोमणी सावता महाराजांचे वास्तुशिल्प आणि भक्तनिवास उभारले जात आहे. संत शिरोमणी सावता महाराजांच्या ४० फूट उंचीचे आणि २० टन पंचधातूचे शिल्प उभारणीच्या भूमिपूजनाचे रविवारी दुपारी १२.३० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थिती सोहळा संपन्न होत असल्याची माहिती संत शिरोमणी सावता महाराज भक्त परिवार आणि चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अरणमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या वास्तुशिल्पासाठी आणि भक्त निवासासाठी आतापर्यंत दीड कोटींचा निधी लोकवर्गणीतून संकलित झाला असून श्री क्षेत्र अरण येथे राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूला एक कोटी तीस लाखांची जमीन खरेदी केली आहे. सोहळ्यासाठी खासदार अमोल कोल्हे, मा. खासदार समीर भुजबळ, राज्य महिला



आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, विधान परिषद सदस्य योगेश टिळेकर, आमदार जयकुमार गोरे, मा. मंत्री राम शिंदे, आमदार देवयानी फरांदे, आमदार प्रज्ञा सातव, देवयानी फरांदे, पंकज भुजबळ, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांच्यासह केशव महाराज उखळीकर महामंडलेश्वर मनीषा नंद महाराज रखमाजी महाराज नवले भक्ती दास महाराज शिंदे उपस्थित राहणार आहेत. पत्रकार परिषदेस रविकांत वसेकर संत शिरोमणी सावता माळी यांचे वंशज रविकांत वसेकर महाराज, प्रभू माळी महाराज, विष्णू पेठकर, तानाजी माळी, आळंदीचे साखरचंद महाराज, तुळशीचे दिगंबर माळी, मोहोळचे शंकर वाघमारे, समता परिषदेचे आबासाहेब खारे, संदीप खारे, योगेश आल्हाट, डॉ.सोमनाथ बोराडे उपस्थित होते.

# भाजपा यंदा मताधिक्याच्या बळावर भाकरी फिरवणार का?

## ● इच्छुकांनी पक्ष श्रेष्ठींकडे लावली फिल्डिंग

**तभा वृत्तसेवा | बसवराज बिराजदार**
**अक्कलकोट, दि. ३० जुलै-**

लोकसभा निवडणुकीत माजी आमदार सिद्रामप्पा पाटील तडवळ व दक्षिण तालुक्यातील काही भागात भाजपाला लीड मिळवून दिली आहे. मात्र आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या चप्पळगाव जिल्हा परिषद मतदारसंघात काँग्रेसने अडीच हजारांपेक्षा जास्त मताधिक्य घेतल्याने भाजपसाठी डोकेदुखी वाढली आहे. या जोरावर अक्कलकोट राजकारणातील 'किंगमेकर' रमेश पाटील यांनी भाजपाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी जोरदार फिल्डींग लावले आहे. यामुळे भाजपा यंदा भाकरी फिरवणार का? या चर्चेला तालुक्यात उधाण आले आहे.

यंदा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची मजबूत दावेदारी आहे. तर माजी नगराध्यक्ष बसलींगप्पा खेडगी, जि. प. चे माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे यांच्यासह माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे पुत्र युवा नेता रमेश पाटील हे इच्छुक असून ग्रामीण भागातील भाजपा अंतर्गत सर्व जुने आणि नवे कार्यकर्ते रमेश पाटलांच्या नेतृत्वासाठी आशादायी आहेत. केवळ भाजपाच नव्हे तर राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना, आरपीआय सर्वच पक्षांतर्गत त्यांचे मैत्रीपूर्ण आणि सलोख्याचे संबंध आहेत. रस्त्याचा विविध विधायक कामे स्वखर्चातून करून देण्याचा सपाटा रमेश पाटील यांनी लावला आहे. यामुळे युवा नेता रमेश पाटील यांच्या भोवती आता



कार्यकर्त्यांचा गराडा पडत आहे. प्रतिस्पर्धाच्या गोटात जाऊन दरारा निर्माण करणारे धाडसी व्यक्तिमत्त्व ते ठरत आहेत.

दुष्काळी भागातील शेतकऱ्यासाठी कृष्णा-भीमा स्थिरीकरण ही योजना व्हावी म्हणून सन २०१२-१३ सालामध्ये कृष्णा-भीमा आणि भीमा-सीना स्थिरीकरण योजनेसाठी रमेश पाटील यांनी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातून १ लाख ३५ हजार शेतकऱ्यांच्या स्वाक्षरीचे निवेदन शासनाकडे सादर केले होते. सदर योजना शासनाने आत्ता मंजूर केले आहे. यामुळे अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील लाखो शेतकऱ्यांची जमीन ओलतिखाली येणार असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाले आहेत यामुळे रमेश पाटील यांच्या उमेदवारीबाबत जनता सध्या आश्वासक भूमिकेत आहे.

> **● अनेक वर्षाचा खराब रस्ता युवा नेता रमेश पाटील यांनी स्वखर्चाने केला पूर्ण**
>
> हन्नुर ते डोंबरजवळगे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी गेल्या दोन-तीन वर्षापासून शासनाकडे येथील शेतकरी मागणी करत होते. दोन-तीन वर्षांपासून हा रस्ता खराब झाला असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. या खड्ड्यांमुळे अनेकवेळा लहान मोठे अपघात झाले होते. हन्नुर भागातील शेतकरी हन्नुर ते डोंबरजवळगे हा खराब रस्ता करून देण्याची मागणी वारंवार करत होते. कोणीही याची दखल घेतली नव्हती. या मागणीची तात्काळ दखल घेऊन युवा नेते रमेश पाटील यांनी स्वखर्चातून या खराब रस्त्याचे काम करून दिल्याने या भागातील नागरिक, वाहन, शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

## 'सिंहगड'मधील दोन विद्यार्थ्यांची मेसंग सिस्टीम्स कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३० जुलै -**

एस.के. एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोर्टी (ता. पंढरपूर) येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात शिक्षण घेतलेल्या दोन विद्यार्थ्यांची मेसंग सिस्टीम्स प्रा. लिमिटेड कंपनीत निवड झाली असल्याची माहिती इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. अल्ताफ मुलाणी यांनी दिली.



सागर भुमकर



श्रेया बहादुले

सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात शिक्षण घेतलेले इसबावी (ता.पंढरपूर) येथील सागर संतोष भुमकर आणि पंढरपूर येथील श्रेया राजेश बहादुले यांची मेसंग सिस्टीम्स प्रा. लिमिटेड कंपनीत निवड झाली असुन कंपनीकडून वार्षिक ३ लाख पॅकेज मिळणार आहे. हि कंपनी इन्फ्रास्ट्रक्चर ऑटोमेशन, होम, ऑफिस, हॉटेल ऑटोमेशन, पॉवर डिस्ट्रिब्युशन आणि कंट्रोल, एनर्जी मॅनेजमेंट, टेस्ट आणि मेजरिंग, इलेक्ट्रॉनिक असेंब्ली, वर्कप्लेस एर्गोनॉमिक्स आणि क्लीनरूम एर्गोनॉमिक्स उत्पादनात कार्यरत आहे. मेसंग सिस्टीम्स प्रा. लिमिटेड कंपनीत निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उप-प्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर, डॉ. चेतन पिसे, डॉ.भालचंद्र गोडबोले, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ.संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. दिपक गानमोटे, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, प्रा. अभिजित सवासे, प्रा. वैभव गोडसे आदींनी अभिनंदन केले. या निवडीमुळे सागर भुमकर आणि श्रेया बहादुले यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बालेकिल्ला प्रतिष्ठान ढोल, ताशा पथक शुभारंभ सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जुलै -**

शहरातील कोकाटे गल्लीतील बालेकिल्ला प्रतिष्ठान ढोल ताशा पथकाचे पूजन शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कपिल शेख व भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर यांच्या हस्ते दि.२९ जुलै रोजी करण्यात आला.

यंदाचा गणेशोत्सव जवळ येत असून या उत्सवामध्ये युवक व युवतींना ढोल व ताशाचा सराव चांगल्या पद्धतीने करता यावा यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यावेळी बालेकिल्ला प्रतिष्ठान ढोल ताशा पथकाचे मार्गदर्शक मिलिंद कोकाटे, प्रमुख आकाश कोकाटे, अध्यक्ष विवेक मुंगळे, सचिव ओमकार राऊत, कोषाध्यक्ष प्रणव घोडके, मिरवणूक प्रमुख पवन मिसाळ, संतोष कोकाटे, बाळासाहेब गोरे, शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे अध्यक्ष गौरव बागल, सनी मुंडे, समर्थ कोकाटे, आशुतोष कोकाटे,



बाबा लोकरे, कृष्णा साळुंके, विशाल शेरकर, सुमित माने, आर्यन रणखांब, अभिजीत जाधव, प्रशांत कुदाळ, शुभम सुरवसे, अभय आंबेकर, अभिषेक मनसुके आदींसह सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### मनसेकडून तुळजापूर विधानसभेचा आढावा

**जळकोट, दि.३० जुलै -**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकतेच २२५ पैकी २५० विधानसभेच्या जागा लढविण्याची तयारी असल्याचे सांगितल्यानंतर महाराष्ट्रभर प्रत्येक विधानसभा क्षेत्राचा आढावा घेण्यासाठी पक्ष निरीक्षकांची नियुक्ती केली असून त्यानुसार मनसे सरचिटणीस नयन कदम, प्रवक्ते हेमंतकुमार कांबळे, सुदेश चूडनाईक, कुणाल माईणकर, घनश्याम परब, नरेश सावंत, अवधूत चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत तुळजापूर विधानसभा क्षेत्राची राजकीय परिस्थिती, स्थानिक नागरी प्रश्न, पक्षाने केलेले विविध आंदोलने याची माहिती घेतली. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रमुख पदाधिका-यांना सूचना दिल्या तसेच आढावा बैठक व केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे सुपूर्द करणार आहेत.



### पाथर्डी येथे शाळा व्यवस्थापन समितीमध्ये महिला राज

**कळंब, दि.३० जुलै -**

कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी येथे शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यासाठी मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांच्या अध्यक्षतेखाली पालक सभा आयोजित करण्यात आली होती. या पालक सभेत महिला राज बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदी अंजली जाधव, उपाध्यक्षपदी निलम धेले यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी कविता गायकवाड, वर्षा पिंगळे, राणी लांडगे, जयश्री शिंदे, रेवती पिंगळे, सर्व पालक सदस्य महिला आहेत. ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी अर्जुन धर्मराज जाधव, शिक्षणतज्ज्ञ बालाजी चिंचकर व संदीप लांडगे यांची निवड सर्वानुमते निवड करण्यात आली. सर्व कार्यकारिणीचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील निवडीसाठी बहुसंख्येने पालक उपस्थित होते.




### सिंदगाव शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी अवधूत बनजगोळे

**जळकोट, दि.३० जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील सिंदगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले. यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा घेऊन सदर समिती पुनर्गठीत करण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून अवधूत मधुकर बनजगोळे तर उपाध्यक्ष म्हणून स्नेहांकिता संजय बिराजदार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच समितीच्या सदस्यपदी प्रशांत बनजगोळे, शशिकांत बिराजदार, अपर्णा शिंदे, वैशाली कुलकर्णी, अशपाक शेख, पार्वती कवठे, नागनाथ सुरवसे, सागर पाटील व पूजा कांबळे यांची निवड करण्यात आली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून अनिता मुनाळे विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्रद्धा कुलकर्णी व श्रीकांत भोसले यांची निवड करण्यात आली. सचिव म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अनिलकुमार करदुरे यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचा शाळेच्या व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### माधवराव इंगळे यांचे निधन

**मुरूम, दि.३० जुलै -**



मुरूम येथील माधवराव श्याम राव इंगळे यांच रविवारी रात्री ९ च्या सुमारास निधन झाले. सोमवारी दि.२९ जुलै रोजी दुपारच्या सुमारास त्यांच्या पार्थिवावर मुरूम येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी व पाच मुले, सहा सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**आनंद बसवराज नरे**, या नावाची **टी.सी., १० वी व १२ वीचे गुणपत्रके** सोलापूर ते अणदूर, नळदुर्ग बस प्रवासादरम्यान हरवली आहेत. तरी कोणास सापडल्यास ती खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क : ९३०७३०८८३४**

# ठाकरे गटाकडून विधानसभा लढण्यास इच्छुकांची सर्वाधिक पसंती

## उमरगा-लोहाऱ्यामध्ये इच्छुकांची तयारी सुरू; कोणाची वर्णी लागणार याकडे तालुकावासियांचे लक्ष....

**तभा वृत्तसेवा / आकाश पोतदार**
**उमरगा, दि.३० जुलै -**

धाराशिव लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये उत्साह संचारला आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुकांची गर्दी वाढत आहे. धाराशिव जिल्यातील उमरगा मतदारसंघात सर्वाधिक इच्छुक आहेत. त्यांनी महाविकास आघाडीकडे अर्ज प्रक्रिया व मुलाखत येण्यात आले होते. यावेळी इच्छुकांची अर्ज व मुलाखती देवू केले आहेत. खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील हे या इच्छुकांपैकी कोणाला पसंती देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

धाराशिव लोकसभा निवडणुकीत उमरगा मधून उद्धव ठाकरे गटाला ४५



हजारांचे मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे येथून इच्छुक असलेल्या उमेदवारांचे विश्वास वाढला आहे. सध्या उमरगा विधानसभा साठी शिवसेना ठाकरे गटाकडून प्रा.डॉ. संजय कांबळे, सातलिंग स्वामी, तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून दिग्विजय शिंदे तर भाजपकडून रुद्रा स्वामी यांच्यासह अनेकजण इच्छुक आहेत.

प्रत्येकजण उमेदवारी आपलाच मिळणार असा दावा करत प्रचार व गाव भेटायला जोरदार सुरुवात केले असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे वरिष्ठांचे आशिर्वाद आपल्यालाच मिळेल, असे सर्वांना वाटत आहे. सध्या ठाकरे गटाकडून प्रत्येक मतदारसंघातून इच्छुकांची नावे घेतली जात आहेत.

यासाठी इच्छुकांना महाविकास आघाडीकडे उमरगा मतदारसंघासाठी इच्छुक उमेदवारी अर्ज मुलाखती देताना दिसून येत आहेत. काही दिवसांनी आणखी चार ते पाच जण इच्छुक यादीत दिसून येतील का असे चित्र दिसून येत आहे.

सध्यास्थितिला उमरगा मतदारसंघात उमेदवारी मिळविण्यामध्ये प्रा. संजय कांबळे यांचे पारड जड मानले जात आहे. प्रा. संजय कांबळे शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात चांगले काम केले आहेत आणि मुळचे तुगाव गावांचे असल्यामुळे त्यांना मतदारसंघाची खडानखडा माहिती त्यांना आहे.

तर सामाजिक कार्यातून दोन वर्षांपासून सातलिंग स्वामी हे उमरग्यामध्ये तयारी करत आहेत. शहर आणि तालुक्यात भागात स्वामी यांचे चांगले क ा य



सुरू आहे. याशिवाय इच्छुक उम दवारांचे वरिष्ठ पातळीवर चांगले संबंध आसल्याने ते ही उमेदवारीचे प्रमुख दावेदार आहेत का?

तरुण चेहरा म्हणून सध्या रुद्रा स्वामी यांच्याकडे पाहिले जात आहे. रुद्रा स्वामी यांनी गेल्या एक वर्षापासून तयारी सुरू केली आहे. सर्व पक्षांतील नेते व पदाधिकारी यांच्या भेट घेऊन चर्चा सुरू केली आहे तर दुसरीकडे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न येरणीवर आणून ते सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे बोलले जात आहे. रुद्रा स्वामी हे निवडून लढवणार हे निश्चित मानली जात आहे.

या मतदारसंघात उमेदवारीसाठी इतर नेत्यांनीही मागणी केली आहे. त्यातील शेवटच्या टप्प्यापर्यंत कोण शर्यतीत राहणार हे आता सांगणे कठीण आहे.

इच्छुक पक्षावर दबाव टाकून काहीतरी पदरात पाडून घेण्यासाठी उमेदवारी मागत असल्याची चर्चा आतापासूनच सुरू झाली आहे.

## जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसा-निमित्त जिल्ह्यात कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जुलै -**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांचा वाढदिवस एक ऑगस्ट रोजी असून त्यानिमित्त धाराशिव जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



१ ऑगस्ट रोजी महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री आई तुळजाभवानी देवीजींना महाआरती व अभिषेक ठीक ८ वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक धाराशिव येथे जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण सकाळी १० वाजता हजरत ख्वाजा शमशुद्दीन गाजी रहे दर्गाह येथे चादर चढवणे, सकाळी १०:३० वाजता विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, ११:३० वाजता वृक्ष वाटप वृक्षारोपण, १२:३० वाजता श्री रामलिंग देवस्थान येडशी महाअभिषेक, १:०० वाजता खेड (ता. धाराशिव) येथे भव्य रक्तदान शिबिर सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

तरी जास्तीत जास्त सकल मराठा समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## स्मशानाभूमीला जागा देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३० जुलै -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे स्मशानभूमीला जागा देण्याची मागणी नागरिकांनी ग्रामपंचायतकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तेर येथील श्री संत गोरोबा काका मंदिराजवळील सद्यस्थितीत स्मशानभूमी ही नदीमध्ये आहे. अंत्यविधी करताना प्रेत घेऊन जाण्यासाठी, लोकांना बसण्यासाठी, उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. तसेच नदिला पूर आला असता अंत्यविधीसाठी अडचण येत आहे. त्याचप्रमाणे सद्यस्थितीतील स्मशानभूमीचे बांधकाम हे जीर्ण झालेले आहे. तेर मधील जवळपास सर्वच हिंदू समाजातील ९० टक्के अंत्यविधी हे याच स्मशानाभूमीत होतात म्हणून विनंती की, श्री संत गोरोबा काका नगर प्लॉटीग मधील चार किंवा पाच गुंठे मोकळी जागा नविन स्मशानभूमी बांधकामासाठी, सुशोभीकरणासाठी सोडावी किंवा द्यावी, अशी मागणी नागरिकांनी ग्रा.पं.कडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनावर सचिन देवकते, तानाजी पिंपळे, रतन नाईकवाडी, राजकुमार थोडसरे यांच्या सह्या आहेत.

### देवस्थान व इनाम जमिनी लवकरच वर्ग-१ होणार...

## नजराणा ५० टक्क्यांवरून ५ टक्के करण्यास तत्वतः मान्यता : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० जुलै -**

मराठवाडा आणि विशेषतः धाराशिव जिल्ह्यातील वर्ग-२ जमिनीचा जटील बनलेला प्रश्न आता निकाली निघण्याच्या टप्प्यात आला असून रेडीरेकनर दराच्या ५ टक्के नजराणा दंड म्हणून भरून मदतमाश देवस्थान वर्ग-२ जमीनी वर्ग-१ होणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह आज झालेल्या बैठकीत यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे. लवकरच मंत्री मंडळाच्या मान्यतेने याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला जाईल. त्यामुळे देवस्थान व इनाम वर्ग -२ जमिनीचा प्रश्न कायमचा निकाली निघणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मराठवाड्यातील एका महत्वपूर्ण विषयाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी न्याय दिला असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी हा विषय अत्यंत महत्वाचा होता. मराठवाड्यातील ज्या इनामी आणि देवस्थान जमिनी आहेत, त्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा सुरू होता. नाममात्र नजराणा भरून



या जमिनी वर्ग -१ मध्ये परावर्तित करण्याची मागणी सातत्याने लावून धरली होती. याबाबत बऱ्याचदा बैठका झाल्या.

राज्य सरकारने यापूर्वी गठित केलेल्या समितीचा अहवाल संयुक्तिक नसल्याने प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेवून नवीन पाठक समिती गठीत करण्यात आली. या समितीने मराठवाड्यातील वर्ग-२ जमिनीच्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण अहवाल मागील आठवड्यातच राज्य सरकारकडे सादर केला होता. त्याअनुषंगाने मंगळवारी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत वर्ग-२ करण्यात आलेल्या मदतमाश जमिनींचा नजराणा रेडीरेकनर दराच्या ५० टक्क्यांवरून ५ टक्के करण्यास तत्वतः मंजूरी देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे खिदमतमाश जमिनीच्या हस्तांतरणास मंजूरी देण्याचा निर्णय देखील या बैठकीत घेण्यात आलेला आहे. मराठवाड्यातील खिदमतमाश इनाम जमिनीचे हस्तांतरणासाठी रेडीरेकनर दराच्या १०० टक्के दराने नजराणा आकारण्यात येवून हस्तांतरण नियमित करण्यात येणार असून यातील ४० टक्के रक्कम देवस्थानच्या कायम स्वरूपी देखभाली करिता, २० टक्के रक्कम देवस्थानच्या अर्चकासाठी तर उर्वरित ४० टक्के रक्कम शासनाकडे जमा करण्यात येणार आहे. या दोन्ही निर्णयामुळे धाराशिव सह मराठवाड्यातील सामान्य नागरिकांचा सुमारे ६० वर्षा पासूनचा प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी बैठकीत विशेष आभार व्यक्त केले. धाराशिव जिल्हा आणि खास करून धाराशिव शहरासाठी हा निर्णय खूप महत्वाचा ठरणार आहे.

सदरील बैठकीस खासदार अशोक चव्हाण, माजी विधान परिषद सदस्य सुरेश धस (व्हि. सी.द्वारे), महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, विधी व न्याय विभागाचे सचिव स.ब. वाघोले, छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## चांगल्या विचारातून माणूसकी दर्शन घडते : योगेश आसलकर



**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.३० जुलै -**

चांगल्याच्या संगतीत राहिल्यास चांगलेच गुण अंगी जडतात. प्रत्येकाने चांगलीच संगत धरावी असे आवाहन अध्यात्मिक व धार्मिक विचारसरणीचे योगेश ज्ञानेश्वर आसलकर यांनी नव उदयोजकांच्या सत्कार प्रसंगी बोलताना केले.

भूम येथील कै. विलास शंकरराव रोकडे फाउंडेशनच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून भूम व पुणे येथे व्यसनमुक्ती केंद्र नवनाथ रोकडे यांच्या पुढाकारातून चालवल जात आहेत. या व्यसनमुक्ती केंद्राच्या माध्यमातून तीन वर्षाच्या कालावधीत जवळपास ७०० व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्त केले आहे.

याच व्यसनमुक्तीच्या माध्यमातून अनेकांना व्यवसाय, उद्योग, रोजगारही मिळवून दिला आहे. या निमित्ताने नवनाथ विलास रोकडे यांना महाराष्ट्राचा अभिमान-नव उद्योजकांचा सन्मान पुणे यांच्याकडून महाराष्ट्र उद्योजक पुरस्कार २०२४ व पुरस्कार महाराष्ट्राचा-गौरव कर्तृत्वाचा-महा उदयोजक रत्नदिप उद्योजक पुरस्कार २०२४ अशा दोन पुरस्काराने पुणे येथे सन्मानित केल्याच्या निमित्ताने त्यांचा मंगळवार दि.२९ रोजी भूम एमआयडीसी येथे त्यांच्या मित्र परिवारांच्या वतीने सन्मान करून शुभेच्छा दिल्या आहेत.

गेल्या तीन वर्षापासून भूम येथील एमआयडीसीमध्ये सुसज्ज अशा इमारतीमध्ये कै. विलास शंकरराव रोकडे फाउंडेशनच्या माध्यमातून व्यसनमुक्ती केंद्र चालू आहे. याच फाउंडेशनच्या माध्यमातून पुणे येथील येथे देखील व्यसनमुक्ती केंद्र चालू आहे. या दोन्ही व्यसनमुक्ती केंद्रच्या माध्यमातून तीन वर्षाच्या कालावधीत जवळपास सातशे व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्त करण्याचे महत्त्वाचे काम नवनाथ रोकडे यांच्या माध्यमातून झाले आहे.

या व्यसनमुक्ती केंद्रात दाखल केलेल्या व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्त करण्यासाठी साधारणपणे तीन महिने कालावधीपर्यंत ठेवले जाते. या कालावधीत त्यांना जेवनाची, निवासाची, आरोग्याची व मनोरंजनाची व्यवस्था देखील केलेली आहे.

त्यांना योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी समुपदेशक कमलेश डंबरे नागपूरकर तसेच अक्षय घेमूड अहमदनगर व नवनाथ रोकडे हे परिश्रम घेत आहे.

व्यसन मुक्ती केंद्रातील व्यक्तींना नियमित सकाळी योगाचे धडे दिले जातात. नाश्ता दिला जातोय जेवण चहा पाणी वेळेवर दिले जातात. याशिवाय अध्यात्मिकतेचे धडे देखील दिले जातात. यासाठी प्रवचनकार कीर्तनकार या ठिकाणी आवर्जून प्रबोधन करण्यासाठी येतात. योग गुरू संजीवन सातपुते हे देखील आवर्जून येतात. या व्यसनमुक्त केंद्रामध्ये आज पर्यंत नागपूर, पूणे, सातारा, सांगली, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, बिदर, बीड, धाराशिव जिल्ह्यातून व्यसनाधीन व्यक्तींना सहभागी झाल्याचे दिसून आले आहे.

यावेळी अध्यात्मिक व धार्मिक विचाराचे योगेश आसलकर, विठ्ठल बागडे, पत्रकार शंकर खामकर, प्रशिक्षक कमलेश डंबरे नागपूरकर समुपदेशक, नवनाथ वरवडे, अक्षय घेमूड-नगरकर, राहूल होगाडे, बालाजी माने यांचेसह आनेकांची उपस्थिती होती.

### नित्यानंद खद्दे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**आलुर, दि.३० जुलै -**



आलुर येथील ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक तथा ज्येष्ठ नागरिक शंकर व्हट्टे गुरुजी यांचे जावई शांत संयमी व्यक्तीमत्व शिक्षक नित्यानंद खद्दे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

### छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**कु. रुपाली लक्ष्मण केदारे**, या नावाची **१२ वी पासची टि.सी.** भूम ते धाराशिव प्रवासादरम्यान हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क : ९८३४८६२६१९**

# मंदिरात चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, ३० जुलै -**

हिमायतनगर शहरातील लकडोबा चौक येथील मंदिरातून लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर चोरी करणार्या आरोपीला हिमायतनगर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून साहित्य जप्त करण्यात आले आहे.

हिमायतनगर शहरातील लकडोबा चौक येथील हनुमान मंदिरातून दि.२८ जुलै रोजी अज्ञात चोरट्याने लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर चोरी केले होते. या प्रकरणी तुकाराम मेरगेवाड यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलिसाला मिळालेल्या गुप्त माहितीवरुन पोलिसांनी गणेश यादव भालेराव रा.बोरगाव रोड भोकर यास ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता हनुमान मंदिरातील लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर चोरी केल्याचे त्याने कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ४० हजार रुपये किंमतीचे लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर जप्त केले. हि कारवाई पोलीस निरीक्षक अमोल भगत, महिला सहायक पोलीस उपनिरीक्षक कोमल कागणे, पोहेका. श्याम नागरगोजे यांनी केली.



# आ. शिंदे यांच्या प्रयत्नामुळे विष्णुपुरी प्रकल्पातील १२ पंप, उद्धरण नलिकेसाठी १६० कोटी ६४ लाखाच्या निधीस मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ३० जुलै -**

कै.शंकरराव चव्हाण विष्णुपुरी सिंचन प्रकल्पातील १२ विद्युत पंप व उद्धरण नलिकाची अत्यंत बिकट अवस्था झाल्याने लोहा व कंधार तालुक्यातील हजारो शेतकरी सिंचनापासून वंचित राहत होते, याबाबत लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. श्यामसुंदर शिंदे यांनी मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी माडुन कामाला मंजुरी मिळवून घेतली.

लोहा तालुक्यातील १५ हजार ९२७ हेक्टर व कंधार तालुक्यातील २१०० हेक्टर शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळवून देण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे आवाज उठवला होता



कै. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाचे १२ विद्युत पंप व उद्धरण नलिका तात्काळ बदलून नवीन विद्युत पंप व उद्धरणनलिका बसविण्याची मागणी केली होती त्या दुरुस्तीसाठी १२५ कोटीचा निधी तात्काळ मंजूर केला.

जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासनाच्या २९ जुलै २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे विष्णुपुरी प्रकल्पातील १२ विद्युत पंप व उद्धरण नलिकेसाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत १६० कोटी ६४ लाख ५७ हजार २२३ रुपये निधी कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे सांगीतले.

## संक्षिप्त वृत्त



### छ.शंभूराजे इंग्लिश स्कूलमध्ये घेण्यात आलेल्या रंग भरण

**कंधार** - दिवंगत डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांच्या१०३ व्या जयंतीनिमित्त मातोश्री मुक्ताई धोंडगे प्रतिष्ठाण कंधारचे सचिव तथा श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.भाई पुरुषोत्तम धोंडगे आणि मातोश्री मुक्ताई धोंडगे प्रतिष्ठाण कंधारच्या अध्यक्षा प्रा.डॉ.मनिषाताई पुरुषोत्तम धोंडगे यांच्या संकल्पनेतून ज्ञानाचा सागर क्रांतिचा जागर या सदराखाली दि.२६ जूलै रोजी घेण्यात आलेल्या लहान गटातील इयत्ता १ ली ते ४ थी रंग भरण स्पर्धा व मोठ्या गटातील इयत्ता ५ वी ते ८ वी स्पर्धेत ५००० विद्यार्थी सहभागी झाले होते.सहभागी विद्यार्थ्यांना पॅड व पाणी बॉटल देण्यात आले. २६ जूलै रोजी शहरासह तालुक्यातील पाच हजार विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. दि.२९ जूलै रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती इंग्लिश स्कूल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवराव पेठकर तर प्रमुख अतिथी म्हणून विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज धर्मापुरीकर उपस्थित होते. मोठ्या गटातील प्रथम कु.प्राची वाळके छ.शंभुराजे इंग्लिश स्कूल,वर्ग ६ वी छ.शंभूराजे इंग्लिश मीडियम स्कूल कंधार व्दितीय-तेजस मधुकर राठोड ५ वी ग्रो अँड ग्रो स्कूल कंधार तृतीय-माधवेंद्र बनसोडे मनोविकास विद्यालय ८ व उत्तेजनपर ऋषीकेश देविदास, छोट्या गटातील रंग भरण स्पर्धा परक्षेत प्रथम- कु.माहिरा बाबा शेख जि.प. प्रा.शाळा फुलवळ,व्दितीय क्रमांक कु.निधी नितिन टेकाळे मनोविकास प्राथमिक शाळा कंधार वर्ग दुसरा, तृतीय- कु.मानसी राजेश्वर उमाटे ४ थी ग्रो अँड ग्लो शाळा कंधार यांनी तर उत्तेजनपर कु.मैथिली मारोती हराळे वर्ग ४ था जि.प.बाचोटी कु.श्रावणी नारायण श्रीपतवार प्रियदर्शनी प्रा.शाळा कंधार कु.अलिशान जावेद शेख, कु.श्रेया दत्ता येवते छ.शंभूराजे इंग्लिश स्कूल कंधार कु.नंदिनी श्रीकांत कागणे ग्रो अँड ग्रो स्कूल कंधार या चिमुकल्यांनी यश संपादन केले.गुणवंत विद्यार्थ्यांचा छ.शंभूराजे इंग्लिश मीडियम स्कूल कंधारच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.यावेळी प्रा.सुभाषराव मुत्तेपवार,प्रा.संर्यकांत जोंधळे इंग्लिश स्कूलचे कर्मचारी,विद्यार्थी पालक उपस्थित होते.सुत्रसंचलन चव्हाण यांनी केले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### उद्यापासून महसूल सप्ताहास प्रारंभ

**नांदेड** - प्रशासनाचा कणा असणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्याचे नियोजन केले आहे. शासनाच्या पथदर्शी व अभिनव योजनांचा प्रचार, प्रसार व अंमलबजावणी ही या सप्ताहाची वैशिष्ट्ये असणार आहे. महसूल सप्ताहामध्ये प्रत्येक दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तालुकास्तरावर समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये एक ऑगस्टला शुभारंभ सप्ताह कार्यक्रमांमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, दोन ऑगस्टला मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, तीन ऑगस्टला मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगस्टला स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, पाच ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्ट ला एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, तर सात ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल सप्ताह सांगता समारंभ घेण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त शासन व सामान्य नागरिक यांना जोडणाऱ्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन या सप्ताहामध्ये करण्यात येणार आहे. यासंदर्भात नुकतीच एक बैठक निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली. यामध्ये महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी या सप्ताहात हिरीहिरीने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले.

### टपाल कार्यालयामध्ये राखीसाठी विशेष लिफाफ्यांची विक्री

**नांदेड** - राखी हा सण भारतीय संस्कृतीत महत्वाचा उत्सव आहे. ज्यात भावनिक आसक्ती आहे. यावर्षी रक्षाबंधन हा सण १९ ऑगस्ट २०२४ रोजी साजरा होणार आहे. यानिमित्ताने टपाल विभागातर्फे नागरिकांसाठी अनेक सेवा पुरविल्या जात आहेत. यावर्षी रक्षाबंधनासाठी टपाल विभागाने विशेष राखी लिफाफे तयार केले आहेत. या राखी लिफाफ्यांची किंमत १२ रुपये प्रति लिफाफा अशी किफायतशीर आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील टपाल कार्यालयांमध्ये राखी लिफाफ्यांची विक्री आधीच सुरु झाली आहे. तरी इच्छुक नागरिकांनी रक्षाबंधनासाठी मुख्य टपाल कार्यालयातून राखी लिफाफे खरेदी करावेत, असे आवाहन अधीक्षक डाकघर यांनी केले आहे. नांदेड टपाल विभागाने उच्च दर्जाच्या राखी लिफाफ्यांच्या विक्रीसाठी नांदेड टपाल कार्यालयांमध्ये विशेष व्यवस्था केली आहे. हे लिफाफे वजनाला हलके वॉटर प्रुफ न फाटणारे मजबुत आणि उत्कृष्ट मुद्रण केलेले आहेत. या लिफाफ्यांसाठी वापरण्यात आलेला कागद वैशिष्ट्यपूर्ण असून हे लिफाफे पाण्याने खराब होणार नाहीत. तसेच ते फाटणार नाहीत हे राखी विशेष लिफाफे ११ ् २२ से.मी. मापाचे असून सहज सील करण्यासाठी पील ऑफ स्ट्रिप सील यंत्रणेचा वापर केलेले हे लिफाफे आकर्षक डिझाइनमध्ये उपलब्ध आहेत.

### भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर भरावेत : शिवानंद मिनगिर

**नांदेड** - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना राबविण्यात येते. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता तसेच राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासनमान्य अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानीत महाविद्यालयातील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे नवीन व नूतनीकरण अर्ज महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाइन भरणे सुरु झाले आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम दोन दिवस

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम-२०२४ मध्ये शेतकऱ्यांना ऑनलाइन विमा अर्ज भरण्यास शेवटचे दोन दिवस उरले असून या योजनेत ज्यांनी विमा काढला नसेल त्या शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

या योजनेत सहभागी होण्याकरिता केवळ १ रुपया भरुन झचत्रक्षध पोर्टल http://pmfby.gov.in वर स्वत: शेतकऱ्यांना तसेच बँक विमा कंपनीचे नियुक्त केलेले एजंट, क्रॉप इन्शुरन्स प व सामुहिक सेवा केंद्रांमार्फत योजनेत सहभाग नोंदविता येणार आहे.

या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२४ करिता ऑनलाइन स्वरूपात विमा अर्ज भरण्याची सुविधा १६ जून २०२४ पासून सुरू झाली असून सहभागाची अंतिम मुदत १५ जुलै २०२४ अशी निश्चित करण्यात आली होती. योजनेत सहभागासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने खरीप हंगाम ऑनलाईन विमा भरण्यास ३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. जिल्ह्यातील जनतेने पुढील दोन दिवसात विमा भरण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# लोकमान्य टिळक हे भारत स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी नेते : मिसलवाड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य हे सहजासहजी मिळालेले नसून, भारत देश स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीर, समाजसुधारक, क्रांतीकारक हे शेवटच्या श्वासापर्यंत योगदान दिले असून त्यातीलच एक थोर स्वातंत्र्य सेनानी म्हणजे लोकमान्य केशव बाळ गंगाधर टिळक हे भारत देशाचे अग्रणी नेते होते, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले.

# प्रा. उत्तमकुमार कांबळे यांचा कॉँग्रेस पक्षामध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ३० जुलै -**

प्रा. उत्तमकुमार कांबळे यांनी नांदेड येथील विश्रामगृहात खा. वसंतराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष हाणमंतराव पाटील बेटबोगरेकर, आमदार मोहन हंबर्डे, कॉँग्रेस महानगर अध्यक्ष अब्दुल सत्तार आणि देगलूरचे माजी नगराध्यक्ष तथा कॉँग्रेसचे देगलूर शहराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांच्या उपस्थिती भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आहे.

देगलूर महाविद्यालय देगलूरचे उपप्राचार्य उत्तमकुमार कांबळे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय कार्यात महत्वाचे योगदान दिले आहे. विद्यार्थीदशेपासून प्रा. उत्तमकुमार कांबळे सामाजिक चळवळीत हिरीरीने सहभाग घेतला आहे. व्यापक दृष्टिकोन आणि सामाजिक जाणिव असलेले प्रा. कांबळे काल नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत कॉँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. प्रा. उत्तमकुमार कांबळे यांनी देगलूर - बिलोली मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढविण्यासंदर्भात इच्छुक उमेदवाराचे अर्ज कॉँग्रेस पक्षाकडे सादर केले आहे. त्यामुळे कॉँग्रेस पक्षाला एक उमेदवार म्हणून चांगला आणि विद्यार्थ्यांचा आणि जनसामान्यांचा जनाधार असलेला पर्याय मिळाला आहे. यावेळी खासदार वसंतराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष हाणमंतराव पाटील बेटबोगरेकर आणि देगलूरचे माजी नगराध्यक्ष तथा कॉँग्रेसचे देगलूर शहराध्यक्ष



मोगलाजी शिरशेटवार यांनी पुढील कार्यासाठी प्रा. उत्तमकुमार कांबळे यांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्रा. उत्तमकुमार कांबळे यांच्या कॉँग्रेस प्रवेशामुळे राजकीय गणिते बदलण्याची दाट शक्यता आहे.

याप्रसंगी कॉँग्रेस कार्याध्यक्ष महेश देशमुख, साहेब, विठ्ठल पावडे, प्रफुल्ल सावंत, कुमार कुर्तडीकर, डॉ. गंगाधर सोनकांबळे, मुन्ना अब्बास, डॉ. करुणा जमदाडे, सुभाष रायबोले, जयपाल कांबळे, दिपक रामपुरकर, सय्यद हबीब, मंगेश बेंद्रिकर, मधुकर पाटील भिसे, धम्मानंद जोंधळे, भरत पाटील मरखेलकर, रमेश शिवणीकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थितीत होते. या पक्ष प्रवेशाबद्दल उपस्थित मान्यवरांकडून शुभेच्छा आणि अभिनंदन करण्यात आले आहे.

# बारड शिवारात रोही प्राण्याचा धुमाकूळ शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ३० जुलै -**

बारड शिवारातील वनस्पती उद्यान परिसरातील शेत शिवारात रोही प्राण्यांने धुमाकूळ माजवला असुन शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापूस, तुर, मुग, उडद, या पिकाला खाऊन फस्त करत असल्याने शेतकऱ्याचे अतोनात नुसकान करत असल्याचे समोर आले आहे शेतकरी पिकांचे नुकसान होत असल्याने हैराण झाला असुन वनविभागाने मात्र याकडे साफ दुर्लक्ष असल्याचे शेतकर्यांनी सांगितले या रोहीचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांन कडून करण्यात येत आहे

शिवारात चाळीस रोहीचा कळप असल्याने एका सोयाबीन शेतात थांबले की सोयाबीन सह ईतर पिके खाऊन फस्त करत आहेत रोही येत असल्याने शेतकर्यांना पावसाळ्यात शेतात जागल करावी लागत असल्याने जीव मुठीत धरून रात्री रोहीना हाकलतांना कसरत करण्याची वेळ आली असून वनविभाग मात्र याकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

जंगल परिसरातील शेतकऱ्यांना रोहीचा मोठ्या प्रमाणात त्रास असून येणारी सुगी पिके फस्त होत असल्याने हजारो रुपये खर्च करून पिकांची लागवड केली जाते परंतु प्राण्यांच्या करण्यात येणाऱ्या नुसकाने पुढे शेतकऱ्यांना आर्थिक संकटांना समोरे जावे लागणार आहे.त्यामुळे परिसरातील शेतकरी पिकांच्या नुसकाने रोहीच्या कळपा मुळे त्रस्त झाला आहे.

वनविभागा मात्र याकडे दुर्लक्ष कतर असून शेतकर्याच्या मदतीला वनविभागाचे कर्मचारी येत नसल्याचे समोर आले असून फोनवरूनच शेतकऱ्यांना सल्ला देत आहेत.

# समाज कल्याण विभागाच्या सेस फंडातील योजनांसाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे १० ऑगस्टपर्यंत अर्ज करा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

मागास वर्गीयांना सामाजिक आर्थिक विकासासाठी असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या विविध योजनांसाठी १० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेड उपकर २० टक्के सेस मागासवर्गीय कल्याण निधी २०२४-२५ अंतर्गत नऊ योजनांबाबतचे अर्ज १० ऑगस्टपर्यत मागविण्यात आले आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्जदारांनी अटी व शर्तीच्या अनुषंगाने परिपूर्ण अर्जाचा प्रस्ताव संबंधित तालुक्याच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात १० ऑगस्टपर्यंत सादर करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी केला आहे.

या योजनांमध्ये मागासवर्गीय झेरॉक्स, (प्रिंटर, स्कॅनर व झेरॉक्स मशिन) वाटप करणे, मागासवर्गीय प्रशिक्षित महिलांना शिलाई मशीन पुरविणे, मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना सायकल पुरविणे, मागासवर्गीय मिरची कांडप पुरविणे योजना, मागासवर्गीयांना पिठाची गिरणी पुरविणे योजना, मागासवर्गीय गुणवंत विद्यार्थ्यांना परिक्षासाठी प्रोत्साहनपर अनुदान, मागासवर्गीय व्यक्तींना दुग्ध व्यवसायासाठी गाई व म्हैस पुरविणे, निराधार, विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत एकल मागासवर्गीय महिलांना उपजिविकेसाठी सहाय्य करणे या योजनासाठी पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यात गट विकास अधिकाऱ्यांकडे अटी व शर्तीच्या अधिन राहून परिपूर्ण अर्ज सादर करावेत. तसेच अधिक माहितीसाठी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद येथे संपर्क साधावा, असेही जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी कळविले आहे.

# विष्णूपुरी बंधाऱ्याच्या सखल भागातील नागरिकांनी सावध असावे : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्प असणाऱ्या शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प ८३ टक्के क्षमतेने भरला आहे.त्यामुळे कधीही बंधार्याच्या दाराला उघडले जाऊ शकते. नदीपात्रात त्यामुळे विसर्ग वाढेल.प्रकल्पाच्या पुढील गावांनी सतर्क असावे, असा इशारा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिला आहे.

नांदेड जिल्हयातील शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे आज दि. २५ रोजी ८३% क्षमतेने भरला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात चालू असलेल्या सततच्या पावसामुळे प्रकल्पाच्या पाणी पातळीत सतत वाढ होत आहे. बंधाऱ्यात येणाऱ्या पाण्याची आवक लक्ष्यात घेता विष्णुपुरी बंधाऱ्याचा दरवाजा कोणत्याही क्षणी उघडण्यात येईल, अशी सूचना पूर नियंत्रण अधिकारी यांनी केली आहे.



नांदेड - भोई समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन कुसुम सभागृह येथे आयोजित करण्यात आले या शिबीराचे दिप प्रज्वलित करुन करुन उद्घाटन करताना स्वामी विवेकानंद करियर अकॅडमीचे संचालक प्रा. विठ्ठल कागणे व माजी शिक्षण संचालक गोविंद नोंदेडे आदी होते. (छाया - नरेंद्र गडप्पा, नांदेड)

# अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती शाळा व विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून अनु. जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी प्रणालीद्वारे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये सैनिकी शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, ९ वी १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, इ. ५ वी ते ७ वी आणि इ. ८ वी ते १० वी मधील अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती,महर्षि विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क योजना इ. योजना राबविण्यात येत आहेत.

सदरील योजनांमध्ये लातूर विभागातील, लातूर जिल्ह्यातील एकूण शाळा २८२० त्यापैकी लॉगीन केलेल्या शाळांची संख्या २४७८ तर शिल्लक शाळांची ३४२, धाराशिव जिल्ह्यातील १८६४ पैकी २३६ तर शिल्लक शाळांची संख्या १६२८, नांदेड जिल्ह्यातील ३८२७ पैकी ३३७९ तर शिल्लक शाळांची संख्या ४४८ व हिंगोली जिल्ह्यातील १३९४ शाळांपैकी ९४५तर शिल्लक शाळांची संख्या ४४९ आहे. लातूर विभागात एकूण ९९०५ शाळा आहेत. त्यापैकी ७०३८ शाळांची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचे शाळेच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन लॉगीन झालेले आहे.

# नांदेड जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजनेतून युवकांची नियुक्ती सुरू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांशी मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ आज नांदेड जिल्ह्यामध्ये झाला. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते दोन तरुणांना नियुक्तीपत्र देऊन या प्रशिक्षण योजनेची प्रतिनिधिक स्वरूपात सुरुवात जिल्ह्यात आज करण्यात आली.

कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविली जात आहे. पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून कौशल्य व आत्मविश्वास विकसित व्हावा यादृष्टीने ही ६ महिन्यांच्या नियुक्तीची योजना आहे. याचबरोबर उद्योजकांना लागणारे कुशल मनुष्यबळ या योजनेद्वारे घडविता येणार आहे.

आज दुपारी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेचे पहिले कार्यादेश प्रदान करण्यात आले. सुप्रसाद सूर्यकांतराव दामेकर, देगलूर, अंजली राजेंद्र आवतिरक, पाथरड रेल्वे, ता. मुदखेड, विश्वजीत रंजू खानसोळे, ओमकेश्वर संतोष कुमार उपलवाड असे कार्यादेश दिलेल्या या चार उमेदवारांचे नाव आहे. यापैकी सुप्रसादला तहसील कार्यालय देगलूर तर अन्य तीन उमेदवारांना जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड या ठिकाणी कामकाज सोपविण्यात आले आहे.

या प्रतिनिधीक व छोटेखाली कार्यक्रमाला माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण माजी आमदार अमर राजूरकर, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभागाच्या सहाय्यक आयुक्त रेणुका तम्मलवार यांची उपस्थिती होती

ही कार्य प्रशिक्षण योजना ६ महिन्यासाठी असून रितसर नोंदणी करुन रुजू झालेल्या बारावी पास उमेदवारांना ६ हजार रुपये, आयटीआय/ पदविका उमेदवारांना ८ हजार रुपये तर पदविधर व पदव्युत्तर उमेदवारांना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन देण्यात येईल. बारावी, आय. टी. आय. पदविका, पदवीधर व पदव्युत्तर झालेल्या उमेदवारांनी www.mahaswayam.gov.in या पोर्टलवर जावून आपल्या लॉगिन आयडी पासवर्ड च्या माध्यमातून पोर्टलवर उचधघझध अंतर्गत नोंदविलेल्या विविध रिक्तपदांना ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले

## कमला नेहरू विद्यालयात शिक्षण सप्ताह समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि.३० जुलै-**

येथील कमला नेहरू विद्यालयात शिक्षण सप्ताह समारोप कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्था सचिव तथा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शिवानंद हेंगणे व प्रमुख पाहुणे म्हणून कीर्तनकार, प्रवचनकार, समाज प्रबोधनकार, ह .भ.प. संजय नागपूर्णे लाभले होते. त्यावेळी शिवानंद हेंगणे यांच्या हस्ते शाल व पुष्पहार घालून महाराजांचे स्वागत करण्यात आले तसेच शिवानंद हेंगणे यांचे स्वागत पांडूरंग कुंभार यांनी केले तर मुख्याध्यापिका श्रीमती दर्शना एकघरे यांचे स्वागत प्रतिभा संगविकर यांनी केले. प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एकघरे यांनी केले या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिवानंद हेंगणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक उमाकांत पाचंगे, चोबळे सुरेंद्र, प्रदिप गायकवाड, आकाश भालेराव, ज्ञानेश्र्वर सुर्यवंशी, संजय बने, उमाकांत मिरजगावे, सतिश हेंगणे, कपिल किने उपस्थित होते.







## सकल ओबीसी बांधवाच्या वतीने ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे स्वागत

**अहमदपूर, दि. ३० जुलै-**

ओबीसींच्या आरक्षणासाठी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या आरक्षण बचाव यात्रेचे प्रणेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे अहमदपूर तालुक्यातील सकल ओबीसी समाज बांधवाच्या वतीने लातूर येथे जंगी स्वागत करुन ओबीसी च्या आरक्षण बचावासाठी संपूर्ण महाराष्ट्रात आरक्षण बचाव यात्रा काढल्याबद्दल ॲड. आंबेडकर यांचे आभार मानले. ओबीसी आरक्षण बचाव यात्रेच्या निमित्ताने लातूर येथील गिरवलकर मंगल कार्यालयात झालेल्या जाहीर कार्यक्रमात गोविंद गिरी व शिष्टमंडळानी ॲड प्रकाशजी आंबेडकर यांची प्रत्येक्ष भेट घेऊन सत्कार करुन ओबीसी आरक्षण व अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील ओबीसी समाजाची सध्याची स्थिती यावर सविस्तर चर्चा केली. सदरील शिष्टमंडळात गोविंद गिरी, रामभाऊ नरवटे, राजेंद्र कांबळे, सारीपुत्र ढवळे, गजानन देवकते, विनय ढवळे, उत्तम कांबळे, चंद्रकांत कांबळे, बाबासाहेब कांबळे, मधुकर जोंधळे उपस्थित होते.

# विरोधक अर्थसंकल्पाचे राजकारण करत असले तरी महाराष्ट्राला भरीव मदत

### भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णींचा दावा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.३० जुलै-**

केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रावर अन्याय झाला असं विरोधक ओरडून तांडव नृत्य करत असले तरी खऱ्या अर्थाने राज्याला काय मिळालं? याचा अभ्यास न करता केवळ विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राजकिय स्वार्थापोटी महाविकास आघाडीचे नेते अर्थसंकल्पावरून राजकिय तमाशा करत असल्याची टिका भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली.

वाढवण बंदराला ७६ हजार कोटी तर रेल्वे प्रकल्पासाठी १५ हजार कोटी एवढेच नव्हे तर मराठवाड्यातले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ६०० कोटींची आर्थिक तरतूद अर्थसंकल्पात असून उघडा डोळे, बघा निट हे आता विरोधकांनी करायला हवं असाही टोला त्यांनी लगावला.

केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर सविस्तर बोलण्यासाठी प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांच्या पत्रकार परिषदेचे जिल्हा भाजपाच्या वतीने येथील शासकिय विश्रामग्रह सभा ग्रहात आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. संभाजी निलंगेकर, प्रदेश प्रवक्ता गणेश हाके, जिल्हाध्यक्ष दिलिप राव देशमुख, देवीदास काळे, प्रविण कस्तुरे, चामे आदी मान्यवरांची उपस्थीती होती. केंद्र सरकारने सामान्य माणसाचं हित आणि देशातील प्रत्येक घटकाचा विचार केला. उत्पादन वाढ करताना गरिब माणसाचा विचार ज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतुन एक कोटी घरं, गरिबाच्या मुलांनी शिक्षणात पुढे गेले पाहिजे यासाठी नाममात्र व्याजदरावर दहा लाखांचे कर्ज, आयकरामध्ये नोकरदारांच्यासाठी चांगला निर्णय एवढेच नव्हे तर देशातील राज्य सरकारला पंधरा वर्षासाठी बिनव्याजी कर्ज देणार याचाच अर्थ विकास योजना राबवण्यासाठी प्रोत्साहन देणार. सामान्य लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सरसारख्या रोगावरील औषधांच्या किमती कमी केल्या तर हिंदु, बौद्ध, जैन धर्मस्थळांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुद केली. बेरोजगारी हटवण्यासाठी देशातील युवकांना कौशल्य विकास उपक्रम हाती घेवून रोजगार निर्मिती कशी करता येईल हा विचार देखील यात आहे. स्पर्धेच्या युगात इलेक्ट्रॉनिक वहाने, सौरऊर्जा त्यासाठी दिलेली सवलत एवढेच नव्हे तर देशातील शेतकर्यांचे उत्पादन वाढले पाहिजे त्या दृष्टीने शेतीपुरक योजना राबवणे असतील किंवा अवजाराच्या किंमती स्थिर ठेवणे असेल या गोष्टीला प्राधान्य दिलं. अनेक वस्तुवरील कस्टम ड्युटी कमी केल्याचा परिणाम सोन्या चांदीचे भाव कालच पाच हजारांनी उतरले. संरक्षण किंवा इतर देशातील मुलभुत सुविधा यासाठीही कोट्यावधी रूपये आर्थिक तरतुद करण्यात आली. आपल्या देशाच्या भविष्यावरही मोठी गुंतवणुक करणारा अर्थसंकल्प ज्यामध्ये शेतकरी, महिला, युवा, गरिब चार घटक वर्ग डोळ्यासमोर ठेवले. तरूणांच्यासाठी केंद्र सरकारही आता ॲप्रेंटिस योजना हाती घेणार आहे. १०० नविन क्लस्टर तयार करण्याचा घेतलेला निर्णय ज्यामध्ये उत्पादन, आयटी सेवा या सर्व क्षेत्रात रोजगार उपलब्ध होईल.



विरोधक महाराष्ट्राला काहीच मिळालं नाही म्हणून केवळ राजकिय स्वार्थापोटी खोटं बोलत आमच्या विरोधकांनी सुरू केलेला तमाशा बिनपैशाचा असुन १०० हजार कोटी पेक्षा जास्त महाराष्ट्राला निधी मिळाला. तरी एक रूपाया मिळाला नसल्याची ओरड विरोधक केवळ बदनामीसाठी करत असल्याचा टोला त्यांनी लगावला. मुंबई, पुणे-नागपूर मेट्रोसाठी २४०० कोटी रूपये, इंडस्ट्रिअल कोरीडॉर ४९९ कोटी, नागरी वाहतुक प्रकल्पासाठी ९०८ कोटी, ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रोजेक्ट १५० कोटी, नदी पुनर्विकास ५०० कोटी, मुळा-मुठा नदी पुनर्विकास ६९० कोटी, ग्रामीण रस्ते ४०० कोटी, सर्व समावेशक इकॉनिमिक कोरीडॉर ४६६ कोटी, आरोग्य सेवा आणि पोषण आहार ३२०० कोटी, प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २५०० कोटी मंजुर इतर सुविधांना देखील करोडो रूपये मंजुर केले. तरी सुद्धा विरोधकांची बोंबाबोंब राजकिय स्वार्थापोटी असल्याची टिका कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली.



## राष्ट्रीय लोकअदालतीत १५९ प्रकरणे निकाली; एक कोटी २ लाख वसूल

**उदगीर, दि.३० जुलै-**

राष्ट्रीय लोकअदालतीत प्रलंबित १५९ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आलीअसुन यात एक कोटी दोन लाख पन्नास हजार सहाशे चार रुपयांचे वसूल झाले. उदगीर येथील न्यायालयात एकूण ५ पॅनलच्या माध्यमातून तडजोडीने प्रकरणाने निकाली काढण्यात आली. यावेळी तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश पी. डी. सुभेदार, दिवाणी न्यायाधीश पी. बी. लोखंडे, सहदिवाणी न्यायाधीश के.ए. पोवार, सहदिवाणी न्यायाधीश एन.जे. चव्हाण, सहदिवाणी न्यायाधीश बी.आर. झेंडे आदी उपस्थित होते. तालुका विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने राष्ट्रीय लोकअदालतीत शनिवारी प्रलंबित प्रकरणे एक हजार सहाशे चाळीस व वादपूर्व एक हजार सातशे सव्विस असे एकूण तिन हजार सहाशे सासष्ट प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. त्यापैकी एकूण १५९ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यात न्यायालयीन प्रलंबित १२९ तर वादपूर्व ३० प्रकरणांचा समावेश आहे. प्रलंबित प्रकरणात तडजोडीअंती ९० लाख ९३ हजार १७ रुपये व वादपूर्व प्रकरणात ११ लाख ५७ हजार ५८७ तडजोड शुल्क म्हणून वसूल करण्यात आले. यावेळी उदगीर जिल्हा न्यायालयाचे अधीक्षक एस.बी. मोरे यांच्यासह न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# डॉ. शिवाजी काळगे यांच्या खासदारकीला खंडपीठात आव्हान

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.३० जुलै -**

बोगस, बनावट कागदपत्राआधारे माला जंगम जात, आणि जातवैधता प्रमाणपत्र मिळवून, लातूर राखीव(अ.जा.) लोकसभा मतदार संघातील नवनिर्वाचित खासदार डॉ.शिवाजी काळगे यांच्या खासदारकीला मुंबई उच्च न्यायालयाच्या छ.संभाजी नगर खंडपीठात आव्हान देण्यात आले असून, या याचिका क्र.०६/२०२४ ची पुढील सुनावणी दि.६ ऑगस्ट २०२४ रोजी होणार असल्याची माहिती याचिकाकर्ते उमेदवार प्रा.विश्वनाथ आल्टे, दत्तू नरसिंगे, ॲड.भारत ननवरे, ॲड.प्रविण जोहारे आणि जागरुक नागरिक विठ्ठल भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.




विस्ताराने माहिती देताना त्यांनी सांगितले की, डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांचे मुळगाव अंकुलगा राणी ,ता.निलंगा असून, सध्या ते लातूरच्या नेताजी नगरात वास्तव्यास आहेत. त्यांच्या निवासस्थानीच भव्य डोळ्याचा दवाखाना आहे. त्यांचा जिल्हा परिषद प्रशाला अंकुलगा (राणी) येथे शाळेतील ईयत्ता पाहिलीतील प्रवेश दि.१२ जून १९७४ रोजीचा असून, त्यांचा प्रवेश निर्गम उतार्यावर जातीचा उल्लेख हिंदु ( जंगम माला) असा आहे. तसेच डॉ.शिवाजी काळगे यांची सख्खी बहिण लता बंडाप्पा काळगे यांचा ईयत्ता सातवीच्या शाळा सोडल्याच्या दाखल्या(टी.सी.)वर जातीचा उल्लेख स्पष्टपणे हिंदू (जंगम) असा आहे. तसेच त्यांची सख्खी चुलत बहिण निर्मला काशिनाथप्पा काळगे यांचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंकुलगा (राणी) शाळेच्या जनरल रजिस्टरला जातीचा उल्लेख लिंगायत (जंगम) असा आहे. यावरुन डॉ. शिवाजी काळगे यांच्या व त्यांचे रक्ताचे नातेवाईक जसे बहिण व चुलत बहिण यांच्या जातीच्या उल्लेखामध्ये तफावत दिसून येते. तसेच गाव नमुना नं.१३ मध्ये अनु.क्र.११६ वर जातीचा रकाना नसताना डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांचे वडील बंडाप्पा मलिंगप्पा यांच्या नावासमोर माला जंगम असे नंतर वाढविल्याचे दिसून येते कारण बंडाप्पाचे ईतर भावांच्या नावासमोर जातीचा उल्लेख दिसून येत नाही. यावरुन हे सिध्द होते की, डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी माला जंगम जातीचे खोटे व बनावट जात प्रमाणपत्र काढले आहे. शैक्षणिक, नोकरी आणि राजकीय फायदा घेतला आहे.

डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी दि.१४ जुलै १९८६ रोजी तहसील कार्यालय निलंगा येथून माला जंगम या जातीचे प्रमाणपत्र काढले. त्यांनी ईयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण झाल्यानंतर सन १९८६ मध्ये जातपडताळणी समिती, पुणे यांच्याकडे जात पडताळणीकरिता प्रस्ताव दाखल केला होता.सदरील समितीने त्यांचा माला जंगम जातीचा प्रस्ताव अवैध ठरविला होता. त्यानंतर त्यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे अपिल क्र.१९८७ मध्ये दाखल केले होते. त्याचा निकाल डॉ.शिवाजी काळगे यांचे जात प्रमाणपत्र वैध असल्याचा निर्णय दिला होता.त्यानंतर काहीही कारण नसताना डॉ.शिवाजी काळगे यांनी स्वतः औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचिका उच्च न्यायालयाने सन २००१ मध्ये मंजूर के केली असून, सदर निर्णयामध्ये जात वैधतेला आव्हान देण्याचा मुद्दा खुला ठेवला अहो.त्यामुळे सदरील जात वैधता बाबतचा निर्णय हा कायमस्वरुपी नाही हे दिसून येते असे ते म्हणाले. डॉ.शिवाजी काळगे यांनी शिरुर अनंतपाळ तहसीलदार यांच्याकडे नव्याने अर्ज करुन माला जंगम जातीचे प्रमाणपत्र दि.१३ मार्च २०१४ रोजी प्राप्त केले आहे. सन २०१६ साली डॉ.शिवाजी काळगे यांनी त्यांची मुलगी श्रेया शिवाजी काळगे हिचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी करुन घेतले.त्यानंतर त्यांनी स्वतःची जात वैधता सन २०१९ मध्ये वयाच्या ४९ व्या वर्षी करुन घेतली. दरम्यानच्या डॉ.डॉ.शिवाजी काळगे यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले तसेच वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक दि.१ सप्टेंबर २०१८ पासून दिली असताना त्याच कार्यालयामार्फत सेवेत रुजू होण्याच्या अगोदर म्हणजे दि.२३ ऑगस्ट २०१८ रोजीच जात वैधता पडताळणीचा संबंधित समितीकडे प्रस्ताव पाठविला आहे,जो बेकायदेशीर आहे,असा आरोप यावेळी करण्यात आला.

एकूणच डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी खोटे जात प्रमाणपत्र काढून त्याची जात वैधता बेकायदेशीररित्या करुन घेतली असून, अनुसूचीत जातीच्या वर्गाला मिळणारे सर्व लाभ घेतले आणि एका अनुसूचीत जातीच्या वर्गाच्या व्यक्तीचा हक्क हिरावून घेतला आहे, जो कायद्याने गुन्हा आहे.म्हणून आम्ही याचिकाकर्त्यांनी न्याय्य हक्कासाठी निवडणूक याचिका छत्रपती संभाजी नगर खंडपीठात दाखल केली आहे असे सांगून याचा निकाल लवकरात लवकर लागेल अशी अपेक्षा याचिकाकर्ते उमेदवार प्रा.विश्वनाथ आल्टे, दत्तू नरसिंगे, ॲड.भारत ननवरे, ॲड.प्रविण जोहारे आणि जागरुक नागरिक विठ्ठल भोसले यांनी यावेळी व्यक्त केली.

## विवेकानंद रुग्णालयात क्लिष्ट हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.३० जुलै -**




येथील विवेकानंद रुग्णालयात आणखी एका रुग्णावर क्लिष्ट हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे. विवेकानंद रुग्णालयात मागील दोन वर्षांमध्ये गंभीर, जन्मजात हृदय विकृतींसाठी शेकडो यशस्वी हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या सर्व हृदय शस्त्रक्रिया समाजहितैषी दात्यांच्या सहकार्यामुळे व विविध योजनांतर्गत विनामूल्य करणे रुग्णालयाला शक्य झाले आहे. या अंतर्गतच जून महिन्यातील हृदय शस्त्रक्रिया शिबिरात एक १९ वर्षीय स्त्री रुग्ण दाखल झाली. तिला, VSD (Ventricular Septal Defect) व DCRV (Double Chambered Right Ventricle) या जन्मजात हृदय विकृती होत्या. तडऊ मध्ये हृदयाच्या डाव्या व उजव्या निलयामध्ये छिद्र असल्याकारणाने दोन्ही निलयातील रक्त एकत्र मिसळते. परिणामी हृदयाची कार्यक्षमता कमी होते, तसेच ऊळठत मध्ये उजव्या निलयामध्ये उच्च दाब व कमी दाव असे दोन भाग तयार होतात. या हृदय विकृतीसाठी VSD Repair (Closure) व DCRV Repair ही शस्त्रक्रिया केली जाते. तर वर उल्लेख केलेल्या रुग्णास भूक न लागणे, वजनात वाढ न होणे, क्रियाशक्ती कमी असणे अशी लक्षणे दिसत होती. ही रुग्ण यापूर्वी उपचारासाठी २-३ रुग्णालयात गेली होती. परंतु शस्त्रक्रियेसाठी लागणारा खर्च परवडत नसल्याकारणाने (कुटुंबामध्ये आई एकटी आहे) रुग्णाने शस्त्रक्रिया टाळली. विवेकानंद रुग्णालयात होणाऱ्या मोफत हृदय शस्त्रक्रिया शिबिराची माहिती मिळताच रुग्ण उपचारासाठी दाखल झाली. तिच्या आवश्यक पूर्व तपासण्या केल्यानंतर VSD Closure ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या रुग्णावर करण्यात आली. दोन गंभीर स्वरुपाच्या हृदय विकृतीमुळे शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट होती. तरीही सदर शस्त्रक्रिया डॉक्टरांनी कुठल्याही गुंतागुंतीशिवाय पार पाडली. शस्त्रक्रियेदरम्यान रुग्णाची प्रकृती स्थिर होती. शस्त्रक्रियेनंतरही रुग्णामध्ये समाधानकारक सुधारणा होत राहिली. एक आठवड्यानंतर रुग्णास सुट्टी करण्यात आली. आज एक महिन्यानंतर रुग्णाची प्रकृती उत्तम आहे. सदर रुग्णाच्या आईने 'माझ्या गंभीर हृदय विकृतीने ग्रस्त असणाऱ्या मुलीवर मोफत हृदय शस्त्रक्रिया करून बरे केले ही आम्हाला खूप मोठी मदत झाली' असे भावपूर्ण उद्गार काढले. तसेच मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन ऑपरेशन करण्याचा पर्याय आम्हाला सुचवला गेला होता. परंतु विवेकानंद रुग्णालयावर आमचा विश्वास असल्यामुळे येथे आलो. डॉक्टर व संपूर्ण टिम, रुग्णालय प्रशासन यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. या रुग्णावर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया डॉ. सारंग गायकवाड हृदय शल्यचिकित्सक (मुंबई), डॉ. नितीन येळीकर हृदयरोग तज्ज्ञ (लातूर) व त्यांची टिम डॉ. प्रविण लोहाळे (भूलतज्ञ), डॉ.प्रमोद तोष्णीवाल (बालरोग तज्ञ), डॉ. चंद्रशेखर औरंगाबादकर (अतिदक्षता विभाग तज्ञ), निवासी वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग स्टाफ व चमूने पार पाडली.



## राष्ट्रवादी महिला काँग्रेस जिल्हा सचिवपदी आशा रेड्डी यांची निवड

**उदगीर, दि.३० जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार प्रदेश अध्यक्ष सुनिल तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या मान्यतेने क्रिडा युवक व बंदरे मंत्री संजय बंनसोडे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा कार्याध्यक्ष दिपाली औटे, शहर उपाध्यक्ष रंजना चिघळे, शहर उपाध्यक्ष मंगला काळा, शहर उपाध्यक्ष नम्रता सुरवसे, शहर सरचिटणीस प्रिती कविटकर यांची निवड करण्यात आली.



### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस, वित्तीय संस्थेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील निखिलकुमार सुरेश चिद्रेवार व संदीप सुरेश चिद्रेवार, रा. सर्वोद्दय हाउसिंग सोसायटी, उदगीर ता. उदगीर जि. लातूर यांनी मला दिलेल्या माहितीवरून, द्वाखविलेल्या कागदपत्रांवरून मी हे जाहीर प्रगटन सर्वाच्या माहितीस्तव देत आहे-

निखिलकुमार सुरेश चिद्रेवार व संदीप सुरेश चिद्रेवार यांच्या मालकी कब्जे वहिवाटीतील मौजे उदगीर ता. उदगीर जि. लातूर येथील न.पं. हद्दीतील दुकान ज्याचा न.पं.क्र. ५-१-९४ (जुना) ५-१-६९ (नवीन), ५-१-६९/१ (नवीन),५-१-१०६/१ (नवीन), ५-१-१०६ (नवीन) एकूण क्षेत्रपूर्व- पश्चिम- २४ फुट, दक्षिण-उत्तर-९० फुट (एकूण २१६० चौ. फुट) असे असून ते दि.२५/०७/२०२४ रोजी सकाळी १२ वाजेच्या दरम्यान उदगीर येथील दुय्यम निबंधक कार्यालय येथून पत्तेवार चौक येथील दुकानाकडे प्रवास करताना त्यांच्या जवळील बॅग व त्यात असलेले सदर दुकानाचे बांधकाम परवानगी व नकाशा आणि वरील नमूद दुकानाचे दुय्यम कार्यालय, उदगीर येथील नोंदाणीकृत मूळ दस्त ज्याचे खरेदी खत क्र.२४६०/२००५ दि.२०/०६/२००५, २०१२/२०१० दि.१७/०३/२०१०, ४६७८/२०१० दि.१८/०६/२०१०, ६८९/२०१६ दि.२९/०१/२०१६ गहाळ झालेले आहे. याबाबत त्यांनी शहर पोलीस स्टेशन, उदगीर येथे दि.२६/०७/२०२४ रोजी तक्रार दिली असून ज्याचा क्र.२५२/२०२४ असा आहे. सदर बंग व त्यात असलेले कागदपत्रे कोणास सापडल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर कागदपत्रांसह संपर्क करावे.

निखिलकुमार सुरेश चिद्रेवार व संदीप सुरेश चिद्रेवार, रा.सर्वोद्दय हाउसिंग सोसायटी, उदगीर ता. उदगीर जि. लातूर मो.नं.८६९८७९४७९९

दिनांक : २९/०७/२०२४

**जाहीर प्रगटन देणार**
**१) निखिलकुमार सुरेश चिद्रेवार**
**२) मंदीप मुरेश चिद्रेवार**

**सही/-**
**ॲड. उपेंद्र चंद्रकांत महाजन**
**ॲडव्होकेट उदगीर**
**बी.एस.एल., एलएल.बी.**
**(डी.टी.एल., डी.आय.पी.आर.)**


# सत्ताधारी, विरोधक सोयीस्करपणे खुलासा टाळतात : ॲड.आंबेडकर

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.३० जुलै -**

मराठा समाजातील गोरगरिबांना आरक्षण देण्यासाठी आमचा कोणताही विरोध नाही .परंतू आरक्षण कायद्याच्या चौकटीत बसेल .अशी पर्यायी व्यवस्था होणे आवश्यक आहे . मनोज जरांगे पाटील यांची आरक्षणाची मागणी चुक आहे की बरोबर आहे . याबद्दल सत्ताधारी महायुती व विरोधी पक्षातील महाविकास आघाडीचे नेते कसलाही खुलासा करीत नाहीत .सोयीस्कररित्या टाळतात . अशी खंत ड प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली .

औसा येथे आरक्षण बचावयात्रेचे किल्ले मैदानापासून हनुमान मंदिर या ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. त्यावेळी ॲड प्रकाश आंबेडकर बोलत होते.

भारतीय राज्य घटनेनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गांना आरक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये इतर मागास प्रवर्गातील जनतेत त्यांचे आरक्षण अबाधित राहील किंवा नाही. यावरून संभ्रम निर्माण झाला आहे. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गामधून आरक्षण देण्यात यावे .या मागणीसाठी मोर्चे, आंदोलन आणि उपोषण करीत आहेत. आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात अशांतता निर्माण व्हायला नको असे मत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी प्रवर्गातील आरक्षणाचे रक्षण व्हावे , जनजागृती व्हावी . यासाठी आरक्षण बचाव यात्रा काढली असून दिनांक ७ आगस्ट २०२४ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आरक्षण बचाव यात्रेचा समारोप होणार असल्याचे डा आंबेडकरांनी यावेळी सांगितले.



वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांनीही आपले विचार व्यक्त केले. आरक्षण बचाव यात्रेचे उजनी व बेलकुंड येथे भव्य स्वागत करण्यात आले .औसा शहरात येताच किल्ला मैदानावरून वाजत गाजत या रॅलीचा लातूर वेस हनुमान मंदिरा जवळ समारोप झाला. जिल्हा अध्यक्ष सलीम शेख आणि महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मंजुषा निंबाळकर, सरपंच युवराज गायकवाड , समाधान कोळी , आण्णाराव सुर्यवंशी , शनिल सगट , प्रशांत उगाडे. सद्दाम शेख, अखिल शेख, अँड जयराज जाधव, महावीर बनसोडे, चांगदेव माळी, युवराज चव्हाण, हनुमंत कांबळे, लिंबराज जाधव, विशाल माळी, सोमनाथ कांबळे, सत्यभामा रोंगे, राजेंद्र बनसोडे, इलियास चौधरी यांच्यासह अनुसूचित जाती जमाती व ओबीसी प्रवर्गातील तो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.